Government of Karnataka

# माय मराठी

5

## पहिले आणि दूसरे सत्र

## इयत्ता पाचवी

2016

## Marathi First Language

## First & Second semester

©KTBS
Not to be republished

Karnataka Text Book Society (R)
100 Ft. Ring Road, Banashankari, 3rd Stage,
Bengaluru - 85

# PREFACE

The Textbook Society, Karnataka has been engaged in producing new textbooks according to the new syllabi prepared which in turn are designed based on NCF - 2005 since June 2010. Textbooks are prepared in 11 languages; seven of them serve as the media of instruction. From standard 1 to 4 there is the EVS and 5th to 10th there are three core subjects namely mathematics, science and social science.

NCF - 2005 has a number of special features and they are:

- Connecting knowledge to life activities
- Learning to shift from rote methods
- Enriching the curriculum beyond textbooks
- Learning experiences for the construction of knowledge
- Making examinations flexible and integrating them with classroom experiences . Caring concerns within the democratic policy of the country
- Make education relevant to the present and future needs.
- Softening the subject boundaries integrated knowledge and the joy of learning.
- The child is the constructor of knowledge

The new books are produced based on three fundamental approaches namely.

Constructive approach, Spiral Approach and Integrated approach

The learner is encouraged to think, engage in activities, masters skills and competencies. The materials presented in these books are integrated with values. The new books are not examination oriented in their nature. On the other hand they help the learner in the total development of his/her personality, thus help him/her become a healthy member of a healthy society and a productive citizen of this great country India.

Mathematics is essential in the study of various subjects and in real life. NCF 2005 proposes moving away from complete calculations, construction of a framework of concepts, relate mathematics to real life experiences and cooperative learning.

Many students have a maths phobia and in order to help them overcome this phobia, jokes, puzzles, riddles, stories and games have been included in textbooks. Each concept is introduced through an activity or an interesting story at the primary level. The contributions of great Indian mathematicians are mentioned at appropriate places.

The Textbook Society expresses grateful thanks to the chairpersons, writers, scrutinisers, artists, staff of DIETs and CTEs and the members of the Editorial Board and printers in helping the Text Book Society in producing these textbooks.

Not to be republished ©KTBS

**Prof. G. S. Mudambadithaya**
Co-ordinator
Karnataka Textbook Society®
Bengaluru, Karnataka

**Sri. Nagendra Kumar**
Managing Director
Karnataka Textbook Society®
Bengaluru, Karnataka

# हितगुज

**मित्रहो,**

भारतीय शिक्षण पध्दतीमध्ये अत्याधुनिकता आणण्यासाठी आणि शिक्षण अधिकाधिक बालकेंद्रित करण्यासाठी नवनवीन पध्दतींचा अवलंब केला जात आहे. पंचवार्षिक योजनांप्रमाणे विशिष्ठ टप्प्यावर शैक्षणिक सुधारणांचे पुनरावलोकन करुन वेळोवेळी बदलही केले जात आहेत. अर्थात शैक्षणिक सुधारणा करताना अलिकडच्या पंचवीस वर्षात 'समान राष्ट्रीय शैक्षणिक कार्यक्रम' राबविण्यात आला. याची भारतवासीयांनी आवर्जून दखल घ्यायला हवी असे सांगावेसे वाटते.

सन 1986 मध्ये 'नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' स्विकारुन शिक्षण पध्दतीत राष्ट्रीय समानतेचा पाया घातला गेला. 1998 पासून संपूर्ण देशभर 'सामर्थ्यावर आधारित शिक्षण' या सुधारित योजनेचा प्रारंभ झाला, आणि सुशिक्षित विद्यार्थ्यांना किमान सामर्थ्ये प्राप्त करुन देण्याची जबाबदारी एक राष्ट्रीय कर्तव्य म्हणून शिक्षक बंधू भगिनींनी स्विकारली आहे असे दिसून येत आहे.

बदलत्या काळाप्रमाणे आपण स्वत:च्या राहणीमान आचार विचारात बदल करत असतो. शिक्षणक्षेत्र त्याला अपवाद नाही. अत्याधुनिकता आत्मसात करणे, नव विचार घेऊन पुढे जाणे. हा तर 'विद्या सरितेचा' स्थायीभाव आहे. बदल म्हणण्यापेक्षा समाजाभिमुख असलेले समाजोपयोगी 'नवविचार' ही काळाची गरज असते. राष्ट्रीयपातळीवर या नवविचाराचे मंथन निरंतर होत असते. या विचारमंथनातून तयार होणारे 'नवनीत' बालविकासाला पुष्टिकर असेल, अशी आशा मनी बाळगून 2005 मध्ये 'राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा आराखडा' तयार करण्यात आला. एन.सी.ई.आर.टी. मध्ये तयार झालेल्या या राष्ट्रीय विचाराला 'एन.सी.एफ. 2005' असे संबोधण्यात आले आहे. या 'नॅशनल करिक्युलम फ्रेम वर्क 2005' प्रमाणे तयार केलेले प्रस्तुत पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना 'राष्ट्रीय विचारांचे बीजारोपण' करीत आहोत असा ठामविश्वास पाठ्यपुस्तक मंडळाला वाटतो आहे.

©KTBS Not to be republished

सत्य आणि अहिंसेचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देणाऱ्या भगवान गौतम बुध्दांच्या या देशात महात्मा गांधीजीनी हा संदेश सर्वदूर पोचविला. आचार्य विनोबा भावे, साने गुरुजी या सारख्या गांधीवादी नेत्यांनी सत्य अहिंसेच्या विचारांची जोपासना केली.

सत्य आणि अहिंसेच्या तत्वांवर दृढ विश्वास असणाऱ्या महात्मा गांधीजीनाही मानवी हक्कांसाठी 'छोडो भारत' सारखी चळवळ उभारुन 'चलेजाव' चा नारा द्यावा लागला, स्वातंत्र्यासाठी 'करो या मरो' ही घोषणा द्यावी लागली, म्हणजेच कणखर व्हावे लागले हे ऐतिहासिक सत्य विसरुन चालणार नाही.

'एन.सी.एफ. 2005' मधून विचाराने, आचाराने कणखर आणि प्रतिभासंपन्न भारताच्या उभारणीचे बीजारोपण केले आहे.

शिक्षणाच्या या नवविचारातून प्रेरणा घेऊन भाषा, गणित, विज्ञान आणि विशेषत: समाजविज्ञान या सर्वच विषयातून एक प्रगल्भ राष्ट्रीय चेतना देण्याचे ध्येय 'भारतीय शिक्षणाने' उराशी बाळगले आहे. या राष्ट्रीय ध्येयाचा उद्देश 'बलसागर भारत होवो । विश्वात शोभूनी राहो' या पूज्य साने गुरुजींच्या शब्दात सांगून पाठ्यपुस्तक मंडळ आपले 'हितगुज' पूर्ण करीत आहे.

या राष्ट्रीय ध्येया प्रत घेऊन जाण्यासाठी प्रस्तुत पाठ्यपुस्तक केवळ एक माध्यम आहे. वैचारिक बीजारोपणाचे ते एक साधन आहे. या साधनात सुधारणा करण्यासाठी सर्व शिक्षणप्रेमी जनता, शिक्षक बंधू , भगिनींच्या विधायक सूचनांचे पाठ्यपुस्तक निर्देशनालयात स्वागत आहे.

प्रस्तुत पाठ्यपुस्तकाच्या निर्मितीमध्ये श्रीमती उषाताई गोगटे गर्ल्स हायस्कूल बेळगाविचे मुख्याध्यापक श्री. एम.के. मादार यांनी कार्यशाळांकरिता सभागृह आणि ग्रंथालय उपलब्ध करुन दिले.

'बाल भारती' पुणे येथील मराठी विषयाचे विशेष अधिकारी प्रा. माधव राजगुरु यांनी पाठ्यपुस्तक निर्मितीच्या कार्यात वेळोवेळी अमूल्य सल्ला दिला. लेखक व कवी यांची अनुमती मिळवून देण्याबाबत सहकार्य केले.

पाठ्यपुस्तक मंडळ या सर्वांचे अत्यंत आभारी आहे.

**पाठ्यपुस्तक मंडळ**



Not to be republished © KTBS

# Text Book Committee

## Chairman

**Shri. Madhav Kunte**, (A.M.) Smt. Ushatai Gogte Girls' High School, Belagavi

## Memebers

**Shri. P.K.Muchandikar**, Cluster Resource Person, Belgundi,Tal. Belagavi.

**Shri. J.S. Mali,** (H.M.) Govt. Hr. Pry. Marathi School, Kurli, Tal. Chikodi, Dist. Belagavi.

**Shri. I.S. Patil,**(A.M.)Govt. Hr. Pry. Marathi School, Tarihal, Tal. & Dist., Belagavi.

**Shri. S.D. Phakhare**, (A.M.) Govt. Higher Pry. Marathi School, Kadoli,Tal.,Belagavi.

## Artist

**Shri. P.S.Naik**, Artmaster, S.A.P. Vidyamandir, Kanagala Tal. Hukkeri,Dist. Belagavi.

## Scrutinizer

**Dr. Amrut Yardi**, H.O.D. Marathi, Karnataka Arts College, Dharwad.

## Chief Co - ordinator

**Prof. G.S.Mudambadithaya**

Curriculum revision and Text book preparation KTBS, Bengaluru.

## Chief Advisers

**Shri. Nagendrakumar ,** Managing Director, KTBS, Bengaluru.

**Smt. C. Nagamani,** Deputy Director, KTBS, Bengaluru

## Programme Co - ordinator

**Smt. M. Bhagyavathamma** , A.D.P.I. KTBS, Bengaluru.

©KTBS Not to be republished

# अनुक्रमणिका



| अ.न. | पाठाचे नाव | | कवी / लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1. | नव्या युगाचे गाणे | कविता | श्रीमती. शुभदा दादरकर | 1 |
| 2. | तीन मूर्ती | | | 4 |
| 3. | कडुनिंब | | संकलित | 13 |
| 4. | मधमाशी | कविता | संकलित (आठवणीतल्या कविता) | 20 |
| 5. | वीर हुतात्मा नारायण | | संकलित | 22 |
| 6. | आपला मित्र साप | | | 28 |
| 7. | जादूगार | कविता | गो.म. कुलकर्णी | 37 |
| 8. | हरवलेल्या पुस्तकाचे आत्मवृत्त | | | 40 |
| 9. | दसरा झाला हसरा | | अपर्णा मोडक | 48 |
| 10. | मासा | कविता | कृ.वि. दातार | 52 |


**प्रस्तुत पाठ्यांश प्रथम सत्राकरीता निर्धारित केला आहे.**

©KTBS Not to be republished

पाठ 1

# नव्या युगाचे गाणे







नव्या युगाचे नवीन गाणे एक दिलाने गाऊ
मानवतेचा दीप अंतरी नित्य तेवत ठेऊ ||धृ ||
अज्ञानाचा तिमिर सारुनी तेजोमय हा सूर्य उगवला
विज्ञानाच्या नभोमंडळी आपण तारे होऊ ||1 ||
रंग आपला वेगवेगळा सूर आपला एकसारखा
अनेकतेतून एकत्वाचे गाणे आपण गाऊ ||2 ||
हातामध्ये हात गुंफुनी देशहिताचा मंत्र जपोनी
हासत खेळत ध्येयमंदिरी पुढे पुढे रे जाऊ ||3 ||
भारतभूची पवित्र माती प्रिय आम्हाला स्वर्गाहुनही
या धरणीचे रक्षण करण्या प्राण पणाला लावू ||4 ||

* श्रीमती शुभदा दादरकर

Not to be republished © KTBS

# स्वाध्याय

## अ. नवीन शब्दांचा अर्थ

अंतरी मनात

तेवणे प्रकाशत राहणे

तिमिर अंधार

ध्येय प्राप्त करुन घेण्याचे उद्दिष्ट

सारणे बाजूस करणे

नित्य सतत

## आ. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

1. नव्या युगाचे गाणे कसे गाण्यास सांगितले आहे ?
2. विज्ञानाच्या नभोमंडळी आपणास काय होण्यास सांगितले आहे?
3. कशाचा तेजोमय सूर्य उगवला आहे?
4. अनेकतेतून आपणास कोणते गाणे गाण्यास सांगितले आहे?
5. ध्येय गाठण्यासाठी आपणास काय करण्यास सांगितले आहे?
6. भारतभूमीची माती कशी आहे?
7. प्राण कशासाठी पणाला लावायचे आहेत?

## इ. पुढे दिलेल्या कवितेच्या ओळींचा तुझ्या शब्दात अर्थ स्पष्ट कर.

1. 'मानवतेचा दीप अंतरी नित्य तेवत ठेवू'.
2. 'विज्ञानाच्या नभोमंडळी आपण तारे होऊ'.
3. 'रंग आपला वेगवेगळा सूर आपला एकसारखा'.

©KTBS Not to be republished

## ई. गाळलेल्या जागा भरा.

1. हातामध्ये हात ................ देशहिताचा मंत्र जपोनी.
2. नव्यायुगाचे गाणे या कवितेच्या कवयित्री ............... आहेत.

## उ. नमुन्या प्रमाणे लिही.

नमुना दीप अंतरी तेवत ठेवू.

1. नभोमंडळी .................
2. एकत्वाचे .................
3. ध्येयमंदिरी .................
4. प्राण .................

**तिरंगी झेंड्याचे चित्र काढून रंगव.**

©KTBS Not to be republished

## पाठ 2

# तीन मूर्ती

(एकदा राजाचा दरबार भरला होता. दरबारी मूर्तिकाराचे मुक्तकंठाने कौतुक करत होते. राजा कलेचा भोक्ता होता. राजाने ठरवले की मूर्तिकाराची प्रत्यक्ष भेट घेऊनच त्याच्या सुंदर मूर्तींचे निरीक्षण करावे. राजा आणि प्रधान मूर्तिकारास भेटण्यास निघाले).

राजा आपल्याकडे येत असल्याचे पाहून मूर्तिकाराने वाकून नमस्कार केला व तो म्हणाला.

मूर्तिकार : महाराज, आपण इथवर यायचे कष्ट कशाला घेतलेत? मला बोलावणं पाठवलं असतं तर मी स्वत: हजर झालो असतो.

महाराज : नाही तसे नाही. कलाकारासाठी वेळ किती महत्वाची असते याची मला जाणीव आहे. त्यामुळे आम्ही स्वत:च तुला भेटायला आलो आहोत.

मूर्तिकार : बोला महाराज काय सेवा करु आपली?

राजा : अरे माझी सेवा कसली करतोस, स्वत:च्या कलेने या समाजाची सेवा करतोस ते काय कमी आहे?

मूर्तिकार : आपण मला लाजवत आहात महाराज.


राजा : आम्ही काही शंका घेऊन तुझ्याकडे आलो आहोत. त्यांचे निरसन करशील ही अपेक्षा आहे.

मूर्तिकार : आज्ञा महाराज.

राजा : आम्ही असे ऐकले आहे की तू फार सुंदर मूर्ती तयार करतोस.

प्रधान : नुसत्याच सुंदर नाहीत महाराज. अगदी आकर्षक आणि उठून दिसणाऱ्या मूर्ती तयार करतात हे मूर्तिकार.

©KTBS Not to be republished



राजा : एका कणखर, टणक दगडापासून इतक्या सुंदर मूर्ती तू कशा काय तयार करतोस?

(या प्रश्नातील खोचक भाव मूर्तिकाराने ओळखला की राजा प्रत्यक्ष परीक्षा घेण्यासाठी इथे आला आहे. मूर्तिकार हुशार होता. तो म्हणाला )

मूर्तिकार : महाराज कणखर आणि टणक दगडापासून मूर्ती बनवणे एवढे सोपे नाही. दगडावर एक जरी छिन्नीचा घाव जादाचा पडला की दगड फुटू शकतो.

राजा : एवढे कठीण काम तुला सोपे कसे वाटते?

मूर्तिकार : महाराज मूर्ती तयार करताना मी फक्त एकच गोष्ट लक्षात ठेवतो.

राजा : ती कोणती?

मूर्तिकार : त्या दगडातील मला नको असलेला भाग तेवढाच मी छिन्नीच्या सहाय्याने काढून टाकतो. मूर्ती आपोआप तयार होते.

राजा : वा ! शाब्बास.

©KTBS Not to be republished

प्रधान : महाराज एवढेच नाही. एकाच प्रकारच्या तीन मूर्ती तयार केलेल्या आहेत. आपण त्या पहाव्या.

राजा : अरे वा छान ! अगदी हुबेहुब एक सारख्याच आहेत या.

प्रधान : पण महाराज, एक सारख्या जरी दिसत असल्या तरी तो त्यांची वेगवेगळी किंमत सांगतो आहे. तेच मला काही कळलेलं नाही.

राजा : तीनही मूर्ती एकसारख्याच. काही फरक नाही. तरीही किंमत वेगवेगळी? हे कसे काय?

प्रधान : होय महाराज, हा सांगतोय त्याप्रमाणे या पहिल्या मूर्तीची किंमत शंभर मोहरा, दुसऱ्या मूर्तीची किंमत एकसहस्त्र मोहरा, आणि तिसऱ्या मूर्तीची दशसहस्त्र मोहरा आहे.

राजा : प्रधानजी सांगतात हे खरे आहे का?

मूर्तिकार : (नम्रपणे वाकून) होय महाराज. हे अगदी खरे आहे.

राजा : या मूर्तीसाठी वापरलेला दगड वेगवेगळा आहे का?

मूर्तिकार : नाही महाराज. एकच दगड तीनही मूर्तींना वापरलेला आहे.

राजा : पण मग किंमत वेगवेगळी कशी? मला याचे स्पष्टीकरण हवे आहे.

मूर्तिकार : महाराज या तीनही मूर्ती दिसायला जरी सारख्याच असल्या तरी त्यामध्ये प्रत्येकी एक फरक दडलेला आहे. जो मानवाच्या स्वभावाला लागू पडतो.

राजा : मानवाचा स्वभाव या मूर्तींमध्ये दडलेला आहे?

मूर्तिकार : होय महाराज. या पहिल्या मूर्तीच्या एका कानातून घातलेला दोरा दुसऱ्या कानातून बाहेर पडतो. हे पहा.

(मूर्तिकार दोरा एका कानातून घालून दुसऱ्या कानातून बाहेर पडलेला दाखवतो)

©KTBS Not to be republished

राजा : यामध्ये कोणता गुण दडलेला आहे?

मूर्तिकार : मनुष्य एका कानाने ऐकून लगेच दूसऱ्या कानाने सोडून देतो. म्हणजेच 'नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे' या प्रमाणे ही मूर्ती असल्याने हिची किंमत फक्त शंभर मोहरा आहे.

राजा : बर ! दुसऱ्या मूर्तीचे काय वैशिष्ट्य आहे?

मूर्तिकार : एका कानातून घातलेला दोरा हिच्या तोंडातून बाहेर पडतो. म्हणजे अशी व्यक्ती, ऐकलेल पटदिशी दुसऱ्याला बोलून मोकळी होते. म्हणून या मूर्तीची किंमत एकसहस्त्र मोहरा आहे.

राजा : आणि ही तिसरी मूर्ती?

मूर्तिकार : महाराज या तिसऱ्या मूर्तीच्या कानातून घातलेला दोरा सरळ जाऊन मूर्तीच्या डोक्यात गोळा होतो. तो कुठूनही बाहेर पडत नाही.

प्रधान : म्हणजे?

मूर्तिकार : म्हणजे अशा प्रकारची व्यक्ती ऐकून मिळविलेले ज्ञान आपल्या मेंदूत साठवून ठेवतो. जेंव्हा गरज पडेल तेव्हाच त्या ज्ञानाचा वापर करतो. म्हणून हिची किंमत दशसहस्त्र मोहरा आहे.

(राजा व प्रधान मूर्तिकाराच्या उत्तराने खूष होतात.)

राजा : व्वा ! खरच तू उत्तम मूर्तिकार आहेस. माझ्या सर्व शंकांच तू निरसन केलस.

(राजा गळ्यातील रत्नहार मूर्तिकाराला देऊन त्याचा सन्मान करतो.)

मूर्तिकार : धन्यवाद महाराज.

©KTBS Not to be republished

## स्वाध्याय

### अ. नवीन शब्दांचे अर्थ.

मुक्तकंठाने  मोकळ्या मनाने,  कठीण  कडक

निरसन करणे  निवारणे,  कणखर  कठिण

मोहरा  पूर्वीची सोन्याची नाणी,  छिन्नी  दगडाला आकार द्यायचे साधन

### आ. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

1. कलेच्या रुपाने समाजाची सेवा कोण करतो?
2. राजा मूर्तिकाराकडे काय घेऊन गेला होता?
3. मूर्तिकार कशाप्रकारच्या मूर्ती तयार करत होता?
4. पहिल्या मूर्तीची किंमत किती मोहरा होती?
5. तीन मूर्तींना कोणता दगड वापरला होता?
6. दुसऱ्या मूर्तीचे वैशिष्ट्य कोणते होते?
7. सर्वश्रेष्ठ मूर्ती कोणती?
8. मूर्तीतील फरक कोणाच्या स्वभावाला लागू पडतात?

### इ. खालील प्रश्नांची उत्तरे 3 ते 4 वाक्यात लिही.

1. मूर्ती बनवणे हे काम कठिण का असते?
2. मूर्तिकार मूर्ती तयार करताना कोणती गोष्ट लक्षात ठेवतो?
3. मूर्तिकाराने तयार केलेल्या मूर्तींची किंमत किती किती होती?
4. पहिल्या मूर्तीमध्ये कोणता मनुष्यगुण दडलेला होता?
5. दुसऱ्या मूर्तीचे वैशिष्ट्य कोणते?
6. तिसरी मूर्ती सर्वश्रेष्ठ का होती?

© KTBS Not to be republished

## ई. खालील 'अ' 'ब' 'क' गटातील जोड्या जुळव.

| | 'अ' | 'ब' | 'क' |
|---|---|---|---|
| 1. | पहिली मूर्ती | एकसहस्त्र मोहरा | ज्ञान ग्रहण करणे |
| 2. | दुसरी मूर्ती | दशसहस्त्र मोहरा | नळी फुंकली सोनारे, इकडून तिकडे गेले वारे. |
| 3. | तिसरी मूर्ती | एक शतक मोहरा | हलक्या कानाचा |

## उ. समानार्थी शब्द शोधून लिही.

अतिशय  राजा  मनोहर  खूप  कसोटी

नृप  तारीफ  परिक्षा  सुंदर  प्रशंसा

1) .........., ..........

2) .........., ..........

3) .........., ..........

4) .........., ..........

5) .........., ..........

## ऊ. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या उलट अर्थाचे शब्द मोकळ्या जागेत भरुन वाक्य पूर्ण कर.

1. मूर्तिकार <u>कष्टाळू</u> होता. तो .............. नव्हता.

2. मूर्तीसाठी <u>मृदू</u> दगड चालत नाहीत. त्यासाठी .............. दगड योग्य असतात.

©KTBS Not to be republished

3. राजा भ्याड नव्हता. तो .............. होता.

4. राजाने मूर्तिकाराची प्रशंसा केली. .............. केली नाही.

5. प्रधान हा स्वार्थी नव्हता. तो .............. होता.

**ए. खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करुन लिही.**

1. वेळ
2. सुंदर
3. कठीण
4. मूर्ती



खालील काही वाह्यरेषांनी आकृत्या काढलेल्या आहेत. त्यावरुन हे नेते ओळखा व त्यांची नावे लिहा.

1) ........................
2) ........................
3) ........................
4) ........................
5) ........................
6) ........................
7) ........................
8) ........................

Not to be republished ©KTBS

## व्याकरण

# शब्दांच्या जाती.

शाळेतील सकाळची प्रार्थना झाली. मुले मुली सर्वजण शिस्तीने वर्गात बसले. शिक्षक वर्गात आले. सर्वांनी त्यांना नमस्कार केला. शिक्षकांनी सर्वांकडुन एकसुरात एक कविता म्हणून घेतली. नंतर शिक्षक म्हणाले, 'आता मला सांगा आपण का बोलतो'? सर्वजण गप्प बसले. शिक्षकांनी पुन्हा तोच प्रश्न विचारला.

गौरी : आम्हाला आमच्या मनात काय आहे हे सांगावं असं वाटतं म्हणून बोलतो.

शिक्षक : बरोबर आहे. आपल्या मनातील विचार दुसऱ्याला समजावेत यासाठी आपण बोलतो. मग मला आता सांगा. बोलणे कसे बनते? (सारी मुलेमुली गप्पच बसली. तेवढ्यात परशुराम उभा राहिला)

परशुराम : बोलणे बोलल्याने बनते.

शिक्षक : आता या फळ्यावर काय लिहितो ते, परशुराम तू वाच.
(शिक्षकांनी फळ्यावर म, प, पग, सरग पतट हे शब्द लिहिले. परशुरामने ते वाचले.) हे काय आहेत?

परशुराम : ती अक्षरे आहेत व काही शब्द आहेत. असे वाटते, पण त्या शब्दांचा काही अर्थ लागत नाही.

शिक्षक : आता पुढील शब्द, प्रतिभा तू वाच.
(शिक्षकांनी फळ्यावर मी, तू, आण, बघ, बस, पहाट हे शब्द लिहिले. प्रतिभाने ते वाचले.)

शिक्षक : परशुरामने वाचले ते, आणि प्रतिभाने वाचले ते, यात काय फरक आहे?

रोहन : परशुरामने वाचलेल्याचा अर्थच समजत नाही. आणि प्रतिभाने वाचलेल्याचा अर्थ समजतो.

शिक्षक : शाब्बास । आता लक्षात घ्या. ज्या एक किंवा अनेक अक्षरांच्या

©KTBS Not to be republished

समुहापासून काही अर्थ समजतो त्याना शब्द म्हणतात. आता सांगा बोलणे कसे बनते?

रॉबर्ट : बोलणे शब्दांनी बनते.

शिक्षक : तुम्ही खूपच हुषार आहात. आता मला सांगा शब्दांच्या जाती किती?माहीत आहेत का?

गौतम : शब्दांच्या जाती आठ आहेत.

शिक्षक : अरे व्वा । तुला कसे रे माहीत?

गौतम : माझ्या ताईने मला सांगितले.


शिक्षक : शब्दांच्या जातींची नावे माहीत आहेत का?

गौतम : नाम, सर्वनाम आणि असेच काही तरी ताई सांगत होती.

शिक्षक : ऐका तर, नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय आणि केवलप्रयोगी अव्यय ह्या शब्दांच्या आठ जाती आहेत.

राजू : ह्या सगळ्या जाती कशा लक्षात ठेवायच्या?

शिक्षक : हे पहा, तुम्हाला चित्र काढायला आवडते ना? मी फळ्यावर एक चित्र काढतो. ते तुम्ही पण काढा. ते चित्र आठवल की सगळं लक्षात राहील.




© KTBS Not to be republished

## पाठ 3

# कडुनिंब

कडुनिंबाला काहीजण 'निंब' किंवा 'लिमडा' असेही म्हणतात. हे झाड देखील मूळचे भारतातलेच. परंतु ते आता श्रीलंका आणि मलेशिया येथेही मोठ्या प्रमाणावर दिसते. ते कोणत्याही प्रकारच्या वातारणात चांगले वाढू शकते. परंतु बहुधा ते कोरड्या प्रदेशात चांगले वाढते.

हे झाड सदाहरित वृक्षांच्या जातीत मोडते. याचा आकार मध्यम असतो. ते साधारण 20 ते 25 फूट उंच वाढते. हे झाड लवकर वाढते. त्याची साल उदी रंगाची असते. फांद्या जमिनीपासून बऱ्याच उंचीवरुन फुटू लागतात. कमी पावसाच्या प्रदेशात मात्र ह्या झाडाची पाने एकदा गळून पडतात. वर्षभर ह्याला नवीन पालवी फुटतच राहते. परंतु हिवाळ्यात गळून पडलेल्या पानांची जागा मार्च एप्रिलमध्ये आलेली नवीन पाने भरुन काढतात. पाने हिरवी व रसरशीत असतात. नवीन पाने किंचित लालसर, तांबडी असतात. ती चमकदार असतात. फांद्यांच्या टोकाला गोलाकार अशी पाने येतात. ह्या झाडांची पाने इतर झाडापेक्षा जास्त प्रमाणात कार्बनडाय ऑक्साइड वायू भराभर घेतात.त्यामुळे त्यापासून जास्त प्रमाणात प्राणवायू बाहेर सोडतात. म्हणूनच हे झाड बागांमध्ये व घराच्या आसपास मोठ्या प्रमाणात लावतात. ह्यामुळे शुध्द हवेचा पुरवठा जास्त होतो. पानांच्या कडा नागमोडी असतात. त्यामुळे त्याला कातरे कातरे असल्यासारखे वाटतात. फुले अगदी छोटी असून ती चांदण्यांच्या आकाराची असतात. त्यांचा रंग फिकट पिवळा असतो. ती पानाखाली लपलेली असल्यामुळे सहज दिसत नाहीत. ती पावसाळ्यातही फुलतात. त्यांच्या गोड सुवासामुळे कीटक आकर्षिले जातात.




©KTBS Not to be republished

त्यांची फळे छोटी, लांबट आकाराची असतात. त्यांना निंबोण्या असे म्हणतात. निंबोण्या प्रथम हिरव्या असून तोडल्या असता, चिकट दुधासारखा रस त्यातून बाहेर येतो. त्या पिकल्या की पिवळ्या होतात. पक्षी आणि गांधील माशी यासारख्या कीटकांना त्यातील गोड रस आवडतो. पावसाळ्यानंतर मात्र त्या निंबोण्या कुजल्यामुळे कुजट वास येऊ लागतो.







उत्तर भारतात ही झाडे रस्त्याच्या दुतर्फा सावलीसाठी मोठ्या प्रमाणावर लावलेली दिसतात. कडुनिंबाच्या बियांपासून फारच उपयुक्त असे कडुनिंबाचे तेल तयार करतात. त्याचा उपयोग कातडीच्या रोगांमध्ये केला जातो. झाडाचे लाकूड जड असते. त्यापासून कीटक दूर राहतात त्यामुळे हे लाकूड पोखरले जात नाही. त्याचा उपयोग होड्या तयार करण्यासाठी केला जातो. त्याच्या लहान काड्यांचा उपयोग दात घासण्यासाठी आणि दंतमंजनामध्ये केला जातो. साधारणत: खेडेगावाकडील लोक कडुनिंबाचा जास्त उपयोग करतात. पानांचा उपयोग उबाळू झाले असता त्यावर बांधण्यासाठी करतात. उत्तर भारतात ही झाडे इतकी जोमाने वाढून भक्कम झालेली असतात की ह्या झाडाच्या फांद्याना दोर बांधून खुशाल झोके देखील सहज घेता येतात. हे झाड खूप औषधोपयोगी आहे.

©KTBS Not to be republished

## स्वाध्याय

### अ. नवीन शब्दांचे अर्थ

सदाहरित सतत हिरवेगार

दुतर्फा दोन्ही बाजूंनी

उबाळू गळू, मोठा फोड

जोमाने जोराने,वेगाने

पालवी अंकुर, कोवळी पाने

### आ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

1. कडुनिंबाचे झाड कोठे आढळते?
2. सदाहरित वृक्ष म्हणजे काय?
3. कडुनिंबाची झाडे कोणता वायू घेतात?
4. कीटक कडुनिंबाच्या झाडाकडे का आकर्षिले जातात?
5. कडुनिंबाची फुले कशी असतात?

### इ. खालील प्रश्नांची उत्तरे दोन तीन वाक्यात लिही.

1. कडुनिंबाचे झाड बागेत का लावतात?
2. कडुनिंबाच्या बियापासून काय तयार करतात?
3. त्याचा कशासाठी उपयोग होतो?
4. कडुनिंबाच्या लाकडाचा उपयोग कशासाठी केला जातो?

©KTBS Not to be republished

## ई. जोड्या जुळव.

| अ | ब |
|---|---|
| 1. कडुनिंबाचा वृक्ष | 1.छोटी,चांदण्याच्या आकाराची असतात. |
| 2. कडुनिंबाची पाने | 2.दात घासण्यासाठी उपयोग करतात. |
| 3. कडुनिंबाची फुले | 3.उदी रंगाची असते. |
| 4. कडुनिंबाच्या काड्या | 4.साधारण 20 ते 25 फूट उंच वाढतो. |
| 5. कडुनिंबाची साल | 5.हिरवी व रसरशीत असतात. |

## उ. रिकाम्या जागा भर.

1. कडुनिंबाला कांहीजण ............ किंवा ............ असे म्हणतात.
2. ह्या झाडाची पाने वर्षातून एकदा ............ पडतात.
3. पानांच्या कडा ............ असतात.
4. कडुनिंबाचे झाड खूप............ असते.

## ऊ. खालील शब्दांचा वाक्यात उपयोग कर.

1. सदाहरित
2. रसरशीत
3. चमकदार
4. नाग मोडी
5. दुतर्फा
5. औषधोपयोगी

## ए. उलट अर्थाचे शब्द लिही.

1. शुध्द
2. फिकट
3. आकर्षण
4. वाढणे

©KTBS Not to be republished

# व्याकरण

कोणी जर विचारलं की आपण का बोलतो? तेव्हा प्रत्येकाकडून वेगवेगळी उत्तरं मिळतात. परंतु योग्य उत्तर असं आहे की

* आपल्या मनातील विचार दुसऱ्याला समजावेत म्हणून आपण बोलतो.

बोलणे कसे बनते?

बोलणे शब्दापासून बनते.

मग, शब्द म्हणजे काय?

* ज्या एक किंवा अनेक अक्षरांच्या समूहापासून काही तरी अर्थबोध होतो त्याला 'शब्द' म्हणतात.

* **शब्दांच्या जाती आठ आहेत.**

1. नाम 2. सर्वनाम 3. विशेषण

4. क्रियापद 5. क्रियाविशेषण 6. शब्दयोगी अव्यय

7. उभयान्वयी अव्यय 8. केवलप्रयोगी अव्यय

शब्द दोन प्रकारात विभागले गेले आहेत.

1. विकारी 2. अविकारी

* **विकारी शब्द :** ज्या शब्दांचा वाक्यात उपयोग करताना त्यांच्या मूळ स्वरुपात बदल करावा लागतो, त्यांना विकारी शब्द म्हणतात.

उदा. आईने लाडू दिला.

या वाक्यात 'आई' या मूळ शब्दाचा वापर करताना 'आईने' असा बदल केला आहे.

* **लक्षात ठेवा :** नाम, सर्वनाम, विशेषण आणि क्रियापद हे विकारी शब्दांचे प्रकार आहेत.

©KTBS Not to be republished

* **अविकारी शब्द :** ज्या शब्दांचा वाक्यात उपयोग करताना त्यांच्या मूळ स्वरुपात बदल करावा लागत नाही, त्यांना **अविकारी** शब्द म्हणतात. यानाच अव्यय असेही म्हणतात.

* **लक्षात ठेवा :** क्रियाविशेषण, शब्दयोगी अव्यय, उभान्वयी अव्यय आणि केवलप्रयोगी अव्यय हे अविकारी शब्दांचे प्रकार आहेत.

## नाम

आपण आपल्या अवतीभोवती विविध गोष्टी बघतो. त्यांपैकी काही सजीव असतात. तर कांही निर्जीव असतात. कांही डोळ्यानी दिसतात, तर काही कल्पनेने मानल्या जातात. एखाद्या गोष्टीचा गुणधर्म डोळ्यानी प्रत्यक्ष दिसत नाही, परंतु कल्पनेने तिचे अस्तित्व मात्र मानले जाते. उदा. प्रामाणिकपणा, गारवा, वात्सल्य इत्यादी. तसेच स्वर्ग, नरक, पाताळ, अमृत, परी ह्या गोष्टीही दिसत नाहीत. परंतु कल्पनेने त्या आहेत, असे मानले जाते.

व्यवहारात फक्त प्रत्यक्ष दिसणाऱ्या गोष्टीला उद्देशून 'वस्तू' हा शब्द वापरला जातो. तथापि व्याकरणात प्रत्यक्ष दिसणाऱ्या व काल्पनिक अशा सर्व गोष्टीना उद्देशून 'वस्तू' हा शब्द वापरला जातो. अशा प्रत्येक वस्तूला कोणते तरी नाव दिले जाते. ह्या नावालाच '**नाम**' असे म्हणतात.

* **खालील वाक्यांतील नामे ओळखून लिहा.**

1. चांगले दोन अडीच तास खपल्यावर त्यांचे भारे तयार झाले.
2. ही गुलाबाची फुलं तुम्ही सगळ्या बायका केसात माळून घ्या आणि उरलेली तुमच्या देवालाही वहा.
3. सुधीर हा धाडसी मुलगा आहे.

* **खालील नामांचा वाक्यात उपयोग करा.**

वाडा, नदी, रान, खेळाडू, धरती, कोकरु, कौशल्य.

©KTBS Not to be republished

आतापर्यंत आपण नामाविषयी माहिती मिळविली आहे. तरीही पुन्हा एकदा त्याचा अधिक अभ्यास करु. त्यासाठी पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे निरीक्षण करा.

1. सुनील हा खूप हुषार मुलगा आहे.
2. हिमालय हा जगातील सर्वात उंच पर्वत आहे.
3. मलप्रभा ही नदी खानापूरजवळून वाहते.
4. बंगालमध्ये भरपूर तांदूळ पिकतो.
5. अजयला पोपट व कुत्रा पाळायला आवडतात.
6. माणसाच्या अंगी नम्रता व सचोटी असावी.

वरील वाक्यातील प्रत्येक अधोरेखित शब्द पाहा.

'सुनील' हे मुलाचे नाव आहे. 'हिमालय' हे पर्वताचे नाव आहे. 'मलप्रभा' हे नदीचे नाव आहे. 'खानापूर' हे गावाचे नाव आहे. 'तांदूळ' हे धान्याचे नाव आहे. 'पोपट' हे पक्ष्याचे नाव आहे. 'नम्रता' व 'सचोटी' ही व्यक्तींच्या गुणांची नावे आहेत. अशा प्रकारच्या सर्व शब्दांना व्याकरणात 'नाम' म्हणतात.


प्रत्यक्ष दिसणाऱ्या किंवा कल्पनेने जाणलेल्या कोणत्याही वस्तूला किंवा तिच्या गुणधर्माला जे नाव दिले जाते. त्याला नाम असे म्हणतात.

उदा. मुलगा, कारवार, देव, सिंह, कावेरी, चाफा, शौर्य, धिटाई.

© KTBS
Not to be republished

पाठ 4

# मधमाशी



उठुनी सकाळी ती मधमाशी
जाते की मध मिळवायासी
थेंबे थेंबें साठवि त्यासी
उद्योगी मोठी ॥1॥
आळस तिजला ठाऊक नाहीं
सर्वदिवस ती खपते पाही
थंडी ऊन म्हणेना कांही
उद्योगी मोठी ॥ 2॥
गोडगोड मध निपटुनि घेते
थोडा म्हणूनी मुळी न रुसते
साठवुनी तो जपुनि ठेविते
उद्योगी मोठी ॥3॥
थोडाही गुण मिळता घ्यावा
साठा त्याचा नित्य करावा
कोणालाही तो शिकवावा
ठेवा हे चित्ती ॥4॥

* संकलित *



©KTBS Not to be republished

## स्वाध्याय

**अ. नवीन शब्दांचा अर्थ.**

| | |
|---|---|
| तिजला | तिला |
| खपते | राबते, श्रम घेते. |
| चित्ती | मनामध्ये |

**आ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.**

1. मधमाशी काय मिळवावयास जाते?
2. मधमाशी मध कसा साठविते?
3. आळस कोणाला ठाऊक नाही?
4. नित्य कशाचा साठा करावा असे कवी म्हणतो?
5. मिळालेल्या गुणाचा वापर कशासाठी करावा?

**इ. खालील ओळींचा अर्थ तुमच्या शब्दात स्पष्ट करा.**

आळस तिजला ठाऊक नाहीं
सर्वदिवस ती खपते पाही
थंडी ऊन म्हणेना कांही
उद्योगी मोठी ॥ 2 ॥

**ई. कवितेत वर्णन केलेल्या मधमाशीचे गुण चार ते पाच वाक्यात लिही.**

**उ. मधमाशी प्रमाणे सतत उद्योगी असणाऱ्या कीटकांची यादी कर.**

©KTBS Not to be republished

पाठ 5

# वीर हुतात्मा नारायण

पूर्वी आमचा देश सुसंस्कृत व श्रीमंत होता. जगातील एक महान देश असा त्याचा गौरव होता. शूरवीरांची त्याला परंपरा अजूनही आहे. अशा आमच्या भारत देशात ब्रिटीश लोक व्यापाराच्या निमिताने आले. भारतातील राजे लोकांत एकी नव्हती की जनतेत सुशिक्षितपणा. याचा गैर फायदा इंग्रजांनी घेतला आणि पूर्ण भारतदेशावर वर्चस्व मिळविले. त्यांना आपल्या देशातून हाकलून काढण्यासाठी अनेक युध्दे झाली. अनेक चळवळी झाल्या, परंतु भारतीयांना यश येत नव्हते. इंग्रजांची दडपशाही, भारतीयांवर होणारे अन्याय याला जनता कंटाळली होती. भारतातील सारे वैभव लुटून भारतमातेला अतिशय दीन परिस्थितीला आणण्यास इंग्रज कारणीभूत होते. म्हणून भारतीयांची मने रागाने खदखदत होती.



9 ऑगस्ट 1942 या दिवशी महात्मा गांधीनी इंग्रजांना 'चलेजाव' असा इशारा दिला. संपूर्ण देशात गांधीजीना पाठिंबा देण्यासाठी मोर्चे, मिरवणुकांचे आयोजन करण्यात आले. असाच एक मोर्चा हुब्बळ्ळी येथे 15 ऑगस्ट 1942 रोजी आयोजित केला होता. ढगाळ पावसाळी वातावरण होते. अनेक लहान, मोठे, स्त्री पुरुष ठरल्याप्रमाणे सकाळी हुब्बळ्ळीतील दुर्गदबैल या ठिकाणी जमू लागले. प्रत्येकाच्या हातात तिरंगा झेंडा किंवा इंग्रजानो चालते व्हा असे सांगणारे फलक होते. नारायण महादेव

Not to be republished ©KTBS

डोणी हा हुब्बळ्ळीतील लॅमिंग्टन हायस्कूलमध्ये शिकणारा तेरा वर्षाचा मुलगा. सकाळी लवकर उठला. अंघोळ करुन खादीचे कपडे घातले. डोकीवर गांधीटोपी घातली. घराच्या मागे ठेवलेली एक बारीक बांबूची काठी घेऊन त्याला तिरंगा बांधला. झोपलेल्या आईला उठविले. हातात तिरंगा घेऊन उभ्या असलेल्या मुलाला पाहिल्यावर आईला काहीच समजेना. नारायण आईला म्हणाला ''आई मी आज चलेजाव चळवळीच्या मोर्चात जात आहे.'' आई म्हणाली ''बाळ तू लहान आहेस. मोर्चा मोठ्यांसाठी आहे. तू जाऊ नकोस''. ''लहान मोठ्याचा इथे संबंध नाही, भारतमाता स्वतंत्र झाली पाहिजे हे महत्वाचे आहे. मला आशीर्वाद दे ! '' नारायण म्हणाला.

'' देव तुला सामर्थ्य देवो, काळजी घे'' आईने नारायणला आशीर्वाद दिला. नारायण दुर्गदबैल येथे आला. त्याचे तेजस्वी डोळे, त्याच्या चेहऱ्यावरील उत्साह पाहून सर्व लोकांनी त्याला मोर्चाच्या अग्रभागी उभे केले. मोर्चा सुरु झाला. 'ब्रिटीशानो चालते व्हा' 'भारतमाताकी जय' 'वंदे मातरम् ' अशा घोषणानी परिसर दुमदुमून गेला. अनेक लोक मोर्चा पहात होते. त्या लोकांना नारायणच मोर्चाचे नेतृत्व करतोय की काय असे वाटत होते. इंग्रज अधिकारी रागाने धुमसत होते. त्यांनी अचानक गोळीबार सुरु केला. मोठी माणसे वाट मिळेल तेथून सैरावैरा पळू लागली. पण नारायण एकाच ठिकाणी ठामपणे उभा राहून घोषणा देत होता. त्याच्या हातात तिरंगा फडकत होता. इतक्यात बंदुकीची गोळी नारायणाच्या छातीत घुसली. तो रक्ताच्या थारोळ्यात पडला. त्याला इस्पितळात दाखल केले. तेथे तो शेवटच्या घटका मोजत होता. त्याला कोणी तरी विचारले, ''तुला काय पाहिजे?'' नारायणाने ''स्वराज्य'' हा शब्द उद्‌गारुन आपला प्राण सोडला.

आजही हुब्बळ्ळी शहरात नारायण महादेव डोणी हे नाव आदराने घेतले जाते.

©KTBS
Not to be republished

## स्वाध्याय

### अ. नवीन शब्दांचे अर्थ.

| | | | |
|---|---|---|---|
| सुसंस्कृत | चांगले संस्कार | दीन | गरीब |
| स्वराज्य | स्वत:चे राज्य | अग्रभागी | सर्वात पुढे |
| हुतात्मा | देशासाठी मरण पत्करणारा | तेजस्वी | बाणेदार |

### आ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1. आपल्या देशाला कशाची परंपरा आहे?
2. देशातील जनता का कंटाळली होती?
3. चलेजाव चळवळ कोणी सुरु केली?
4. नारायण कोठे शिकत होता?
5. आईने नारायणाला कोणता आशीर्वाद दिला?
6. गोळीबार कोणी सुरु केला ?
7. बंदुकीची गोळी नारायणला कोठे लागली?
8. नारायणने कोणता शब्द उच्चारुन प्राण सोडला?
9. त्या ठिकाणी तू असतास तर काय केले असतेस?
10. आजही हुब्बळ्ळी शहरात कोणाचे नाव आदराने घेतले जाते?

### इ. रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द निवडून लिही.

(सैरावैरा, 1942, दुर्गदबैल, तिरंगाध्वज, महान, व्यापाराच्या, अग्रभागी)

1. भारत हा एक ............... देश आहे.
2. ब्रिटीश भारतात ............... निमित्ताने आले.
3. चलेजाव चळवळ ............... साली झाली.
4. मोर्चा हुबळीतील ............... ठिकाणी होता.

©KTBS Not to be republished

5. नारायणला मोर्चाच्या ............... उभे केले होते.

6. बांबूच्या काठीला ............... बांधला होता.

7. मोठी माणसे ............... पळू लागली.

## ई. खालील प्रश्नांची दोन तीन वाक्यात उत्तरे लिही.

1. पूर्वी देशावर इंग्रजांनी कसे वर्चस्व मिळविले?
2. माणसांच्या हातात काय काय होते?
3. नारायणचा पोशाख कसा होता?
4. आई नारायणाला का जाऊ देत नव्हती?
5. त्याला मोर्चाच्या अग्रभागी का उभे केले होते?
6. लोक मोर्चात कोणकोणत्या घोषणा देत होते?
7. नारायण मोर्चामध्ये काय करत होता?

## उ. खाली दिलेल्या शब्दांचा नमुन्याप्रमाणे वाक्यात उपयोग कर.

**नमुना :** सुसंस्कृत आपला भारत देश सुसंस्कृत देश आहे.

1. गौरव
2. चळवळ
3. अन्याय
4. वैभव
5. स्वतंत्र
6. आशीर्वाद
7. घोषणा
8. स्वराज्य
9. प्राण

©KTBS Not to be republished

ऊ. खालील शब्दातील फरक शिक्षकांच्या मदतीने समजून घेऊन लिही.

**नमुना :** दीन गरीब दिन दिवस

1. खून
   खूण
2. सूत
   सुत
3. चिता
   चित्ता
4. शिर
   शीर

## नामाचे प्रकार

* खालील तक्ता वाच

| गट पहिला | गट दुसरा | गट तिसरा |
|---|---|---|
| समुद्र | अरबी समुद्र | खारटपणा |
| नदी | कावेरी | गोडी |
| गाव | उचगाव | निर्मलता |
| महानगर | बेंगळूरु | श्रीमंती |
| देश | भारत | शौर्य |
| खंड | आशिया | भव्यता |
| मुलगा | रमेश | साहस |
| मुलगी | राधिका | प्रामाणिकपणा |
| पर्वत | हिमालय | गारवा |

वर दिलेला तक्ता पाहिल्यानंतर, असे लक्षात येईल की पहिल्या गटातील शब्द एखाद्या वस्तूला सामान्यपणे ओळखण्यासाठी दिलेली नावे दाखवितात. व दुसऱ्या गटात वस्तू नावाने ओळखण्यासाठी त्यावस्तूला दिलेली नावे आढळतात. तर तिसऱ्या गटातील शब्द त्या वस्तूचा, व्यक्तीचा किंवा स्थळाचा गुण दाखवितात.

©KTBS Not to be republished

* एकाच जातीच्या वस्तूंना सामान्यत: जी नावे देण्यात येतात. त्यांना 'सामान्यनाम' म्हणतात.

* एकाच जातीचे परंतु विशिष्ट वस्तू अथवा पदार्थ किंवा व्यक्तींना जाणीवपूर्वक मुद्दाम दिलेल्या नावाना 'विशेषनाम' म्हणतात. विशेषनामे विशिष्ट हेतूने दिलेली असतात.

* तिसऱ्या गटातील शब्द वाचल्यानंतर आपल्याला प्राणी, वस्तू, स्थळ इत्यादींचे गुण, स्वभाव, स्थिती समजते.ज्या नामावरुन प्राण्यांचा, वस्तूंचा गुण, स्वभाव, स्थिती इत्यादी समजतो. त्याला 'भाववाचक नाम' असे म्हणतात.

* नामाचे मुख्य प्रकार तीन आहेत.

  1. सामान्य नाम
  2. विशेषनाम
  3. भाववाचकनाम

©KTBS Not to be republished

## स्वाध्याय

पुढील तक्ता पूर्ण करुन तू नवीन शब्द लिही.

| | वस्तूचे नाव | पदार्थाचे नाव | स्थळाचे नाव | नदीचे नाव | गुणधर्म |
|---|---|---|---|---|---|
| उदा. | पुस्तक | दूध | विजापूर | गंगा | सौंदर्य |
| 1. | | | | | |
| 2. | | | | | |
| 3. | | | | | |
| 4. | | | | | |

पाठ 6

# आपला मित्र साप!

गणपतीसाठी बरीच नातेवाईक मंडळी गावाकडे जमली होती. पावसाची रिपूरिप् नुकतीच थांबली होती. ताट पाट आवरुन उरलं सुरलं काढून ठेवून राधावहिनी नी माझी आई दुपारच्या कामातून मोकळ्या होत होत्या. आजोबा, काका, बाबा आणि इतर मित्रमंडळी सुपारी चघळत हवामान, पीक पाण्याच्या गप्पा करत करत बसली होती. नी अचानक हाळी आली. ''श्रीपती ऽऽऽऽ ए ऽऽ शिरपा ऽऽऽ. '' आमचा श्रीकाका दणक्यात उठला. पुन: दुसरी हाळी आली, ''शिरपा ऽऽऽ. '' आता काकाचे मित्रही उठले. तोवर परसदारात गावचे गुरुजी, पाटलांसोबत पोहोचलेही.

''शिरपा ऽ , साप रे साप !'' ते ऊद्गारले. श्रीकाकाला सर्व गाव सर्पमित्र म्हणून ओळखत. तो मित्रांसोबत गणपतीसाठी गावी आला आहे हे गुरुजींना माहित होते. ते म्हणाले, '' चला पोरांनो, तुमची परिक्षाच आहे आज, असं समजा. दहा बारा लोक काठ्या कोयती घेऊन सापासाठी गेलीत. चला चला!'' श्रीकाका आणि त्याचे मित्र शर्टाच्या बाह्या वर करीत लगबगीने निघालेच. आजोबांनी तोवर ट्रॅक्टर सुरुपण केला. श्रीकाका निघता निघता खांद्यावरची पिशवी आणि त्यात काही पिशव्या घालायला मात्र विसरला नाही.



देसाई अण्णांच्या शेताजवळ ही ऽऽ झुंबड उडाली होती. श्रीकाका आणि त्याचे मित्र गर्दीत घुसले. मी बाबांच्या खांद्यावर बसलो होतो. बाबा पाठोपाठ काकाही घुसले. जिथं साप लपला होता तिथं आसपास हत्यारं

©KTBS Not to be republished

घेऊन तरुण लोक गोल करुन घाव घालण्याच्या तयारित थांबले होते. त्यांचे चेहेरे भीतीने कसेनुसे झाले होते. आसपासच्या साऱ्यांची भीतीने गाळण उडाली होती. काकाने आधी गर्दी पांगवली. त्याने अडगळीतलं लाकूड हलविलं, तसा साप जीवाच्या आकांतानं सळसळत बाहेर आला. श्रीकाका तयारीतच होता. त्यानं सापालाच शोभेलशा चपळाईने त्याच्या मानेवर हात दाबून धरला, श्रीकाकाने आणलेल्या पिशवीत तो साप सोडला अन् पिशवीचे तोंड घट्ट बंद केलं. लोकांनी गिल्ला केला. श्रीकाका म्हणाला, ‘‘ गुरुजी, धामण आहे धामण ! काय रंग आहे !’’ लोक म्हणाले, ‘‘ मारा तिला मारा !’’ श्रीकाकाने पिशवी गुरुजींच्या हातात दिली. मित्राबरोंबर तो पारावर चढला. गुरुजींनी लोकांना शांत राहाण्यास सांगितले, तरी गलबला सुरुच होता. अखेरीस तो म्हणाला, ‘‘ तुम्ही शांत नाही राहिलात तर हा साप मी परत तुमच्यात सोडेन बरं का !’’ लोक लागलीच चूप झाले. श्रीकाका म्हणाला, ‘‘ मित्रांनो, तुम्ही आधी शांत व्हा बरं ! साधी धामण आहे ती. चुकून वस्तीत शिरली आहे. घाबरली आहे ती, आम्ही तिला जंगलात सोडून येऊ. तुम्ही काळजी सोडा.’’



©KTBS Not to be republished

बिर्जे अण्णा ऊसळून म्हणाले, “ काळजी सोडा? तिला मारा, ती सूड घेईल, पुन: येईल.” काका हसून म्हणाला, “ हा गैरसमज आहे. अण्णा, माणसांसारखी स्मरणशक्ती सापांना नसते आणि त्यांची बुध्दीसुध्दा भूतकाळ लक्षात ठेवण्याएवढी विकसित झालेली नसते.” कल्लाप्पा पाटील अस्वस्थ होऊन म्हणाले, “ अरे पोरा, विषारी जनावरांना वेळीच चिरडावं, त्याला सोडण्यात काय शहाणपणा? ” श्रीकाकाचा मित्र म्हणाला, “ सगळेच साप विषारी नसतात. दादा, आपल्या अवतीभोवती आढळणाऱ्या सापामध्ये खूपच कमी साप खरोखर विषारी आहेत?

“ साप आम्हा शेतकऱ्यांचा मित्र आहे दादा. साप नाहीसे झाले तर धान्य खाणाऱ्या उंदरांना कोण खाईल? उंदरांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठीच निसर्गाने सापांना निर्माण केलंय असं समजा. ” श्रीकाका म्हणाला, “ मित्रांनो, साप सूड घेणारे, दंगेखोर, आक्रमक आहेत हे सगळे गैरसमज आहेत. प्रत्यक्षात तो एक शांतताप्रिय प्राणी आहे. प्राण्याप्रमाणे ते ‘ मासांहारी ’ आहेत, हे खरे. पण छोटे पक्षी आणि प्राणी खाऊन ते जगतात. आधी विषाने भक्ष्याला ठार करतात, आणि मग त्याला गिळतात. बिनविषारी साप भक्ष्याला वेटोळे घालून आवळून मारतो नी मग गिळतो. किडे, कीटक, पक्षी, बेडूक, उंदीर, घुशी, खारी, सरडे, पाली वगैरे त्यांचा आहार. माणसाला तो घाबरतो. मित्रांनों, भीतीपोटी स्वत:च्या रक्षणार्थ तो दंश करतो. धामण तर विनविषारी साप आहे.

नाग, मण्यार, घोणस, फुरसे, हरानाग आणि रात असे काही मोजकेच साप विषारी असतात. सरसकट सगळ्याच सापांना न मारण्याचा संकल्प आपण सोडू. “ तुमचं काय म्हणणं, गुरुजी?” गुरुजींनी जमलेल्या सगळ्याकडे पाहिले. लोकांचे चेहेरे समाधानी दिसत होते. देसाई अण्णा बिर्जेअण्णांच्या पाठीवर थाप मारुन म्हणाले,“ अण्णा, आज या पोरांनी अंजन घातलं डोळ्यात नी एक पाप करण्यापासून बचावलो आम्ही. चला सगळे मिळून चहा घेऊया आज ! ”

Not to be republished ©KTBS

## स्वाध्याय

### अ. नवीन शब्दांचे अर्थ

भक्ष  खाद्य

गिल्ला  तक्रार, बोंब

गाळण उडणे  तारांबळ उडणे

दंश करणे  चावा घेणे

### आ. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

1. गावाकडे मित्रमंडळी कशासाठी जमली होती?
2. गावातील लोक सर्पमित्र म्हणून कोणाला ओळखत?
3. आजोबानी कोणते वाहन सुरु केले?
4. झुंबड कोठे उडाली होती?
5. गर्दी कोणी पांगविली?
6. बिनविषारी साप भक्ष्याला कसे मारतो?
7. सर्वांनी कोणता संकल्प केला?
8. सगळेच साप विषारी नसतात असे कोणी म्हटले?

### इ. खालील प्रश्नांची उत्तरे दोन तीन वाक्यात लिही.

1. जेवणानंतर मंडळी कोणत्या गप्पा करीत होती?
2. सापापाठी कोणकोण गेले?
3. श्रीकाकाने कोणकोणते साहित्य घेतले?
4. श्रीकाकाने सापाबद्दल कोणती माहिती सांगितली?

©KTBS Not to be republished

5. सापाबद्दल कोणते गैरसमज लोकांमध्ये आहेत?

6. साप शेतकऱ्यांचा मित्र कसा?

7. सापाचा आहार कोणता?

8. सापाचे प्रकार कोणकोणते आहेत?

9. विषारी साप भक्ष कसे पकडतात?

10. साप पाहिल्यानंतर तू काय करशील?

## ई. रिकाम्या जागी योग्य शब्द भर.

1. पावसाची ............ नुकतीच थांबली होती?

2. मी बाबांच्या ............ बसलो होतो.

3. साप जिवाच्या ............ सळसळत बाहेर आला.

4. लोकांनी ............ केला.

5. धामणीला ............त सोडून येऊ.

6. सगळेच साप ............ नसतात.

7. शेतकऱ्यांचा मित्र ............ ला म्हणतात.

8. भिती पोटी साप स्वत:च्या रक्षणार्थ ............ करतो.

9. धामण हा ............ साप आहे.

10. लोकांचे चेहरे ............ दिसत होते.

©KTBS Not to be republished


## उ. खालील प्रश्नांची उत्तरे चार पाच वाक्यात लिही.

1. जेवणांनतर आई, बाबा आणि मित्रमंडळी काय करीत होती?
2. सापाला कसे पकडले?
3. सापाला पकडल्यानंतर लोक काय काय बोलले?

## ऊ. खालील वाक्ये कोणी कोणाला म्हटली आहेत ते सांग.

1. "गुरुजी, धामण आहे धामण"
2. "मित्रांनो तुम्ही आधी शांत रहा बर"
3. "चला पोरानो, तुमची परीक्षाच आहे आज असे समजा"
4. "अण्णा, आज या पोरांनी अंजन घातल डोळ्यात"

©KTBS Not to be republished



## वचन

पुढील शब्दांचा उच्चार करा.    आंबा, मूल, गाडी, झाड, चिमणी. उच्चारावरुन या वस्तू प्रत्येकी एकच आहेत. असे आपल्याला कळते.

नामाच्या उच्चारावरुन वस्तू एक आहे की अनेक आहेत याचा बोध होतो. यालाच वचन असे म्हणतात.

मराठी भाषेत एकवचन व अनेकवचन अशी दोन वचने आहेत. जेव्हा नामाच्या उच्चरावरुन वस्तू एक आहे असा बोध होतो, तेव्हा त्या नामाचे एकवचन मानले जाते.

आता हे शब्द मोठ्याने उच्चार करुन म्हणा. आंबे, मुले, गाड्या, झाडे, चिमण्या या उच्चारावरुन वस्तू एकापेक्षा जास्त आहेत. असा अर्थ होतो.

जेव्हा नामाच्या उच्चारावरुन वस्तूंची संख्या एकापेक्षा अधिक आहे, असा बोध होतो. तेव्हा त्या नामाचे अनेकवचन मानले जाते.

मराठी भाषेतील काही नामांची एकवचनी व अनेकवचनी रुपे सारखीच असतात. उदा. उंदीर, खेळ, पतंग, शाळा, केस, पाय.

## स्वाध्याय

**1. खालील नामांची वचने ओळखून ती बदला.**

1. गाढव    2.वाडा    3. डबे

5. नद्या    6. वासरु

**2. खालील वाक्यातील अधोरेखित नामांची वचने बदलून वाक्ये पुन्हा लिही.**

1.घोडा धावतो.    2. झाड पडले.

3. कोल्हा पळून गेला.

©KTBS Not to be republished

### 3. जोड्या जुळव.

| अ | ब |
|---|---|
| 1. पुस्तक | चिमण्या |
| 2. खिडकी | पुस्तके |
| 3. चिमणी | खिडक्या |

### 4. कंसातील योग्य शब्द वापरुन वाक्ये पूर्ण कर.

1. सायकलीला दोन ................ असतात (चाक / चाके)
2. ताईने मुलांना ................ दिल्या (पिशवी / पिशव्या)
3. सुताराने खिडकीला ................बसविली (काच / काचा)
4. सरांनी मला ................ शिकविला.(धडा / धडे)
5. गवंड्याने ................ बांधली. (भिंत / भिंती )
6. राजाने पन्नास ................ आणले.(घोडा / घोडे)
7. हत्तीने ................ उचलून आणला.(ओंडका / ओंडके)
8. झाडावर ................ फुलली.(फूल / फुले)
9. खिडक्यांना नवीन ................ बसविला. (पडदा / पडदे)
10. आईने मला खायला ................ दिली.(पुरी / पुऱ्या)

## स्वाध्याय

### खालील शब्दांचे अनेकवचन लिही.

| एकवचन | अनेकवचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|
| वीट | ________ | पान | ________ |
| चिंच | ________ | दरवाजा | ________ |

©KTBS Not to be republished

| | | | |
|---|---|---|---|
| नदी | ____________ | खिडकी | ____________ |
| काठी | ____________ | मूल | ____________ |
| भाजी | ____________ | मुलगी | ____________ |
| भाकरी | ____________ | पाखरु | ____________ |
| तलवार | ____________ | गाणे | ____________ |
| झाड | ____________ | दिवा | ____________ |

* **खालील शब्दांचे वचन ओळखा.**

1. पिशवी
2. कागद
3. पराती
4. छत्र्या
5. जोडे
6. घोडे
7. साल
8. भिंत
9. खिडक्या
10. सळी.

**खालील शब्दातील फरक लक्षात घ्या.**


| अ | | ब | |
|---|---|---|---|
| **एकवचन** | **अनेकवचन** | **एकवचन** | **अनेकवचन** |
| घर | घरे | वृक्ष | वृक्ष |
| चावी | चाव्या | डोंगर | डोंगर |
| नदी | नद्या | देव | देव |
| खुर्ची | खुर्च्या | लाडू | लाडू |
| वेल | वेली | गहू | गहू |
| फूल | फुले | केस | केस |
| पुस्तक | पुस्तके | खांब | खांब |

या वरुन आपल्या असे लक्षात येईल की, काही शब्दांचे अनेक वचन करताना शब्दात कोणताच बदल होत नाही. (ब) गटातील शब्द पुन्हा एकदा वाचा, म्हणजे आपल्या लक्षात येईल.


©KTBS Not to be republished

पाठ 7


# जादूगर



हे तऱ्हेतऱ्हेचे कोण चितारी रंग?
हे कुणी नटविलें इंद्रधनूचे अंग?



मेघात वाजवी कोण बरे पखवाज?
मोरास सांगते कोण कराया नाच?



हे कुणी लाविले अत्तर फूलकळ्यांस?
हे कोण तरुवर रची फळांची रास?
वेलीत काढते कोण मनोहर नक्षी?

ही गाणी शिकती कोणापासुन पक्षी?
फांदीस डोलवित, देत कोण हा झोका?
करि वरुन कोण हा, पाण्याचा शिडकावा?
या वाऱ्यासंगे कोण करी गुजगोष्टी?
जल नौका सोडी कोण सागरावरती?
ही कुणी पसरली मखमल हिरवी भवती?
या निळ्या नभातुन कोण पाजळी ज्योती?
मांडून जादुची रोज अशी आरास,
ही कोण आणिते मौज नवी खेळास?



* गो.म. कुलकर्णी

Not to be republished

## स्वाध्याय

### अ. नवीन शब्दांचे अर्थ.

तऱ्हेऱ्हेचे   निरनिराळे, वेगवेगळे

तरु   झाड

चितारणे   रेखाटणे, चित्र काढणे

जल   पाणी

मेघ   ढग

नभ   आकाश

### आ. खालील प्रश्नांची उत्तरे 1 ते 2 वाक्यात लिही.

1. वेगवेगळ्या रंगानी कोणाचे अंग नटले आहे?
2. मेघात काय वाजते?
3. कवीने फुलाचे वर्णन कसे केले आहे?
4. ज्योती कोठे पाजळते?
5. गुजगोष्टी कोणासंगे करतात असे कवी म्हणतो?

### इ. समानार्थी शब्द लिही.

1. मेघ .................
2. तरु .................
3. जल .................
4. नभ .................
5. पक्षी .................

©KTBS Not to be republished

6. सागर .................

7. वारा .................

**ई. कवितेतील प्रासयुक्त शब्द शोध व लिही.**

उदा. रंग अंग.

**उ. जोड्या जुळव.**

| अ | ब |
|---|---|
| 1. इंद्रधनुष्य | 1. रुची |
| 2. पखवाज | 2. गोडगाणी |
| 3. फूल | 3. मेघ |
| 4. फळ | 4. सुगंध |
| 5. पक्षी | 5. रंग |



©KTBS Not to be republished

## पाठ 8

# हरवलेल्या पुस्तकाचे आत्मवृत्त

**विद्येविना मति गेली । मती विना नीति गेली ।**
**नीति विना गति गेली । गती विना वित्त गेले ।**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।**

किती मोजक्या शब्दात महात्मा फुल्यांनी विद्येचे महत्व सांगितले आहे. प्रसिध्द विचारवंत जॉन रस्किन म्हणतो, " पुस्तक नसलेले घर खिडक्या नसलेल्या खोलीप्रमाणे असतं" लोकमान्य टिळकांनी म्हटले होते की, " मी नरकातसुध्दा उत्तम पुस्तकाचं स्वागत करीन. नरकातही मी पुस्तकाच्या सहाय्याने स्वर्ग निर्माण करीन. कारण पुस्तकाचे सामर्थ्य मी जाणतो."



असं असताना राहुलच्या निष्काळजीपणामुळे मला आज अडगळीत पडाव लागलय. काय सांगू माझी व्यथा, 'ना घर का ना घाटका' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अशोक काकांनी माझ्यात असलेल्या प्रतिभावंताच्या विचारांनी प्रेरित होऊन, मला दिवाळीची भेट म्हणून त्याला दिल होतं.



राहुलला याची जाणीव नाही की, मी कपाटाच्या मागे जमिनीपासून तीन फूट वर अधांतरीच अडकलो आहे राहुलला वाटतं, पुस्तक हरवल, पण मी इथे आहे, हे त्याला कोण सांगणार? कदाचित मला गणेशचतुर्थी किंवा दिवाळी पर्यंत इथेच वाट पहावी लागणार. कारण गणेश चतुर्थीला घराची स्वच्छता करताना, रंग लावताना ज्यावेळी कपाट हलवील त्यावेळी मी त्याच्या नजरेस पडेन. तो पर्यंत दुर्दैवच आहे माझं.

©KTBS Not to be republished

समाज परिवर्तन करण्याचे सामर्थ्य असणाऱ्या माझ्या सारख्या पुस्तकाची ही दशा. माझ्यातील विचारांनी अनेक माणसांच्या जीवनात बदल घडवला आहे. याच विचारांनी वाचकाच्या जीवनाला प्रेरणा मिळते. जीवनात अपार दु:ख भोगलेल्या माणसाची वाचनाने जीवन जगण्याची आशा पल्लवित होते. हे विचार वाचकांच्या चर्चेतून जेव्हा माझ्या कानावर पडतात, त्यावेळी मनाला समाधान वाटते. माझ्या जन्माला अर्थ प्राप्त झाला असे वाटते. माझे जीवन सार्थकी लागले याचा मला अभिमान वाटतो.

पण आज माझी ही अवस्था देखील त्याच माणसाने केली आहे. हे विसरुन चालणार नाही. आज त्याच्यामुळेच मला इथं अडगळीत पडाव लागलय. त्यानं ज्यावेळी मला कपाटावर टाकल त्यावेळी माझी दोन पानं फाटली. त्याच्या वेदना मला होत आहेत. माणसाचा एखादा अवयव तुटल्यावर ज्या वेदना होतात, त्या मी आज अनुभवीत आहे. काही लोकांचे तर सांगायलाच नको. वाचन करण्यासाठी हातात घेतात. पण वाचताना एक पान वाचायला लागले की, दुसरी बाजू गोल दुमडतात. त्यावेळी माझी हाडं मोडतात की काय असं वाटतं. काही वेळा तर दोन्ही बाजू दुमडतात. तेव्हा माझा जीव जातो की काय अशी अवस्था होते. माणसाचे दोन्ही हात पिळवटून मागे धरले तर काय हाल होतील?, तीच गत माझी असते.

आणखी काही जणांचं निराळंच असतं. मला वाचतात त्यावेळी मी खूप आनंदी असतो. पण क्षणातच पुस्तकाचे वाचन बंद करुन पानाचा कोपरा दुमडतात. मला नको नको त्या प्रकारे छळण्याचा प्रयत्न करतात. काय सांगू आपल्याला? एखाद्याने करंगळी मोडली तर 'आई ग' अशी ओरड करावी लागते. पण माझ्या भावना त्याना ऐकूच येत नाहीत. काही जण मला वाचून झाल की फेकून देतात, जोरात आपटतात, बोटावर घेऊन गोल गरगर फिरवत माझ्याशी खेळतात. हे सर्व मी मुकाट्याने सहन करतो.

मला वाटतं सर्वांनी मला वाचलं पाहिजे. वाचताना व्यवस्थित हाताळल पाहिजे.थंडी वाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी तुम्ही जसे कपडे परिधान करता त्याच प्रमाणे मलाही पेपरचे कव्हर घालावे. शक्य झाल्यास प्लॅस्टीक कव्हर घालावेत. म्हणजे पाऊस वाऱ्यापासून चांगले संरक्षण होते. वर्तमानपत्राचे कव्हर घातलेले मला अजिबात आवडत नाही.

©KTBS Not to be republished

हे पहा, माझ्या वेदना, माझे मनोगत मी व्यक्त केले. वाचनाने प्रत्येकाच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो. पण गोष्ट अशी की आज दूरचित्रवाणीच्या रंगीबेरंगी जगात गुरफटलेल्या माणसांची वाचनाची आवड मात्र नामशेष होत चालली आहे. त्यामुळे माझ्यासारख्या अनेक पुस्तकांना वर्षानुवर्षे ग्रंथालयाच्या, दुकानाच्या कपाटात पडून राहावे लागत आहे.

'वाचाल तर वाचाल' हे डॉ. आंबेडकरांचे म्हणणे किती सार्थ आहे . हीच सद्‌बुध्दी ईश्वराने राहुल आणि तुम्हा सर्व मुलांना द्यावी, हीच प्रार्थना!

## स्वाध्याय

### अ. नवीन शब्दांचे अर्थ.

| | | | |
|---|---|---|---|
| आत्मवृत | स्वत:बद्दलची माहिती. | व्यथा | दु:ख |
| मति | बुध्दी | परिवर्तन | बदल |
| वित्त | पैसा, धन | सामर्थ्य | शक्ती |
| अनर्थ | वाईट घटना, प्रसंग | प्रतिभावंत | बुध्दिवान |

### आ. खालील प्रश्नांची उत्तरे 1 2 वाक्यात लिही

1. पुस्तकासंबंधी जॉन रस्किन यांचे मत कोणते आहे?
2. राहुलला ते पुस्तक कसे मिळाले होते?
3. पुस्तकाला अडगळीत कोणी टाकले?
4. करंगळी मोडल्यासारखा त्रास पुस्तकाला केव्हा होतो?
5. पुस्तकाला आपण केव्हा नजरेस पडू असे वाटते?
6. काय केल्याने पुस्तकाचे जीवन सार्थकी लागेल?

©KTBS Not to be republished

इ. **खालील प्रश्नांची उत्तरे 3   4 वाक्यात लिही.**

1. महात्मा जोतिबा फुले यांनी विद्येचे महत्व कोणत्या शब्दात व्यक्त केले आहे.
2. पुस्तक कोठे व कसे अडकले होते?
3. वाचकांच्या चर्चेतून कोणते विचार ऐकून पुस्तकाला समाधान वाटते?
4. पान फाटले की पुस्तकाला कोणत्या प्रकारच्या वेदना सहन कराव्या लागतात?
5. पुस्तकाचे संरक्षण कसे कराल?
6. पुस्तकाची इच्छा कोणती असते?

ई. **खालील वाक्ये कोणी म्हटली ते सांग.**

1. ''विद्येविना मति गेली । मति विना नीति गेली।''
2. ''पुस्तक नसलेले घर म्हणजे खिडक्या नसलेली खोली''
3. ''नरकातही मी पुस्तकाच्या सहाय्याने स्वर्ग निर्माण करीन''
4. ''राहुलच्या निष्काळजीपणामुळे मला आज अडगळीत पडाव लागलय''

उ. **खाली दिलेल्या शब्दांचे विरुध्दार्थी शब्द पाठात आले आहेत. ते शोध व लिही**

1. नरक
2. अस्वच्छ
3. सुख
4. मरण

©KTBS Not to be republished

# लिंग

*  पुढील वाक्ये वाचा.

1. बैल शेतात काम करतो.
2. मोहन पुस्तक वाचतो.
3. बंडूने पेढा खाल्ला.
4. आंबा गोड आहे.

वरील वाक्यातील अधोरेखित शब्द पाहा. या शब्दावरुन असे दिसून येते की, ते शब्द पुरुष वाचक आहेत. या पुरुषवाचक शब्दांना पुल्लिंगी नामे म्हणतात.

*  पुढील वाक्यात रिकाम्या जागी वरील उदाहरणातील अधोरेखित शब्द सोडून पुल्लिंग शब्द लिही व वाक्ये पूर्ण कर.

1. ............... शेतात काम करतो.
2. ............... पुस्तक वाचतो.
3. ............... पेढा खातो.
4. ............... गोड आहे.

*  तम्हास माहीत असलेल्या 20 पुल्लिंगी शब्दांची यादी खालील तक्त्यात लिहा.

| अ.न. | प्राणी | पक्षी | फळ /फुल किंवा वस्तू | व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |
| 4. | | | | |
| 5. | | | | |

©KTBS Not to be republished

* खालील चौकटीत कांही म्हणी दिल्या आहेत. शोधून लिहा.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दे | स | व | त्य | ता | से | री | व |
| त्या | ज | ला | य | को | ते | ण | ज |
| मा | य | री | ज | क | वा | रा | न |
| ज | वे | य | त | कि | से | सा | भ |
| न | रा | भा | वे | र | त | मा | ता |

**टीप : म्हणींचा संग्रह करा.**

* पुढील वाक्ये वाचा.

1. बकरी दूध देते.
2. चिंच आंबट आहे.
3. गीता गाणे गाते.
4. जिलेबी गोड आहे.

वरील वाक्यातील अधोरेखित शब्दांना स्त्रीलिंगी नाम असे म्हणतात.

* पुढील वाक्यात रिकाम्या जागी वरील उदाहरणातील अधोरेखित शब्द सोडून स्त्रीलिंगी नामांचे शब्द लिहा.

1. ............ रानात चरते.
2. ............ पत्र लिहिते.

* तुम्हाला माहीत असलेल्या 20 स्त्रीलिंगी शब्दांची यादी तक्त्यात कर. हा तक्ता वेगळ्या स्वतंत्र कागदावर कर.

| अ.न | प्राणी | पक्षी | फळ / फूल | वस्तू किंवा व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |
| 4. | | | | |
| 5. | | | | |

©KTBS Not to be republished

* पुढील वाक्ये वाचा :

1. मूल खेळत आहे. 2. कोकरु चरत आहे.

3. पिल्लू पळत आहे.

वरील वाक्यातील अधोरेखित शब्द पाहा. या शब्दावरुन असे दिसून येते की, हे शब्द पुरुष जातीचे नाहीत किंवा स्त्री जातीचेही नाहीत असा बोध होतो. अशा शब्दांना नपूसकलिंगी श ब्द म्हणतात.

पुढील वाक्यात रिकाम्या जागी उदाहरणातील अधोरखित शब्द सोडून नपुसकलिंगी शब्द लिहा. व वाक्ये पूर्ण करा.

1. ............ खेळत आहे. 2. ............ चरत आहे.

## स्वाध्याय

* **खालील नांमाचे वाचन कर.**

सुतार, मुलगी, वाघ, राणी, रेडा, आई, मुलगा, वेल, फूल, गाय, मोटार, दही, डबा, बाळ, वाहन, घर, पेन.

| | | | |
|---|---|---|---|
| उदा. | तो सुतार | ती मुलगी | ते फूल |
| | तो वाघ | ती राणी | ते दही |
| | तो राजा | ती आई | ते बाळ |
| | तो रेडा | ती वेल | ते वाहन |
| | तो डबा | ती गाय | ते घर |
| | तो मुलगा | ती मोटार | ते पेन |

* **खालील नामांचे लिंग ओळखा.**

उंदीर, घड्याळ, तार, चिंच, बाग, सोने, कन्या, ढग, बालक.

©KTBS Not to be republished

* लक्षात ठेव.

| पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुसकलिंग | पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुसकलिंग |
|---|---|---|---|---|---|
| पूल | नदी | मूल | देव | काठी | दप्तर |
| भट | बी | फूल | शत्रू | सभा | शहर |
| दास | चादर | घर | फोटो | दिशा | पुस्तक |
| कुत्रा | भाकरी | पेन | मासा | वीट | दही |

* वाचन करून पुढे दिलेल्या रिकाम्या तक्त्यात हेच शब्द लिही.

| पुल्लिंग | स्त्रीलिंग | पुल्लिंग | स्त्रीलिंग |
|---|---|---|---|
| भाऊ | बहीण | तरुण | तरुणी |
| बैल | गाय | माळी | माळीण |
| वाघ | वाघीण | मोर | लांडोर |
| पती | पत्नी | | |

| पुल्लिंग | स्त्रीलिंग | पुल्लिंग | स्त्रीलिंग |
|---|---|---|---|
| | | | |

©KTBS Not to be republished

पाठ 9

# दसरा झाला हसरा

गावाबाहेरच्या देवीच्या देवळात मोठी गर्दी उसळली होती. देवळात फुलांचा, उदबत्त्यांचा सुगंध दरवळत होता. नवरात्रीनंतर आज देवीची सीमोल्लंघनाची मिरवणूक निघणार म्हणून देवीची पालखी सजवली होती. देवळाच्या आवारात पूजा साहित्य, खेळण्यांची, खाऊची दुकानं मांडली होती. एखादी जत्राच भरली होती म्हणा ना।


मिरवणूक पाहण्यासाठी समीर, प्रकाश आणि मुग्धा हे त्रिकूटही आलं होतं. तिघानाही घरुन निघताना गर्दीत कसं वागायचं याच्या सूचना मिळाल्या होत्या. आईने सांगितल्याप्रमाणे तिघंही देवळात जाऊन देवीला नमस्कार करुन आली. मग मात्र समीरला राहवेना. चटकदार भेळ, खमंग भजी त्याला खुणवू लागली. प्रकाशला आईस्क्रीम हवं होत तर मुग्धाला रंगीबेरंगी बांगड्या घ्यायच्या होत्या. तिघं गर्दीत मस्त फिरु लागले.



©KTBS Not to be republished

इतक्यात त्यांच लक्ष कोपऱ्यात उभ्या असणाऱ्या राधाकडं गेलं. राधा त्यांच्याच वर्गात शिकत होती. कोपऱ्यावर उभी राहून ती हार आणि गजरे विकत होती. या तिघांना नवल वाटल. मुग्धा पुढं जाऊन राधाशी बोलू लागली ''राधा, तू इथं कशी? आणि हे हार गजरे कसले? आणि तुला नाही का या जत्रेत फिरायचं?'' मुग्धाने प्रश्नांची सरबती केली. तिला थांबवत समीर म्हणाला,''अग हो हो, एकदम किती प्रश्न विचारतेस'' आपल्या वर्गमित्रांना पाहून राधाही थोडी भांबावली.

''अगं माझे बाबा आजारी आहेत. त्यामुळे ते कामाला जाऊ शकत नाहीत. माझी आई एका दुकानात कामाला जाते. मी खूप शिकाव असं तिला वाटतं. म्हणून मग मला ती कांही काम करु देत नाही. पण सुट्टीच्या दिवशी कांहीतरी काम करुन तिला हातभार लावायचाच असं मी ठरवलयं. म्हणून मी आज इथं हार गजरे विकतेय. हे हार आईनंच करुन दिले आहेत'' राधा म्हणाली.



''आयडिया'' प्रकाश जोरात ओरडला. आपण असं करुया, राधाला हार विकायला मदत करु. मुग्धा आणि राधा तुम्ही गजरे विका. मी आणि समीर हार विकतो''. चालेल ! मग आपण सगळे मस्तपैकी भेळ खाऊ'' मुग्धा म्हणाली, ''अरे पण !.......राधाचं बोलणं मध्येच थांबवत प्रकाश म्हणाला''आता पणबीण काही नाही. आपण गर्दीत फिरुन

Not to be republished ©KTBS

सगळे हार लवकर विकू. ते पैसे तू घरी दे, आणि आमच्या खाऊच्या पैशात आपण चौघ जत्रेचा आनंद घेऊ.'' मुग्धा म्हणाली, ''खरच, आपण मित्रमैत्रिणी आहोत ना, मग समळे मिळून मजा करु. आपल्याला आई बाबा रागावणार नाहीत.''

मुग्धा आणि राधा हातात गजरे घेऊन, 'गजरे घ्या गजरे!, सुंदर सुंदर गजरे!.' असे मोठमोठ्याने ओरडू लागल्या. समीर आणि प्रकाश 'हार घ्या हार, छान छान हार!' असे ओरडू लागले. थोड्याच वेळात मुलांचे हार व गजरे संपले. एवढयात देवीची मिरवणूक सुरु झाली. ती बघून चौघांनी जत्रेचा आनंद लुटला. मैत्रिणीला मदत केल्याने मुलांचा दसराही हसरा झाला.

## स्वाध्याय

### अ. नवीन शब्दांचे अर्थ.

| | | | |
|---|---|---|---|
| सीमोल्लंघन | दसऱ्याचे शिलंगण. | खमंग | स्वादिष्ट, रुचकर |
| चटकदार | छान | त्रिकूट | तीन जणांचा समूह |
| नवल | आश्चर्य | सरबत्ती करणे | वर्षाव करणे |
| | | आयडिया (इंग्लिश शब्द) | कल्पना |

### आ. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

1. देवळात कशाचा सुगंध दरवळत होता?
2. मिरवणूक कोणाची निघणार होती?
3. राधा कोठे उभी होती?
4. फुलांचे हार कोणी करुन दिले होते?
5. गजरे कोणी विकले?
6. समीर व प्रकाश यांनी काय विकले?
7. दसरा हसरा का झाला?

©KTBS Not to be republished

## इ. रिकाम्या जागी योग्य शब्द भर.

1. मुग्धाला रंगीबेरंगी ............. घ्यावयाच्या होत्या.
2. वर्गमित्रांना पाहून राधा थोडी .............
3. आपल्याला ............. रागावणार नाहीत.
4. गजरे घ्या गजरे ............. गजरे.
5. हार घ्या हार ............. हार.
6. राधा त्यांच्याच ............. शिकत होती.

## ई. खालील प्रश्नांची दोन  तीन वाक्यात उत्तरे लिही.

1. जत्रेत कशाकशाची दुकाने आली होती?
2. मुग्धाने राधाला कोणकोणते प्रश्न विचारले?
3. राधा हार, गजरे विकण्यास का आली होती?
4. मित्र  मैत्रिणींनी राधाला कशी मदत केली?
5. प्रकाशने काय करण्याचे ठरविले?

## उ. खालील वाक्ये कोणी कोणास म्हटली ते लिही.


1. "अग, हो हो, एकदम किती प्रश्न विचारतेस!"
2. "अगं माझे बाबा आजारी आहेत"
3. "आता पणबिण कांही नाही"
4. "आपल्याला आई  बाबा रागावणार नाहीत."


©KTBS Not to be republished

पाठ 10

# मासा







निळ्या आकाशी विहरत राही पक्षी सहज जसा
सळकन् सुळकन फिरत असे मी जलातला मासा
तऱ्हेतऱ्हेचे इंद्रधनूसम रंग कसे असती
अमुच्यापैकी कांही मासे प्रकाशही देती
टिकली इतक्या काही जाती काही प्रचंड असती
आकारांचे प्रकार अगणित नसे तया गणती
ताप तुम्हाला कधी येई जर पावसात भिजला
जलात राहुन मला न होई सर्दी नि खोकला
पोहत राही सदोदीत मी जलात हो वसती
मधे एकदा मौज पाहण्या येतो मी वरती
पाण्यामधुनी कधी न काढा मरेल हा मासा
जलात असु दे जली असू दे जलातला मासा.

* कवी कृ. वि. दातार.

Not to be republished ©KTBS

## स्वाध्याय

**अ. नवीन शब्दांचे अर्थ.**

विहरणे आनंदाने फिरणे  सदोदित नेहमी, सतत

अगणित न मोजता येण्याइतके  जल पाणी

गणती करणे मोजणे.

**आ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.**

1. जलातला मासा कसा फिरत आहे?
2. माशांचे रंग कुणासारखे असतात?
3. माशांचे प्रकार किती आहेत?
4. जलात राहूनही माशाला काय होत नाही?
5. मासा पाण्याच्या वर मधेच एकदा का येतो?
6. मासा पाण्यातून बाहेर काढल्यास काय होईल?

**इ. खालील कवितेच्या ओळी पूर्ण कर.**

1. तऱ्हेतऱ्हेचे इंद्रधनूसम ..............................
   .............................. प्रकाशही देती.
2. पोहत राही सदोदीत ..............................
   .............................. येतो मी वरती.

**ई. कवितेतील खालील ओळींचा अर्थ लिही.**

टिकली इतक्या कांही जाती कांही प्रचंडही असती

आकारांचे प्रकार अगणित नसे तया गणती.

**उ. खाली दिल्याप्रमाणे कवितेतील तालबध्द शब्द लिही.**

जसा मासा  भिजला ...........

असती ............  वसती ...........

**ऊ. तुझ्या वहीत माशाचे चित्र काढून ते रंगव.**

©KTBS Not to be republished

## .इयत्ता 5 वी
## शब्द संग्रह

**अ**

अग्रभागी
अस्वस्थ
अनर्थ
अज्ञानी
अधांतरी
अडगळीत

**आ**

आकर्षक
आरास
आत्मवृत्त
आयडिया
आईस्क्रीम

**ए**

एकत्त्वाचे

**औ**

औषध

**अं**

अंतरी

**क**

कणखर
कलाकार

**ख**

खदखदणे
खपते
खोचक

**ग**

गांधीलमाशी
गुजगोष्टी
गैरसमज

**च**

चटकदार

**छ**

छिन्नी

**ज**

जोमाने

**झ**

झुंबड

**त**

तरुवर
तऱ्हेतऱ्हेचे
तिमिर
तेजोमय
तेजस्वी

**द**

दडपशाही
दुतर्फा
दंतमंजन
दंश

**न**

नभोमंडळ
नभोवाणी
नागमोडी
नित्य
निंबोण्या
निरसन
नियंत्रण
निपटणे
नीती

**प**

परिवर्तन
पखवाज
पाजळणे
प्रतिभावंत
प्लॅस्टिक

**भ**

भक्ष्य

**म**

मती
मखमल
मूर्तिकार
मोहरा
मौज

**र**

रत्नहार
रसरसशीत
रिपरिप

**ल**

लोकप्रिय
लहरी

**व**

वर्चस्व
विहरत
वैशिष्ट्य

**श**

शिडकावा
शांतताप्रिय

**स**

सद्बुध्दी
सदोदित
सामर्थ्य
सीमोलंघन
सुसंस्कृत
स्वर्ग
स्मरणशक्ती

**ह**

हुबेहूब
हुतात्मा

©KTBS Not to be republished

## विषय : मराठी

### * उद्दिष्ठानुसार शेकडेवार गुण विभागणी (प्रथम सत्र)

| क्र.सं. | उद्दिष्ठ | शेकडा प्रमाण | गुण | प्रश्न |
|---|---|---|---|---|
| 1 | ज्ञान | 25% | 10 | 07 |
| 2 | आकलन | 35% | 14 | 12 |
| 3. | अभिव्यक्ती | 30% | 12 | 04 |
| 4. | प्रशंसा | 10% | 04 | 01 |
| | एकूण | 100% | 40 | 24 |

### * प्रश्नांच्या स्वरुपानुसार गुण विभागणी

| क्र.सं. | प्रश्नांचे स्वरुप | शेकडा प्रमाण | गुण | प्रश्न |
|---|---|---|---|---|
| 1. | वस्तूनिष्ठ | 30% | 12 | 12 |
| 2. | लघुत्तरी | 40% | 16 | 09 |
| 3. | दीर्घोत्तरी | 30% | 12 | 03 |
| | एकूण | 100% | 40 | 24 |

### * कठीणतेच्या आधारे गुणांची विभागणी

| क्र.सं. | कठिणता | शेकडा प्रमाण | गुण | प्रश्न |
|---|---|---|---|---|
| 1. | सुलभ | 30% | 12 | 12 |
| 2. | सामान्य | 40% | 16 | 09 |
| 3. | कठीण | 30% | 12 | 03 |
| | एकूण | 100% | 40 | 24 |

©KTBS Not to be republished

## प्रश्नपत्रिका विश्लेषण (प्रथम सत्र)

| अ.क्र. | पाठ क्र. | उद्दिष्ठ | निर्दिष्ठ | गुण | प्रश्नस्वरुप | कठीणता | वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 3 | ज्ञान | स्मरण | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 2. | 6 | ज्ञान | स्मरण | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 3. | 3 | ज्ञान | स्मरण | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 4. | 5 | आकलन | स्मरण | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 5. | 8 | आकलन | ओळखणे | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 6. | 3 | आकलन | ओळखणे | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 7. | 4 | आकलन | ओळखणे | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 8. | 7 | आकलन | ओळखणे | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 9. | 7 | ज्ञान | स्मरण | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 10. | 10 | आकलन | स्मरण | 1 | लघुत्तरी | सुलभ | 2 |
| 11. | 8 | आकलन | ओळखणे | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 12. | 5 | आकलन | ओळखणे | 1 | लघुत्तरी | सुलभ | 2 |
| 13. | 4 | आकलन | ओळखणे | 1 | वस्तुनिष्ठ | सामान्य | 2 |
| 14. | 1 | आकलन | ओळखणे | 1 | वस्तुनिष्ठ | सामान्य | 2 |
| 15. | 2 | ज्ञान | स्मरण | 2 | लघुत्तरी | सामान्य | 4 |
| 16. | 6 | ज्ञान | स्मरण | 2 | लघुत्तरी | सामान्य | 5 |
| 17. | 4 | ज्ञान | विवरणकरणे | 2 | लघुत्तरी | सामान्य | 5 |
| 18. | 9 | अभिव्यक्ती | ओळखणे | 2 | लघुत्तरी | सामान्य | 5 |
| 19. | व्याकरण | अभिव्यक्ती | ओळखणे | 2 | लघुत्तरी | सामान्य | 5 |
| 20. | 9 | आकलन | स्मरणकरणे | 2 | लघुत्तरी | सामान्य | 6 |
| 21. | 10 | आकलन | स्मरणकरणे | 2 | लघुत्तरी | सामान्य | 6 |
| 22. | 2 | प्रशंसा | विवरण | 4 | दीर्घोत्तरी | कठीण | 10 |
| 23. | 1 | अभिव्यक्ती | विवरण | 4 | दीर्घोत्तरी | कठीण | 8 |
| 24. | 8 | अभिव्यक्ती | विवरण | 4 | दीर्घोत्तरी | कठीण | 8 |
| | | | | 40 | | मिनिटे | 90 |

©KTBS
Not to be republished

विषय मराठी (प्रथम भाषा) इयत्ता 5 वी

प्रथम अर्धवार्षीक सत्र

प्रश्नपत्रिका आराखडा

| क्र. स. | पाठ | ज्ञान | | | आकलन | | | अभिव्यक्ती | | | प्रशंसा | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वस्तुनिष्ठ | लघुत्तरी | दीर्घोत्तरी | वस्तुनिष्ठ | लघुत्तरी | दीर्घोत्तरी | वस्तुनिष्ठ | लघुत्तरी | दीर्घोत्तरी | वस्तुनिष्ठ | लघुत्तरी | दीर्घोत्तरी | प्रश्न | गुण |
| 1. | नव्या युगाचे गाणे (कविता) | | 1(2) | | | | | | | 1(4) | | | | 2 | 6 |
| 2. | तीनमूर्ती | | 1(2) | | | | | | | 1(4) | | | | 2 | 6 |
| 3. | कडुनिंब | 1(1) | | ) | 2(1) | | | | | | | | | 3 | 3 |
| 4. | मधमाशी (कविता) | 1(1) | 1(2) | | 1(1) | | | | | | | | | 3 | 4 |
| 5. | वीर हुतात्मा नारायण | | | | 1(1) | 1(1) | | | | | | | | 2 | 2 |
| 6. | आपला मित्र साप | 1(1) | | | 1(1) | | | | | | | | | 2 | 2 |
| 7. | जादूगर (कविता) | 1(1) | | | 1(1) | | | | | | | | | 2 | 2 |
| 8. | हरवलेल्या पुस्तकाचे आत्मवृत | | | | 1(1) | 1(1) | | | | | | | 1(4) | 3 | 6 |
| 9. | दसरा झाला हसरा | | | | | | | | 2(2) | | | | | 2 | 4 |
| 10. | मासा (कविता) | | | | 1(1) | 1(2) | | | | | | | | 2 | 3 |
| | व्याकरण | | | | | 1(2) | | | | | | | | 1 | 2 |
| | प्रश्न | 4 | 3 | | 8 | 4 | | | 2 | 2 | | | 1 | 24 | |
| | गुण | 4 | 6 | | 8 | 6 | | | 4 | 8 | | | 4 | | 40 |

©KTBS Not to be republished

## नमुना प्रश्नपत्रिका

## प्रथम अर्धवार्षिक सत्र

### विषय : मराठी (प्रथम भाषा)

इयत्ता 5 वी गुण 40

वेळ 90 मिनीटे

---

सुचना
* प्रश्नपत्रिका वाचून अर्थ समजून घ्या व उत्तरे लिहा.
* प्रश्नक्रमांक, लेखन, सुवाच्य व स्पष्ट असावे.

---

**कंसातील योग्य उत्तराचा शब्द रिकाम्या जागी भरा** 2 1 = 2

अ. 1. पानांच्या कडा ........... असतात.
(नागमोडी, सदामोडी, सुबक)

2. सगळेच साप ............. नसतात.
(बिनविषारी, विषारी, साधे)

आ. **वाक्यात उपयोग करा.** 2 1 = 2

3. रसरशित

4. मूर्ती

इ. **विरुध्दार्थी शब्द लिहा.** 2 1 = 2

5. नरक

6. आकर्षण

ई. **अर्थ स्पष्ट करा.** 2 1 = 2

7. खपते

8. चितारणे

उ. **समानार्थी शब्द लिहा.** 1 1 = 1

9. पक्षी मेघ

ऊ. **पुढील शब्दापासून योग्य अर्थाचे वाक्य बनवा.** 2 1 = 2

10. सहज, विहरत, जसा, निळ्या, पक्षी, राही, आकाशी,

11. नसलेल्या, खोलीप्रमाणे, असत, नसलेले,खिडक्या, घर,पुस्तक

©KTBS Not to be republished

**ए.** **उत्तरे लिहा.** **3 1 = 3**

12. चलेजाव चळवळ कोणत्या साली सुरु झाली?
13. आळस कोणाला ठाऊक नाही?
14. ध्येय गाठण्यासाठी आपणास काय करण्यास सांगीतले आहे?

**ऐ.** **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **4 2 = 8**

15. मूर्तीकार मूर्ती तयार करताना कोणती गोष्ट लक्षात ठेवतो?
16. सापाबद्दल कोणते गैरसमज लोकामध्ये आहेत?
17. नित्य कशाचा साठा करावा असे कवी म्हणतो?
18. मित्र मैत्रिणीने राधाला कशी मदत केली?

**ओ.** **उत्तरे लिहा.** **3 2 = 6**

19. नामाचे प्रकार किती व कोणते ते लिहा?
20. खालील वाक्य कोणी कोणास म्हटले आहे ते लिहा.
    "अग माझे बाबा आजारी आहेत."

**औ.** **खालील कवितेच्या ओळींचा अर्थ स्पष्ट करा.**

टिकली इतक्या कांही जाती, कांही प्रचंड ही असती.
आकारांचे प्रकार अगणित, नसे तया गणती.

**अं.** **उत्तरे लिहा.** **3 4 = 12**

22. तिसरी मूर्ती सर्वश्रेष्ठ का होती?
23. नव्या युगाचे .....................
    ...............................
    ........... गाणे आपण गाऊ.

**अ:** **खालील विषयावर 8 ते 10 ओळी निबंध लिहा.**

पुस्तकाचे आत्मवृत्त

©KTBS Not to be republished

# अनुक्रमणिका


| अ.न. | पाठाचे नाव | | कवी / लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1. | मधूला पडलेले स्वप्न | | | 61 |
| 2. | आता उठवू सारे रान | कविता | साने गुरुजी | 71 |
| 3. | एफ.एम्.रेडिओ | | संकलित | 74 |
| 4. | चतुर मैत्रीण | | | 81 |
| 5. | देवतुल्य आई बाबा | कविता | उमाकांत काणेकर | 89 |
| 6. | दिनूचे बिल | | आचार्य प्र.के. अत्रे. | 92 |
| 7. | तेनालीरामचे चातुर्य | | | 101 |
| 8. | ज्योत | कविता | | 112 |
| 9. | श्री. बसवेश्वर | | | 115 |
| 10. | बोधाचा स्पर्श | कविता | कृष्णाजी ना. आठल्ये | 123 |



प्रस्तुत पाठ्यांश द्वितीय सत्राकरीता निर्धारित केला आहे.

©KTBS Not to be republished


पाठ 1

# मधूला पडलेले स्वप्न

लहान मुलांचा स्वभावच मुळी हट्टी. खेळताना, फिरताना, जेवताना, अभ्यास करताना सगळीकडे हट्ट, आणि तक्रारी असतातच. आमच्या घरी मधूची मात्र जेवणाच्या बाबतीत मोठी तक्रार, बाजारातून आणलेले बिस्किट, केक, डोनेट असे पदार्थ खाल्ले की, जेवणाच्यावेळी ही भाजी नको, ती भाजी नको. हे त्याचे नेहमीचेच ठरलेले असते. वाटाण्याची उसळ व बटाट्याची भाजी या शिवाय इतर भाज्या खातच नाही. जेवणात विविधता असायला हवी. असं त्याला कितीही समजावलं तरी तो कधी मानतच नाही.



रविवारचा दिवस होता. सकाळी दूध पिऊन मधू जो खेळायला गेला तो दहा वाजता घरी आला. दारातूनच त्याने आईला हाक मारली. "आई, मला भुक लागली." आई घरात स्वयंपाक करीत होती. ती म्हणाली, "बाळ, आज रविवार ना? थोडा उशीर होईल. तू अंघोळ वगैरे कर. तोवर मी स्वयंपाक आवरून तुझे पान मांडते." "आई, आज कोणती भाजी आहे?" मधूने नेहमीचाच प्रश्न विचारला.



"आज ! मी मेथीची भाजी, गाजर, काकडी व टोमॅटो यांची कोशिंबीर, शेवग्याच्या शेंगाची आमटी केली आहे." आईने उत्तर दिले.

"जा, मला नको हे सगळं ! मला नाही आवडत ते." असे म्हणून मधू रागाने माजघरातील सोफ्यावर जाऊन पडला. दमला असल्याने त्याला तेथे कधी झोप लागली हे कळलेच नाही.

©KTBS Not to be republished



जेवणासाठी केलेल्या भाज्या कशा खायच्या या विवंचनेतच तो झोपला होता. काय आश्चर्य! स्वप्नात या सर्व भाज्या त्याच्या समोर येऊन उभ्या राहिल्या व सर्वजण म्हणल्या, ''मधू अरे मधू ऊठ. अस रुसून कसं चालेल. आमच्यावर.'' मेथी पुढे होऊन म्हणाली, ''अरे बाळ मधू, तू आम्हाला खात नाही म्हणतोस ! आम्ही किती उपयुक्त आहोत. हे तुला माहीत आहे का?'' मधूने नकारात्मक मान हलविली.

मेथी म्हणाली, '' बाळ मधू हे बघ आम्ही कोण कोण आलो आहोत. माझ्या सोबत लालभाजी, पालक, हरभऱ्याची ओली भाजी आली आहे. आम्ही सर्व पालेभाज्या आहोत आमच्या मध्ये तुझ्या शरीराला आवश्यक असणारी खनिजे, क्षार इत्यादींचे प्रमाण भरपूर असते. आम्हाला खाल्लेस तर तुझ्या शरिराची योग्य वाढ होईल, रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढेल.''



मधूने त्याचं बोलणे ऐकून घेतले पण उठला नाही. एका कुशीवरुन दुसऱ्या कुशीवर वळून तसाच पडून राहिला.

बाजूला असलेले गाजर, मुळा, कारले, नवलकोल इत्यादी समोर येऊन मधूला उठवण्याचा प्रयत्न करु लागले.


''मधू ऊठ, अरे रुसायचं नसतं जेवताना''

''मी नाही जा.'' मधू झोपेतच पुटपुटला.

गाजर पुढे येऊन म्हणाले, ''मधू काय रे हा वेडेपणा? इतका खेळतोस, उड्या मारतोस, त्यामुळे तुझ्या शरीराची झीज होते. आमच्यामध्ये काही प्रमाणात पिष्टमय पदार्थ आहेत. त्याच बरोबर जीवनसत्वे, कॅलशीयम याचं प्रमाण तर आहेच. म्हणून तुला आमच्यावर रुसून चालणार नाही. आमच्यावर रुसशील तर तू अशक्त होशील. ऊठ लवकर तुला जेवायचे आहे.''


© KTBS Not to be republished

मधूने कोणतीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. तो तसाच पडून राहिला.



इतक्यात त्याच्या बाजूला येऊन काकडी, टोमॅटो बोलू लागले. "मधू ऊठ. आम्ही आलो आहोत." लाल टोमॅटो व काकडीकडे पाहून मधू झोपेतच चाचपडू लागला. "आम्ही तुला आवडतो ना ! मग ऊठ लवकर. अरे आम्ही सर्व कोशिंबिरीचे पदार्थ आहोत. आम्हाला कच्चे खाल्यास आमच्यामध्ये असणारे पोषक घटक अधिक प्रमाणात मिळतात. हे तुला माहीत नाही का?

मला नाही माहीत. असे नकारार्थी मान हलवत तो उठण्याचा प्रयत्न करतो पण जाग येत नाही.



मधूला अस्वस्थता जाणवू लागली. तेवढ्यात त्याच्या आवडीची फळे सफरचंद, द्राक्षे, संत्री, मोसंबी, पेरु, केळी आली. त्याला उठवण्याचा प्रयत्न करु लागली.

"अरे मधू ऊठ, असं रुसायचं नाही. फक्त आम्हालाच खाल्लेस म्हणजे झाले असे नाही. तर आमच्या सोबत सर्व पालेभाज्या, कडधान्ये, भात, जोंधळा, दूध, दही, लोणी. या सर्वांची उपयुक्तता तुझ्या शरीराच्या योग्य वाढीसाठी आहे. तेव्हा त्या भाज्यांवर तू रागावलास तर कसे? पिष्टमय पदार्थ, स्निग्ध पदार्थ, प्रथिने, जीवनसत्वे, खनिजे, तंतुमय

©KTBS Not to be republished

पदार्थ, पाणी या सर्वांच्या योग्य प्रमाणातील आहाराला समतोल आहार म्हणतात. तो या सर्वांमुळे बनतो. कळलं !

ही सर्व फळं पाहून मधूच्या तोंडाला पाणी सुटले. ती फळे घेण्याच्या प्रयत्नात, मधू हात पुढे करु लागला. पण हाताला काही लागलेच नाही. मधू झोपेतून ताडकन् जागा झाला तर तो समोर काहीच नव्हते. भूक तर भरपूर लागली होती. तेव्हढ्यात आईने हाक मारली.

"बाळ, मधू उठ. जेवायला बस. फार भूक लागली ना तुला?" आईने त्याच्या डोक्यावरुन हात फिरवला. मधू उठला. अंघोळ करुन स्वच्छ होऊन आला.

आईने मधूसाठी पान मांडले होते. रविवार असल्याने तिने जेवणाचा झकास बेत केला होता. तांदळाच्या पिठाची भाकरी, मेथीची भाजी, वाटाण्याची उसळ, टोमॅटो, गाजर, काकडी यांची कोशिंबीर केली होती. लोणी, साखर, एका वाटीत सायीचे दही, त्याचबरोबर जेवणानंतर खाण्यासाठी द्राक्षे व सफरचंद ठेवले होते. हे सर्व पदार्थ पाहून मधूला प्रथम काय खावं हे समजलेच नाही. पण स्वप्नातील हकिकत त्याला आठवली व खाली मान घालून त्याने समोरच्या ताटातील पदार्थ एका मागून एक खायला सुरुवात केली. त्याचे भाज्या खाणे पाहून आईला आश्चर्य वाटले. जेवण झाल्यानंतर आईला राहवले नाही. शेवटी तिने विचारलेच.

" बाळ, नेहमी भाजी खाताना तक्रार करतोस, पण आज बरे मुकाट्याने खाल्लंस!" त्यावर मधू म्हणाला, "आज हे सर्व पदार्थ माझ्या स्वप्नात आले होते. या सर्वांनी मला त्यांचे महत्व काय आहे ते सांगितले. ते मला पटले. म्हणून मी आज कोणतीच तक्रार केली नाही. या पुढेही मी हे सर्व पदार्थ, पालेभाज्या फळभाज्या आवडीने खाईन."

आईला बरे वाटले. दोघेही जेवणानंतर फळे खात बसली. आईच्या चेहऱ्यावर हसू आले. आई मनोमनी खुष झाली.

©KTBS Not to be republished

## स्वाध्याय

### अ. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

1. मधू कोणते पदार्थ आवडीने खात असे?
2. रविवारी सकाळी मधू कोठे गेला होता?
3. आईने जेवणासाठी काय केले होते?
4. कोशिंबीर कशाची केली होती?
5. मधूच्या स्वप्नात आलेल्या फळांची नावे सांग.
6. आईच्या चेहऱ्यावर हसू का आले?

### इ. खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिही.

1. रविवारच्या जेवणाचा बेत ऐकून मधूने काय केले?
2. स्वप्नात आलेल्या पालेभाज्यांनी मधूला कोणता सल्ला दिला?
3. कोणत्या भाज्या कच्च्या खाल्याने अधिक पोषक घटक मिळतात?
4. समतोल आहार म्हणजे काय?
5. आईला आनंद का झाला?
6. मधूने जेवताना तक्रार का केली नाही?

### ई.

1. या पाठात आलेल्या व तुला माहीत असलेल्या इतर पालेभाज्यांची यादी कर.
2. फळभाज्यांची यादी कर.
3. तुला माहीत असलेल्या कडधान्यांची नावे लिही.

©KTBS Not to be republished

## उ. जोड्या जुळव.

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| 1. | मेथी, पालक | 1. | कोशिंबिरीच्या भाज्या |
| 2. | बटाटा, नवलकोल,भात,गहू | 2. | स्निग्ध पदार्थ |
| 3. | गाजर | 3. | हिमोग्लोबीन, खनिजे |
| 4. | दूध तूप | 4. | पिष्टमय पदार्थ |
| 5. | मूळा,काकडी, टोमॅटो | 5. | जीवनसत्वे |




© KTBS Not to be republished

# विशेषण

* खालील वाक्यांचे वाचन कर व अधोरेखित शब्दांचे निरीक्षण कर.

1. राजू उंच मुलगा आहे.
2. पुजा सुंदर गाते.
3. बाबानी मला नवीन दप्तर आणले.
4. लहान मुले मला आवडतात.
5. हिरवा रंग छान वाटतो.
6. मला परिक्षेत दहापैकी दहा गुण मिळाले.
7. माधवने शंभर रुपये साठवले आहेत.
8. मुलीना कच्चा आंबा आवडतो.
9. मनोजने धारवाडी पेढे आणले.
10. शहाणी मुले आईवडिलांचे ऐकतात.

वरील वाक्यातील अधोरेखित शब्द नामाची विशेष माहिती देतात. उदा. उंच मुलगा. यात 'मुलगा' हे नाम व 'उंच' हे नामाची विशेष माहिती सांगते. शंभर रुपये यात नामाची संख्या सांगते.

यावरुन आपण हे निश्चतपणे सांगू शकतो की, नामाविषयी अधिक (जास्त) माहिती सांगणाऱ्या शब्दाला विशेषण म्हणतात.

विशेषण जाणून घेण्यासाठी वाक्यातील नामाला कसा किंवा किती हा प्रश्न विचारावा.

**उदा.** 1. मला गोड पदार्थ आवडतात.

'पदार्थ' नाम. कसा पदार्थ ? 'गोड'पदार्थ म्हणून 'गोड' हे विशेषणआहे..

©KTBS Not to be republished

2. रमेशने दोन रुपये आणले.

‘रुपया’ नाम. किती रुपये आणले? ‘दोन’ हे विशेषण आहे.

* नामाला ‘कसा’ हा प्रश्न विचारुन येणारे उत्तर ‘गुण’ दाखविते.
* नामाला ‘किती’ हा प्रश्न विचारुन येणारे उत्तर ‘संख्या’ किंवा प्रमाण दाखविते.
* यावरुन ‘गुण विशेषण’ आणि ‘संख्या विशेषण’ असे विशेषणाचे दोन प्रकार मानतात.
* कोणतीही पाच गुण विशेषणे व पाच संख्या विशेषणे लिही.

## क्रियापद

* खालील वाक्ये वाचा.

1. रश्मी पाचव्या इयत्तेत शिकते.
2. कोल्हापूरला माझे मामी मामा असतात.
3. मला आमरस फार आवडतो.

वरील वाक्यात ‘शिकते’ ‘असतात’ आणि ‘आवडतो’ हे अधोरेखित शब्द ‘क्रियावाचक’ आहेत. ‘शिकणे’ ‘असणे’ आणि ‘आवडणे’ या क्रिया आहेत.

वाक्याचा अर्थ पूर्ण करणाऱ्या क्रियावाचक शब्दाला ‘क्रियापद’ म्हणतात.

* खाली दिलेल्या वाक्यात कंसातील क्रियापदांची योग्य रुपे घालून वाक्य पूर्ण कर.

1. मामांनी आईला बेळगावच्या गाडीत ............ (बसविणे)
2. मला माझ्या मामा मामींचा आदर ............(वाटणे)

©KTBS Not to be republished

3. रश्मी रोजनिशी ............ (लिहिणे)

4. ............ ............(आणणे)

5. ............ ............ (देणे)

## कर्ता, कर्म, क्रियापद

* खालील वाक्ये पाहा.

1. कोल्होबाने सर्कस <u>काढली.</u>
2. गुरुजी पोट धरुन <u>हसले.</u>
3. बेडकी बैलाएवढी <u>फुगली</u>.

'काढली' हे क्रियापद आहे. याचा मूळ शब्द 'काढणे' हा आहे.

'फुगली' हे क्रियापद असून 'फुगणे' हा मूळ शब्द आहे.

'हसले' हे क्रियापद आहे. तर मूळ शब्द 'हसणे' आहे.

कर्ता शोधताना क्रियापदावर लक्ष केंद्रित करा. क्रियापदाचा मूळ शब्द किंवा धातू शोधा. क्रियापदाच्या या मुळ शब्दास 'णारा' किंवा 'णारी' प्रत्यय जोडा.

आता क्रियापदाला 'कोण' असा प्रश्न विचारा म्हणजे कर्ता सापडेल.

उदा. कोल्होबाने सर्कस काढली. सर्कस काढणारा कोण?

1. कोल्होबा. म्हणून 'कोल्होबा' हा कर्ता.
2. गुरुजी पोट धरुन हसले. हसणारे कोण?
   गुरुजी. म्हणून गुरुजी हा कर्ता.
3. बेडकी बैलासारखी फुगली. फुगणारी कोण?
   बेडकी. म्हणून बेडकी कर्ता.

कर्ता म्हणजे 'क्रिया' करणारा किंवा करणारी आणि क्रिया करणारे.

© KTBS Not to be republished

* आता ही वाक्ये वाचा .

1. आजीने गोष्ट सांगितली.

2. नीताला रंगपेटी बक्षीस मिळाली.

वरील दोन्ही वाक्ये पहा. या वाक्यात 'सांगितली' हे क्रियापद आहे. आता सांगण्याची क्रिया कोणावर घडते. गोष्टीवर घडते. म्हणून येथे 'गोष्ट' हे कर्म.

नीताला रंगपेटी बक्षीस मिळाली. या वाक्यात मिळाली. हे क्रियापद आहे. आता मिळण्याची क्रिया कोणावर घडते? 'रंगपेटीवर' म्हणून 'रंगपेटी' हे कर्म आहे.

* आजीने गोष्ट सांगीतली. सांगणारी कोण? आजी म्हणून आजी कर्ता सांगण्याची क्रिया कोणावर घडते? गोष्टीवर. म्हणून 'गोष्ट' हे कर्म.

* नीताला रंगपेटी बक्षीस मिळाली. मिळवणारी कोण? नीता कर्ता.

मिळवण्याची क्रिया कोणावर घडते? रंगपेटीवर कर्म

* लक्षात ठेवा

क्रिया करणारा तो 'कर्ता'

क्रिया ज्यावर घडते ते 'कर्म'



Not to be republished ©KTBS

पाठ 2

# आता उठवू सारे रान

आता उठवू सारे रान
आता पेटवू सारे रान
शेतकऱ्यांच्या राज्यासाठी लावू पणाला प्राण.....॥धृ॥

किसान मजूर उठतील
कंबर लढण्या कसतील
एकजुटीची मशाल घेऊनी पेटवतील हे रान .....॥1॥

कोण आम्हा अडवील
कोण आम्हा रडवील
अडवणूक करणाऱ्यांची उडवू दाणादाण .....॥2॥

शेतकऱ्यांची फौज निघे
हातात त्यांच्या बेडी पडे
तिरंगी झेंडे घेती गाती स्वातंत्र्याचे गान.....॥3॥

पडून ना राहू आता
खाऊ ना आता लाथा
शेतकरी कामकरी मांडणार हो ठाण .....॥4॥

* साने गुरुजी

©KTBS Not to be republished

## स्वाध्याय

### अ. नवीन शब्दांचे अर्थ.

किसान शेतकरी

मजूर काबाड कष्ट करणारा

ठाण मांडणे एकाच ठिकाणी बसून रहाणे (पण येथे या कवितेत ठाण मांडणे म्हणजे निश्चयाने सांगणे असा अर्थ घ्यावा.)

कंबर कसणे निर्धार करणे.

### आ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

1. शेतकऱ्यांच्या राज्यासाठी काय करायचे आहे?
2. एकजुटीची मशाल घेऊन कोण कंबर कसणार आहेत?
3. दाणादाण कोणाची उडणार आहे?
4. स्वातंत्र्याचे गान शेतकरी कसे गाणार आहेत?

### इ. वाक्यात उपयोग कर.

1. ठाण मांडणे.
2. कंबर कसणे
3. प्राणपणाला लावणे
4. रान पेटविणे

### ई. तू देशासाठी काय करु शकतोस याबद्दल 10 ते 15 ओळीत लिही.

©KTBS Not to be republished

## ३. या कवितेत काही शब्द परकीय भाषेतील आहेत.

**उदा.** किसान हिंदी,

मशाल अरबी,

मजूर फारसी,


बेडी हिंदी.

याचप्रमाणे मराठी भाषेत वापरले जाणारे इतर भाषेतील शब्द दिले आहेत. ते लक्षात ठेव.

| संस्कृत | फारसी | अरबी | हिंदी | कन्नड | इंग्रजी |
|---|---|---|---|---|---|
| अग्नी | अगरबत्ती | अजब | डर | अडकित्ता | अर्जंट |
| अतिथी | अजमास | दप्तर | अचानक | अण्णा | स्टेशन |
| गिरी | अंजीर | अफवा | सडक | अप्पा | कॉंप्युटर |

(शिक्षकांच्या सहाय्याने वेगवेगळ्या भाषेतून मराठी भाषेत उपयोगात आणलेल्या शब्दांची यादी कर. वरील प्रमाणे तक्ता कर. वर यादीत दिलेले शब्द सोडून आणखी वेगळे तीन शब्द प्रत्येक भाषेसाठी लिही. हा तक्ता कागदावर किंवा वहीत करायचा आहे.)

©KTBS Not to be republished



## पाठ 3

# एफ् एम् रेडिओ




पहिली सत्र परीक्षा संपून नुकतीच सुट्टी पडली होती. दुसऱ्या दिवशी दसऱ्याचा सण होता. राधिका व शुभम मामाच्या गावी आले होते. रविवार म्हणजे सुट्टीचा दिवस. उशीरा उठणे, सर्व कामे निवांत करणे ही नेहमीची गोष्ट. पण दसरा होता म्हणून त्या दिवशी सर्वजण लवकर उठून आपापली कामे लवकर आवरत होते. शुभमला राहवले नाही, म्हणून तो मामाला म्हणाला.

शुभम् — मामा, आज सुट्टीचा दिवस आहे. इतक्या घाईने का तयार होताय?

माम — अरे! तुला नाही का माहित रेडिओवर आज 'आपली आवड' हा गाण्यांचा खास कार्यक्रम प्रसारित होणार आहे.

संध्या — होय शुभम् आपण नाही का 'सांग सांग भोलानाथ' हे आपल्या आवडीचं गाणं प्रसारित करण्यासाठी कळविले आहे?

शुभम् — होय? तर मग मज्जा येणार.

(एवढ्यात मामा एक छोटा रेडिओ घेऊन खोलीत येतात)


© KTBS Not to be republished

राधिका — मामा, हा छोटासा इलेक्ट्रिक डबा कशासाठी आणला आहे तुम्ही?

मामा — अग वेडे, हा रेडिओ आहे.

शुभम् — अरे वा ! रेडिओ, इतका लहान. मी आजच पाहिला.

मामा — करमणुकीच्या साधनामध्ये रेडिओला अधिक महत्व आहे. सर्व लोक अगदी आवडीने रेडिओ ऐकतात.



राधिका — मामा, टि.व्ही., ट्रॅन्झिस्टर, टेपरेकॉर्डर ही सुध्दा करमणुकीची साधनेच ना?

मामा — होय, अगदी बरोबर.

शुभम् — मामा, आमच्या घरी एक जुना मोठा रेडिओ आहे. आणि हा तर अगदी छोटा दिसतोय.

मामा — बाळ, हा एफ्.एम्. रेडिओ आहे.

शुभम् — मामा, एफ्.एम्. म्हणजे काय हो?

मामा — एफ्.एम्चे पूर्णरुप आहे. 'फ्रिक्वेन्सी मॉड्युलेशन' फ्रिक्वेन्सी म्हणजे वारंवारता. रेडिओ लहरी प्रक्षेपित करताना आपल्या सोयीसाठी त्याच्या वारंवारते मध्ये थोडा बदल केलेला असतो. त्यामुळे आवाज एकदम सुस्पष्ट ऐकू येतो. याला एफ्.एम्. म्हणतात.

राधिका — मामा, हे कोणी शोधून काढलं?

मामा — याचा शोध एडविन हॉवर्ड आर्मस्ट्रॉंग या शास्त्रज्ञाने लावला.

शुभम् — मामा, हा आवाज कोठूनही येतो?

मामा — नाही नाही, यासाठी खास प्रक्षेपण केंद्रे उभारलेली असतात.

राधिका — प्रक्षेपण केंद्र म्हणजे काय मामा?

©KTBS Not to be republished

| | |
|---|---|
| मामा | प्रक्षेपण केंद्र म्हणजे जेथून खास यंत्रेणेमार्फत हवेमध्ये रेडिओ लहरीचे प्रक्षेपण आणि प्रसारण केल जातं, ते ठिकाण. |
| राधिका | मग तो आवाज येथे कसा काय ऐकू येतो? |
| मामा | हे पाहा. रेडिओ लहरीच्या प्रक्षेपणासाठी काही ठराविक वारंवारतेची गरज असते. मात्र एफ्.एम्. साठी फक्त 87.5 ते 108.0 मेगा हर्टस् या दरम्यानच्या वारंवारतेचाच वापर करतात. प्रत्येक चॅनेल साठी काही ठराविक किलो हर्टसच्या फरकात या वारंवारता दिल्या जातात. श्रोत्यांनी आपला रेडिओ या विशिष्ठ वारंवारतेशी जुळवून घेतला की एफ्.एम्. चॅनेल लागतो. मग आवाज ऐकू येतो. |
| शुभम् | आपल्याकडे याची सुरुवात केव्हा झाली? |
| मामा | भारतात 1990 च्या दरम्यान याची सुरुवात झाली. पण आता शेकडो चॅनल्स उदयास आली आहेत. |
| शुभम् | हे सुरु करण्यासाठी काय करावं लागत? |
| मामा | यासाठी खासगी कंपन्याना भारत सरकारच्या माहिती प्रसारण खात्याकडे काही विशिष्ट रक्कम भरुन परवाना घ्यावा लागतो. |
| राधिका | मामा, यामध्ये फक्त गाणीच ऐकायला मिळतात का? |
| मामा | नाही नाही, गाण्याबरोबरच चित्रपट गीते, करमणुकीचे कार्यक्रम, हवामानासंबंधी माहिती, मान्यवरांच्या मुलाखती, असे अनेक कार्यक्रम ऐकायला मिळतात. |
| शुभम् | मामा, या रेडिओवर कोणकोणते चॅनल्स ऐकता येतात? |
| मामा | भारतामध्ये रेडिओ मिर्ची, टोमॅटो एफ्.एम्., रेड एफ्.एम्., बिग एफ्.एम्., रेनबो या बरोबरच आकाशवाणीची एफ्.एम्. चॅनेल्स खूप लोकप्रिय आहेत. |
| राधिका | याची किंमत खूप जास्त असेल ना? |

© KTBS Not to be republished

मामा नाही, किंमत अगदी कमी आहे. त्यामुळे सर्व सामान्य लोकांना ते घेण्यास परवडण्यासारखे आहे.

शुभम् मामा, आमच्या काकांच्या खिशातून गाण्याचा आवाज ऐकू येतो. तो याचाच असेल ना?

मामा होय, अगदी खिशात मावेल एवढ्या आकाराचे रेडिओ आज बाजारात उपलब्ध आहेत. त्याचबरोबर काही मोबाईल संचामध्येही एफ्.एम्. ची सुविधा उपलब्ध असते.

शुभम् मामा, आज आम्हाला खूपच छान माहिती सांगितलीत. (कार्यक्रमाची वेळ होते. 'आपली आवड' हा कार्यक्रम सुरु होतो. सर्वांचे कान रेडिओच्या आवाजाकडे लागतात. कार्यक्रमाच्या निवेदकाचा आवाज आपली आवड या लोकप्रिय कार्यक्रमात सर्व श्रोत्यांचे मनापासून स्वागत. आपल्या आवडीचं पहिल गीत आज आम्ही खास मुलांसाठी प्रसारित करीत आहोत. 'सांग सांग भोला नाथ')

आपल्याच आवडीचं गीत प्रसारित होत असल्याचे पाहून सर्वांना मनापासून आनंद होतो. मुले तर भलती खूष होऊन ऐकू लागतात.

**सांग सांग भोला नाथ**
**पाऊस पडेल का?**
**शाळे भोवती तळे साचून**
**सुट्टी मिळेल का?**

©KTBS Not to be republished

## स्वाध्याय

### अ. नवीन शब्दांचे अर्थ.

प्रसारित करणे    सगळीकडे पसरविणे

सत्र    भाग

निवांत    शांतपणे, गडबड न करता

श्रोता    ऐकणारा

प्रक्षेपण करणे    सोडणे, प्रसारित करणे

निवेदक    सांगणारा

चॅनल (इंग्लिशशब्द)    मार्ग

### आ. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

1. रेडिओवर कोणता कार्यक्रम प्रसारित होणार होता?
2. मामा खोलीत काय घेऊन आले?
3. एफ्.एम्. म्हणजे काय?
4. एफ्.एम्‌चा शोध कोणी लावला?
5. प्रक्षेपण केंद्र म्हणजे काय?


### इ. खालील प्रश्नांची उत्तरे उत्तरे 2 ते 3 वाक्यात लिही.

1. कोणत्याही चार करमणुकीच्या साधनांची नावे लिही.
2. एफ्.एम्.चा आवाज सुस्पष्ट कसा ऐकू येतो?
3. नवीन चॅनेल सुरु करण्यासाठी काय करावं लागतं?
4. एफ्.एम्. मधून कोणकोणती माहिती मिळते?

©KTBS
Not to be republished

**ई. जोड्या जुळव.(या जोड्यामध्ये या पाठाशी संबंधित एक जोडी आहे. परंतु या पाठात त्याचा उल्लेख आलेला नाही. तू शोधून लिही)**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| 1. टि.व्ही. | 1. एफ्.एम्.चॅनल |
| 2. एफ्.एम्. रेडिओ | 2. फिरते ध्वनी यंत्र |
| 3. रेडिओ मिर्ची | 3. रेडिओचा शोध |
| 4. मोबाईल | 4. करमणुकीचे साधन |
| 5. मार्कोनी | 5. एडविन हावर्ड आर्मस्ट्रॅांग |
| | 6. टेलिफोन |



©KTBS Not to be republished

## पाठ 13

# क्रिया विशेषण

* खालील वाक्ये वाचून अधोरेखित शब्दांचे निरीक्षण कर.

1. उद्या शाळेला सुट्टी आहे.
2. रघू दररोज अभ्यास करतो.
3. तो नेहमी शाळेला लवकर येतो.
4. रजनी सावकाश चालते.
5. ती गटगटा पाणी पिते .

या उदाहरणातील अधोरेखित शब्द क्रियापदाची विशेष माहिती दर्शवितात.

* क्रियापदाबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या शब्दाला क्रियाविशेषण असे म्हणतात.

क्रियापदाला आपण कसा / कशी / कधी हा प्रश्न विचारला की आपणाला उत्तरात 'क्रियाविशेषण' मिळते.

**उदा.** 1. रघु दररोज अभ्यास करतो.

या वाक्यात आपण जर क्रियापद 'अभ्यास करतो' याला 'कधी'? हा प्रश्न विचारला तर 'दररोज' हे उत्तर मिळते.

2. ती गटागटा पाणी पिते.

या वाक्यात क्रियापद 'पिते' याला 'कशी'? हा प्रश्न विचारला तर 'गटागटा' हे उत्तर मिळते.

म्हणून, 'दररोज' आणि 'गटागटा' हे शब्द क्रियाविशेषण आहेत.

©KTBS Not to be republished


पाठ 4

# चतुर मैत्रीण

खूप वर्षा पूर्वीची गोष्ट आहे. एक छोटसं गाव. त्या गावात सर्व लोक मिळून मिसळून रहात असत. गावापासून सुमारे एक मैल अंतरावर एक नदी वहात होती. त्या नदीच्या काठावर सुंदर देऊळ होते. सणावाराला देवाच्या दर्शनाला आजबाजूच्या गावातील लोक जमत. त्या देवळातील पूजा एक भटजी करत. ते मनाने फार चांगले होते. लोकांच्या कल्याणासाठी देवाजवळ प्रार्थना करत. उदर निर्वाहासाठी देवळात येणारे भक्त जे देतील त्यावरच त्यांना भागवावे लागे.

त्या भटजींना एक सवय होती, देवळातील दुपारची आरती झाल्यानंतर घरी परत येत असताना दोन तीन माणसांना जेवायला घेऊन येत. त्यांची पत्नी रोज दोन किंवा तीन लोकांना पुरेल एवढाच स्वयंपाक करायची. अचानक आलेल्या अतिथींचे जेवण झाल्यावर बऱ्याचदा तिला उपाशी रहावे लागे. तिने अनेकदा आपल्या पतीला असे न करण्याची विनंती केली.

पण त्यांची सवय काही कमी होईना. ती दिवसें दिवस अशक्त होऊ लागली. तिच्या मैत्रिणीने तिची परिस्थिती ओळखून तिला एक उपाय सुचविला. भटजींची पत्नी या गोष्टीला प्रथम तयार होईना. पण तिच्या मैत्रिणीने तिला सांगितले की तुझी वारंवार होणारी उपासमार चुकवायची असेल तर मी सांगते तो उपाय कर. भटजींची पत्नी त्या गोष्टीला तयार झाली.




©KTBS Not to be republished

नेहमीप्रमाणे दुपारच्या सुमारास भटजी दोन अतिथींना घेऊन आले. पत्नीने त्यांचे स्वागत केले. "उन्हातून आलात बसा. थोडं पाणी प्या" म्हणून त्यांना पाणी दिले. दोघे अतिथी आनंदित होऊन बसले. तेवढ्यात भटजींची पत्नी भटजीना म्हणाली, "घरातील प्यायचे पाणी संपले आहे. तेव्हा कृपया नदीला जाऊन एक घागर पाणी घेऊन येता का? मी तो पर्यंत जेवणाची व्यवस्था करते".भटजी आनंदाने पाणी आणण्यासाठी घागर घेऊन नदीकडे गेले.

भटजींच्या पत्नीने घरात येऊन दोन्ही अतिथींना पण दिसेल अशा जागेवर एक पाठ ठेवला. त्या पाटावर एक मुसळ ठेवले. त्याला हळदकुंकू, गंध लावले. फुले घातली. उदबत्ती ओवळली. आरती केली व फळांचा नैवेद्य दाखविला. त्यानंतर अतिथीना प्रसाद देऊ लागली. अतिथीनी प्रसाद घेताना विचारलं, "ताई ही कसली पूजा केलीस?"

भटजींची पत्नी डोळ्यात पाणी आणून त्यांना म्हणाली, "तुम्हाला काय सांगू, माझे पती रोज कोणाला तरी जेवायला बोलावून आणतात. पोटभर जेवायला लावतात. त्यानंतर त्यांना ते मुसळ घेऊन मारायला सुरुवात करतात." म्हणून मी रोज मुसळाची पूजा करून त्याची प्रार्थना करते की अतिथीना तुझा मार लागू देऊ नको." हे ऐकल्यानंतर त्या दोघा अतिथीना घाम फुटला. ते जेवणाला न थांबता भरभर घराबाहेर पडले. तेवढ्यात पाणी घेऊन भटजी आले. त्यांनी आपल्या पत्नीला अतिथी का निघून चालले आहेत असा प्रश्न विचारला. तेव्हा ती म्हणाली, "हे आलेले पाहुणे आपल्या घरातील एकुलते एक मुसळ मागू लागले. त्यांना मी ते देत नाही म्हणाले, म्हणून ते रागाने निघाले आहेत"



©KTBS Not to be republished

भटजीना आपल्या बायकोचा राग आला. आपल्याला पाहिजे तर नवीन मुसळ आणता येईल. पण त्यांना मुसळ द्यायला पाहिजे. असे म्हणून ते मुसळ घेऊन त्या दोन अतिथींच्या मागे, " थांबा ! थांबा ! " म्हणून जाऊ लागले. त्या अतिथींना वाटले की हा भटजी आता आपल्याला मुसळाने मारणार. ते वेगाने पळू लागले. गावातल्या लोकांना त्यांनी प्रकार सांगितला. गावच्या लोकांना खरे वाटले. आजूबाजूच्या गावात ही बातमी पसरली. तेव्हापासून त्या भटजींच्या घरी जेवायला जायचे लोक बंद झाले. भटजींची पत्नी मात्र मनोमन खुष झाली. तिने आपल्या मैत्रिणीचे आभार मानले.

## स्वाध्याय

### अ. नवीन शब्दांचे अर्थ.

कल्याण सुख, चांगले, मंगल.

उदरनिर्वाह चरितार्थ, पोट भरण्याचे कार्य.

अतिथी पाहुणा.

घाम फुटणे भीती वाटणे.

### आ. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. गावातील लोक कसे रहात असत?
2. नदी कोठे होती?
3. भटजींना कोणती सवय होती?
4. भटजींच्या पत्नीला उपाशी का रहावे लागे?
5. भटजींच्या पत्नीने भटजींना कोणते काम सांगितले?
6. भटजींच्या पत्नीने कशाची पूजा केली?
7. भटजी अतिथींच्या मागे का लागले?

©KTBS Not to be republished

## इ. खालील प्रश्नांची उत्तरे दोन तीन वाक्यात लिही.

1. भटजींची पत्नी अशक्त का होऊ लागली?
2. मैत्रिणीने भटजींच्या पत्नीला कोणता सल्ला दिला असेल?
3. अतिथी भटजींच्या घरातून न जेवताच का पळाले?

## ई. रिकाम्या जागा भर.

1. नदीच्या काठावर ................ देऊळ होते.
2. भटजींची पत्नी दिवसें दिवस ................ होऊ लागली.
3. अतिथींना तिने ................ पाणी दिले.
4. भटजी ................ पाणी आणण्यासाठी नदीवर गेले.
5. आपल्याला पाहिजे तर ................ मुसळ आणता येईल.

## उ. उदाहरणात दर्शविल्याप्रमाणे तक्ता पूर्ण कर.

| उदा. | जा | जातात |
|---|---|---|
| 1. | खा | |
| 2. | गा | |
| 3. | ये | |
| 4. | पळ | |
| 5. | कर | |
| 6. | लिही | |

©KTBS Not to be republished

**ऊ. उदाहरणात दर्शविल्याप्रमाणे खालील शब्दात लपलेला दुसरा शब्द शोधून लिही व त्या शब्दाचा वापर करुन रिकाम्या जागा भर.**

उदा. सुमन मन

1. कवन ...........
2. हरण ...........
3. कापूस ...........
4. दुपार ...........
5. सवय ...........

उदा. लहान बाळाचे मन निरागस असते.

1. ........... रक्षण आमची जबाबदारी आहे.
2. तू खेळात ...........लास तरी त्या खेळात भाग घे.
3. एकच आंबा ...........नकोस.
4. गावातील लोकांनी पिंपळाखाली ........... बांधला.
5. माझे ........... आता 11 वर्षे आहे.

**ए. समानार्थी शब्द लिही. पती, पाणी, फूल, नदी, मैत्रीण.**

__________ __________ __________

__________ __________ __________

©KTBS Not to be republished

## शब्दयोगी अव्यय

* पुढील वाक्ये वाच. अधोरेखित शब्दांचे निरीक्षण कर.

1. टेबलाखाली चेंडू आहे.
2. लिंबोणीच्या झाडामागे चंद्र लपला.
3. आमची शाळा घरापासून जवळ आहे.
4. मजूर वर्षभर श्रम करतात.
5. कोणाविषयी वाईट बोलू नये.
6. वहिनीसाठी नवीन साडी आण.

* वरील वाक्यात नामाला म्हणजे शब्दाला जोडून काही शब्द आले आहेत.

**उदा.** टेबलाखाली ‘टेबल’ या नामाला ‘खाली’

झाडामागे ‘झाड’ या नामाला ‘मागे’

* यावरुन आपण असे म्हणू शकतो की, जे शब्द नामांना, सर्वनामाना जोडून येतात, व शब्दामध्ये संबंध दर्शवितात. त्यांना ‘शब्दयोगी अव्यय’ म्हणतात.

©KTBS Not to be republished

## स्वाध्याय

* खालील क्रियाविशेषण लक्षात ठेव.

आता, आधी, सध्या, उद्या, परवा, केव्हा, जेव्हा, नेहमी, दिवसभर, वारंवार, येथे, खाली, दूर, मागून, वरुन, आपोआप, मुद्दाम, सावकाश, पट्कन, झट्कन, थोडा, भरपूर, पूर्ण.

* खालील वाक्यातील क्रियाविशेषणे ओळखून लिही.

1. बाळ खुद्कन हसले. ______________
2. प्रगती मोठ्याने रडत होती. ______________
3. माझे आजोबा दिवसा झोपतात. ______________

* खालील वाक्यातील शब्दयोगी अव्यये ओळखून लिही.

1. झाडाखाली शेतकरी बसला आहे. ____________

2. तो रात्रभर घोरतो. ____________

3. कोणापाशी काही मागू नये. ____________

4. उद्यापासून परीक्षा सुरु होणार. ____________

5. देवासारखा आलास तू. ____________

6. तुझ्यासाठी हे पुस्तक आणलयं. ____________

7. रात्री घराबाहेर जाऊ नकोस. ____________

8. बंगल्यासमोर बाग आहे. ____________

## उभयान्वयी अव्यय

* खालील दिलेल्या वाक्यांचे वाचन करुन अधोरेखित शब्दांचे निरीक्षण कर.

1. आई <u>आणि</u> आजी देवळात गेल्या आहेत.
2. पुस्तक, वही <u>व</u> पेन घेऊन मी अभ्यास करु लागलो.
3. मी झटकन जातो, <u>अन्</u> पट्कन येतो.
4. अक्षयने अभ्यास केला, <u>म्हणून</u> तो पास झाला.
5. तू ये <u>किंवा</u> न ये, मी जाणार.
6. तू जा <u>पण</u> पट्कन परत ये.

वरील वाक्यातील अधोरेखित शब्द दोन शब्द किंवा वाक्यांना जोडतात. दोन शब्द किंवा दोन वाक्ये जोडणाऱ्या शब्दांना 'उभयान्वयी अव्यय' म्हणतात.

©KTBS Not to be republished

## केवलप्रयोगी अव्यय

* खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे वाचन कर.

1. शाब्बास ! तू खरच चांगली मुलगी आहेस.
2. अबब ! किती उंच इमारत ही !
3. अरे हट् ! मी अस कधीच म्हटल नव्हतं !
4. अरे रे ! गरीब विचारा.
5. चुप् ! काहीही सांगू नकोस मला.
6. अय्या ! किती छान फूल आहे हे !

वरील वाक्यातील अधोरेखित शब्द बोलणाऱ्याच्या मनातील आनंद, दु:ख, आश्चर्य, राग, इत्यादी भावना व्यक्त करतात.

* जे शब्द वाक्यात स्वतंत्र असून मनातील भावना व्यक्त करतात. त्यांना 'केवलप्रयोगी अव्यय' म्हणतात.

### स्वाध्याय

* खालील वाक्यातील उभयान्वयी अव्यय ओळखून लिही.

1. पाऊस पडला आणि चिखल झाला.
2. गरीबाला दान द्या अथवा मदत करा.
3. त्याने बोलावलं म्हणून तो गेला.
4. तू ये नाहीतर मी जातो.
5. सायकल मोडली कारण त्यावर दोघे बसलो.
6. तुला नवीन कपडे हवेत की बूट हवेत.
7. तू ये मग मी जाईन.
8. देह जावो अथवा राहो.


* कमीत कमी दहा केवलप्रयोगी अव्ययाचे शब्द लिही.



© KTBS Not to be republished

पाठ 5

# देवतुल्य आई बाबा



देवतुल्य बाबा माझे, देवतुल्य आई,
पुजा रोज करितो त्यांची, अन्य देव नाही ॥धृ॥

पेटवून त्यांच्यापाशी , दोन नेत्रज्योती,
लावुनिया पावन होतो, चरणधूळ माथी
सदा मागतो मी त्यांचे वरदहस्त डोई ॥1॥

शुध्द भाव आणिक त्यांच्या मनी वसे प्रेम.
वचन सत्य बोलायचा, असे नित्य नेम
भल्याबुऱ्या परिणामाचा, खेदखंत नाही ॥2॥

नभाहून मोठी माया, हृदय सागराचे
समाधान खेळे सदनी, शांति वैभवाचे
प्रपंचात राहूनियां, सत्वशील राही ॥3॥

* उमाकांत काणेकर

©KTBS Not to be republished

## स्वाध्याय

### अ. नवीन शब्दांचे अर्थ.

देवतुल्य  देवासमान  
माथा  कपाळ, मस्तक  
नेत्र  डोळे  
डोई  डोके  
चरण  पाय  
सदन  घर  
वरदहस्त  आशीर्वाद

### आ. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यता लिही.

1. देवतुल्य कोण आहेत?
2. कवी माथी काय लावून पावन होतो?
3. आई बाबा नित्य नेमाने कोणते वचन बोलत असतात?
4. कवी रोज कोणाची पूजा करतो?
5. आई बाबांची माया कशाहून मोठी आहे?

### इ. खालील प्रश्नांची उत्तरे 2, 3 वाक्यात लिही.

1. आई बाबांच्या अंगी कोणता भाव आहे? व मनी काय आहे?
2. त्याच्या घरी समाधान कशामुळे खेळत आहे?
3. कवीने आपल्या आई वडिलांची सेवा कशा पध्दतीने केली आहे?
4. तू तुझ्या आई बाबांबद्दल काय लिहिशील?

### ई. खालील कवितेच्या ओळी पूर्ण कर.

1. पेटवून ......... ......... ......... .........

......... ......... ......... ......... .........

......... ......... ......... ......... वरदहस्त डोई.

© KTBS Not to be republished

2. नभाहून ......... ......... ......... .........

......... ......... ......... ......... .........

......... ......... ......... ......... राही.

**उ. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिही.**

1. आई
2. बाप
3. डोळे
4. नभ
5. सागर

**ऊ. या कवितेतील यमक साधणारे शब्द उदाहरणाप्रमाणे लिही.**

उदा. आई नाही

1. नेत्रज्योती ....................
2. प्रेम ....................
3. सागराचे ....................

**ए. कवितेतील 'म' या अक्षरापासून तयार होणारे शब्द शोध, लिही व वाच.**

©KTBS Not to be republished

पाठ 6

# दिनूचे बिल

दिनूचे वडील डॉक्टर होते. दिनू कधी कधी त्यांच्याबरोबर दवाखान्यात जात असे. तेथे पुष्कळसे लोक येत असत. कोणी तपासून घेण्यासाठी येत. कोणी औषध घेण्यासाठी येत. कोणी म्हणे, "डॉक्टर, माझे पोट दुखत आहे. मला तपासा." तर कोणी म्हणे, " डॉक्टर, मला खोकला आणि सर्दी झाली आहे." डॉक्टर त्यांना तपासत असत. तपासून औषधे देत. तर कुणाला इंजक्शनही द्यावे लागे. तपासणी झालेले लोक जाताना डॉक्टरना विचारत असत. " डॉक्टर माझे बिल किती झाले? ते सांगा."

दिनू एका लहानशा खुर्चीवर बसून ते सारे पहात असे, आणि ऐकत असे. दवाखान्यातल्या बऱ्याचशा गोष्टी त्याला आता कळू लागल्या होत्या. पण बिल म्हणजे काय ते अजून त्याला कळले नव्हते.



दिनूने एके दिवशी वडिलांना विचारले, "बाबा, बिल म्हणजे काय हो?" डॉक्टरनी टेबलावरचा एक कागद घेतला आणि दिनूला दाखवला, "हे बघ, याला बिल म्हणतात. वाच." डॉक्टर म्हणाले. दिनू तो कागद वाचू लागला.

©KTBS Not to be republished

| | रुपये पैसे |
|---|---|
| * रोग्याला तपासल्याबद्दल | 50 =00 |
| * एक्स रे काढल्याबद्दल | 150=00 |
| * रक्त तपासल्याबद्दल | 100=00 |
| * औषध दिल्याबद्दल | 80=00 |
| **एकूण रुपये** | **380=00** |

दिनू ते बिल कितीतरी वेळ वाचत होता. तो एकदम मधेच हसला. त्याला काय वाटले कुणास ठाऊक. काहीतरी विचार त्याच्या डोक्यात आला.


घरी गेल्यावर दिनू आपल्या खोलीत गेला. आणि कागदावर त्याने आपल्या आईच्या नावाने बिल तयार केले.

| | रुपये पैसे |
|---|---|
| * आज बागेतून फुले आणल्याबद्दल | 1=00 |
| * बाळाला दोन तास सांभाळल्याबद्दल | 4=00 |
| * शेजारी काकूंना निरोप दिल्याबद्दल | 1=50 |
| * दुकानातून नारळ आणल्याबद्दल | 1=50 |
| * घरकामात मदत केल्याबद्दल | 2=00 |
| **एकूण रुपये** | **10=00** |

ते बिल त्याने आईच्या खोलीत नेऊन ठेवले.

दुसऱ्या दिवशी दिनू सकाळी उठला. त्याच्या उशाशी 10 रुपये ठेवलेले दिसले. दिनूने ते उचलले. तेवढ्यात तेथे ठेवलेला एक कागद त्याच्या दृष्टीस पडला. त्याच्यावर काहीतरी लिहीलेले होते. त्याने कागद उचलला व चटकन वाचला. आईने दिनूच्या नावाने बिल तयार केले होते.

©KTBS Not to be republished



| | रुपये पैसे |
|---|---|
| * लहानपणासून पांचवीत येईप्रर्यंत वाढविल्याबद्दल | काही नाही |
| * अनेकदा आजारपणात दिवसरात्र जागून काळजी घेतल्याबद्दल | काही नाही |
| * गोष्टी सांगून करमणूक केल्याबद्दल | काही नाही |
| * वाचायला शिकविल्याबद्दल | काही नाही |
| * जत्रेत नेऊन आईस्क्रीम व खेळणी दिल्याबद्दल | काही नाही |
| **एकूण रुपये** | **काही नाही** |

दिनूच्या डोळ्यात एकदम पाणी आले. त्याचा गळा भरुन आला. त्याच्या हातातला कागद गळून पडला. ते पैसे घेऊन तो तसाच आईकडे धावत गेला. काही न बोलता त्याने आईला पैसे परत दिले. व आईच्या मांडीवर डोके ठेवून रडू लागला.

आईने दिनूला कुरवाळले. व त्याच्या गालाचा मुका घेत ती म्हणाली, ''बाळा, जीवनातल्या सगळ्याच गोष्टींची अशी बिले करुन किंमत करता येत नाही.''

दिनू ओशाळला व त्याने आईच्या कुशीत आपले डोके लपविले. त्याला त्याची चूक कळून आली.

* **आचार्य प्र.के. अत्रे.**

## स्वाध्याय

### अ. नवीन शब्दांचे अर्थ.

कुरवाळणे  गोंजारणे
एक्स रे  क्ष किरण.
डॉक्टर  वैद्य
ओशाळणे  लाज वाटणे
बिल(इंग्लिश शब्द)  खर्चाचा तपशील देणारा कागद
दृष्टीस पडणे  दिसणे

### आ. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

1. दिनूचे वडील कोण होते?
2. दिनू वडिलांबरोबर कोठे जात असे?
3. काय पाहिल्यावर दिनूला हसू आले?
4. आईने दिनूच्या उशाशी किती रुपये ठेवले होते?
5. दिनूने घरकामात मदत केल्याची किंमत किती लावली होती?
6. आईने दिनूला किती रुपयांचे बिल पाठविले होते?
7. तुला पैसे मिळाल्यावर तू काय करतोस?

### इ. खालील प्रश्नांची उत्तरे 2 3 वाक्यात लिही.

1. दिनूच्या वडिलांकडे लोक कशासाठी येत असत?
2. आईचे बिल पाहून दिनूची अवस्था कशी झाली?
3. आईने दिनूला कोणता बोध सांगितला?

### ई. खालील वाक्ये कोणी कोणाला म्हटली आहेत ते संदर्भानुसार लिही.

1. ''बाबा, बिल म्हणजे काय हो?''
2. ''बाळा, जीवनातल्या सगळ्याच गोष्टींची बिले करुन किंमत करता येत नाही.''
3. ''डॉक्टर माझे पोट दुखते आहे''
4. ''हे बघ, याला बिल म्हणतात. वाच.''

### उ. हा पाठ वाचून तुला याच पुस्तकातील कोणता भाग आठवला? त्यातील दोन ओळी लिही.

©KTBS Not to be republished

# वर्णमाला

'दसरा' हा एक शब्द आहे. तो उच्चारताना 'द', 'स', 'रा' हे तीन ध्वनी आपल्या मुखावाटे बाहेर पडतात. ते कागदावर किंवा पाटीवर लिहून दाखविताना आपण 'द', 'स', 'रा' या खुणांनी (चिन्हानी) लिहितो.

मुखावाटे बाहेर पडणाऱ्या ध्वनींच्या खुणानाच आपण 'अक्षरे' म्हणतो. 'अक्षर' म्हणजे न संपणारे किंवा खूप वर्ष टिकणारे. आता खूप वर्ष टिकणारी अक्षरे आपण कशाने लिहीतो? निळ्या किंवा काळ्या रंगाच्या शाईने आपण ही अक्षरे लिहितो. मग ही शाई बाटलीतली असो किंवा बॉलपेनमधील असो. तसेच वेगवेगळ्या रंगाने अक्षरे रंगवतो. घरांची नावे, दुकानांचे फलक, युवक मंडळाचे फलक वेगवेगळ्या रंगाने रंगविलेले तुम्ही पाहिले आहेत ना ! रंग म्हणजे 'वर्ण'. म्हणून वर्णाने लिहिलेली अक्षरे म्हणजेच 'वर्ण'.

आता दसरा याशब्दातील अक्षरात द,अ,स,अ,र,आ हे मूलध्वनी आहेत. 'दिवाळी' या शब्दात द,इ,व,आ,ळ,ई हे मूळचे ध्वनी आहेत. मुखावाटे उच्चारले जाणारे हे मूलध्वनी आपण रंगाने म्हणजे वर्णाने लिहून ठेवतो म्हणून यांना 'वर्ण' असे म्हणतात.

मराठी भाषेत एकूण 48 मूलध्वनी, म्हणजे वर्ण असून या वर्णाच्या मालिकेला वर्णमाला असे म्हणतात. ही वर्णमाला म्हणजेच 'मुळाक्षरे' होय.

आता आपण ही वर्णमाला किंवा मुळाक्षरे कोणती ते पाहू.

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ऌ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः,

क, ख, ग, घ, ङ, च, छ, ज, झ,ञ, ट, ठ, ड, ढ, ण,

त, थ, द, ध, न, प, फ, ब,भ, म, य, र, ल, व, श, ष,

स, ह, ळ.

©KTBS Not to be republished

## वाचा. उच्चार करताना ध्वनीकडे लक्ष द्या.

| | | |
|---|---|---|
| **स्वर :** | अ, इ, उ, ऋ | ऱ्हस्वस्वर. |
| | आ, ई, ऊ | दीर्घस्वर. |
| | ए, ऐ, ओ, औ | संयुक्त स्वर. |
| | अं | अनुस्वार. |
| | अ: | विसर्ग. |

**व्यंजन :** वर्गीय व्यंजने. ( क, च, ट, त, प)

क्, ख्, ग्, घ्, ङ्,
च्, छ्, ज्, झ्, ञ्,
ट्, ठ्, ड्, ढ्, ण्,
त्, थ्, द्, ध्, न्,
प्, फ्, ब्, भ् ,म्,

अवर्गीय व्यंजने य्, र्, ल्, व् , श्, ष्,स्, ह्, ळ् ,'क्ष', 'ज्ञ' ही संयुक्त व्यंजने आहेत.

**प्रश्न :** 1. वर्गीय व्यंजने कोणती ते सांगा.
2. अवर्गीय व्यंजने कोणती ते सांगा.
3. संयुक्त व्यंजने कोणती?

## वाचा आणि ध्वनीतील फरक ओळखा.

| | | | |
|---|---|---|---|
| अ | ह | अननस | हरण |
| ए | य | एडका | यम |
| ओ | व | ओढा | वरण |
| न | ण | नळ | कण |
| ल | ळ | लचका | कमळ |
| श | ष | शतक | षटक |
| स | | ससा | |

© KTBS Not to be republished

| अल्पप्राण | | महाप्राण | | अनुनासिक |
|---|---|---|---|---|
| अल्पप्राण | महापप्राण | अल्पप्राण | महाप्राण | अनुनासिक |
| क | ख | ग | घ | ङ |
| च | छ | ज | झ | ञ |
| त | थ | द | ध | न |
| प | फ | ब | भ | म |

* कृती : 1. नाक बंद करुन पुढील उच्चार कर. ज्ञ, ञ, ष, न, म.

2. एका मुलाने 'क' वर्गीय व्यंजने म्हणाली. तर दुसऱ्याने 'च' वर्गीय व्यंजने म्हणावीत. असा खेळ सारखा चालू ठेवावा.

3. महाप्राण व्यंजने एकापाठोपाठ म्हणावीत.

* रिकाम्या जागी योग्य 'वर्ण' लिहून शब्द पूर्ण करा.

र व त (प,क) भ जी (ट, क)

* खालील स्वरांपासून सुरु होणारे शब्द लिहा.

आ, इ, ए, ऐ, ऊ

## स्वाध्याय

1. वर्ण म्हणजे काय?
2. अल्पप्राण व महाप्राण ध्वनींची यादी करा.
3. वर्गीय व्यंजनांचा तक्ता करा.
4. अवर्गीय व्यंजनांचा तक्ता तयार करा.

©KTBS Not to be republished

# जोडाक्षरे

स्वर आणि व्यंजने कशाला म्हणतात, ते आपण पाहिले. स्वर हे पूर्ण उच्चाराचे वर्ण असल्यामुळे त्यांना मुळाक्षरे म्हणतात. तसेच एखद्या व्यंजनात स्वर मिसळला म्हणजे अक्षर तयार होते. याचाच अर्थ असा की स्वरयुक्त व्यंजन हे पूर्ण अक्षर बनते.

* खालील शब्द वाचा.

1. पक्व
2. तप्त
3. क्षत्रिय
4. ज्ञानेश्वर

वरील शब्दातील अधोरेखित अक्षरांची फोड खालील प्रमाणे करतात.

1. क्व = क् + व् + अ
2. क्ष = क् + ष् + अ
3. प्त = प् + त् + अ
4. ज्ञा = द् + न् + य + आ

क्व, प्त, ही जोडाक्षरे आहेत. क्ष व ज्ञा ही जोडाक्षरे दिसत नसली तरी ती जोडाक्षरे आहेत. हे नीट ध्यानात ठेवा. लागोपाठ येणाऱ्या दोन व्यंजनात स्वर मिसळतो. तेव्हा जोडाक्षर तयार होते.

कधी कधी जोडाक्षरात प्रारंभी दोन पेक्षा अधिक व्यंजने येतात. या बाबत खालील उदाहरणे पहा.

1. स् + त् + य् + आ = स्त्या
2. ष् + ट् + र् + अ = ष्ट्र

©KTBS Not to be republished

येथे 'स्त्या' आणि 'ष्ट्र' ह्या प्रत्येक जोडाक्षरात प्रारंभी तीन व्यंजने आली असून त्यांत शेवटी स्वर मिसळला आहे. या वरुन जोडाक्षर कशाला म्हणायचे याची आपल्याला कल्पना येईल. ज्या अक्षरात प्रारंभी दोन किंवा अधिक व्यंजने असून शेवटी त्यांत स्वर मिसळतो, त्या अक्षराला जोडाक्षर म्हणतात.

## स्वाध्याय

1. जोडाक्षर म्हणजे काय? पाच जोडाक्षरे लिही.

2. खालील जोडाक्षरे तयार कर, आणि ती जोडाक्षरे असलेले तीन शब्द लिही. तीन शब्द लिहून त्या शब्दांचा उपयोग करुन तीन वाक्ये शिक्षकांच्या मदतीने लिही.

   1. क् + त् + ई
   2. ज् + य + आ
   3. ध् + र् + अ

3. पाठ क्रङ्कांक 1 'ङ्कधुला पडलेले स्वप्न' ङ्का पाठातील जोडाक्षरी शब्द शोधून लिही.

..................... ..................... .....................

..................... ..................... .....................

..................... ..................... .....................

..................... ..................... .....................

..................... ..................... .....................

..................... ..................... .....................

©KTBS
Not to be republished

पाठ 7

# तेनालीरामाचे चातुर्य

कृष्णदेवरायांच्या दरबारात तेनालीराम हा अतिशय चाणाक्ष सल्लागार होता. अडचणीतून मार्ग काढण्यात तो तरबेज होता.

एकदा कृष्णदेवरायांच्या राज्यात भीषण दुष्काळ पडला. विहिरींचे पाणी आटले, तलाव कोरडे पडले, जनावरे पाण्यावाचून तडफडू लागली. लोकांच्या नजरा आकाशाकडे लागल्या. त्यावर्षी दुष्काळामुळे शेती पिकली नाही. धान्याचे भाव खूपच वाढले. कृष्णदेवरायांनी त्यावर्षी कर माफी जाहीर केली. पण पुढील वर्षी बियाणे आणायला पैसे कोठून आणायचे हा मोठा प्रश्न शेतकऱ्यासमोर होता.

त्यामुळे कृष्णदेवरायांनी शेतकऱ्यांना बियाणे आणण्यासाठी पाचशे मोहरा द्यायच्या तसेच पाऊस व्यवस्थित झाल्यास येणाऱ्या उत्पन्नातून दिलेली पूर्ण रक्कम शेतकऱ्यांनी परत करायची, अशी योजना आखली. राज्यातल्या खेड्यापाड्यांमध्ये रक्कम पोहोचवणे सोपे काम नव्हते. म्हणून या कामी खजिनदारांनी मंत्र्याकडे मदत मागितली. मंत्र्यांनी सेनापतीला मदत करण्यास सांगितले. सेनापतीने सुभेदारावर विभागवार जबाबदारी सोपवली. सुभेदारांनी सरदारांना पैसे पोहोचते करण्यास सांगितले. तर सरदारांनी सैनिकांना शेतकऱ्यांकडे पाठविले. सैनिकांनी शेतकऱ्यांकडून रक्कम मिळाल्या बद्दल पावत्या लिहून घेतल्या. शेतकऱ्यांनीही अडचणीच्या काळात मिळणारी मदत स्वीकारली, व पावत्या लिहून दिल्या.

दुसऱ्याच वर्षी निसर्गाच्या कृपेने पाऊस चांगला झाला. नद्या नाले खळाळून वाहू लागले. तलावांना, विहिरींना पाणी आले. पेरण्या झाल्या. शेतं डोलू लागली. पिकं तरारली. कापणी झाली. भरपूर उत्पन्न मिळाले. शेतकऱ्यांना खूप समाधान झाले. ठरल्याप्रमाणे कर्जाची रक्कम परत करायला सुरुवात केली. कोषागारात रक्कम पुन्हा जमा होऊ लागली.

कृष्णदेवरायानी खजिनदाराकडे किती लोकांनी रक्कम परत केली, याची आकडेवारी मागितली. खजिनदाराने दिलेली आकडेवारी पाहून कृष्णदेवरायांना धक्काच बसला. अजून निम्म्या शेतकऱ्यांनीसुध्दा रक्कम परत केली नव्हती. कृष्णदेवराय संतापले. ते

Not to be republished ©KTBS

म्हणाले, ''यावर्षी भरपूर उत्पन्न होऊनही शेतकरी कर्जफेडीला विलंब करतात. ही चांगली गोष्ट नाही. वेळेवर पैसे परत न देणे ही अनीती आहे. अशा शेतकऱ्यांना शिक्षा केली पाहिजे. पंधरा दिवसात कर्जफेड न केल्यास शेतकऱ्यांवर जप्ती आणा,'' संतापलेल्या महाराजांचे बोलणे ऐकून तेनालीराम म्हणाला, ''महाराज चौकशी न करता शिक्षा फर्माविणे हा न्याय नव्हे. आपल्या आदेशाने लोकांवर अन्याय होण्याची शक्यता आहे. आपण मला आठ दिवसाचा अवधी द्यावा.'' कृष्णदेवरायांनी तेनालीरामची मागणी मान्य केली.

तेनालीराम वेषांतर करुन गावोगावी हिंडत होता. त्याला कोणीही ओळखले नव्हते. पीक भरपूर येऊनही शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत नव्हता. याचे त्याला आश्चर्य वाटत होते. एका शेतकऱ्याच्या ओसरीवर रात्र घालविण्यासाठी तो थांबला. शेतकऱ्याची पत्नी ताट वाढून पतीला जेवणासाठी हाक मारत होती. शेतकरी मात्र खिन्न होऊन बसला होता. पत्नीने विचारल, ''कसली काळजी करताय? काय झाल?'' तेव्हा शेतकरी उदास होऊन म्हणाला, ''अगं राजाकडून कर्ज घेतलंय ते परत करायचंय. घेताना तीनशे मोहरा घेतल्या पण देताना मात्र पाचशे द्यायच्यात. कुठून आणणार मी वरच्या दोनशे मोहरा.''



यावरुन तेनालीरामच्या सर्वकाही लक्षात आले रक्कम देताना मधल्या लोकांनी भ्रष्टाचार केल्याचे त्याच्या लक्षात आले. तो तातडीने राजधानीत परतला. दरबारात

© KTBS Not to be republished

तेनालीराम येताच कृष्णदेवरायांनी विचारले,“रामन् ! झाली का तुझी चौकशी ? काय शोध लावून आलास? शेतकऱ्यांचे पैसे वेळेवर का आले नाहीत?”

तेनालीराम म्हणाला,“महाराज आपण एक बर्फाचा तुकडा मला द्यावा. म्हणजे तुमच्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतील” कर्जाच्या रक्कमेचा आणि बर्फाच्या तुकड्याचा एक दुसऱ्याशी काय संबंध? असा प्रश्न सर्व दरबाऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. महाराजांनी बर्फाचा तुकडा मागवला आणि तेनालीरामच्या हातात दिला. तेनालीराम म्हणाला,“आता हा बर्फाचा तुकडा दरबारातील प्रत्येकाने हातात घ्यावा. व पुढच्यास द्यावा.” बर्फाचा तुकडा फिरुन महाराजाकडे आल्यामुळे तो तुकडा वितळून बराच लहान झाला होता. तेनालीराम म्हणाला,“महाराज ! आपण मला पातेल्याच्या आकाराचा बर्फ दिला होता. पण तोच बर्फाचा तुकडा तुम्हाला परत मिळाला तेव्हा वाटीच्या आकाराचा झाला. बर्फाचा आकार कमी होण्याचे कारण म्हणजे अनेकांनी त्याची केलेली हाताळणी. अशाच प्रकारे आपण सद्भावनेने पाचशे मोहरांचे कर्ज प्रत्येक शेतकऱ्याला देण्याचा आदेश दिला खरा. पण खजिनदाराने मंत्र्याला व मंत्र्याने सेनापतीला, सेनापतीने सुभेदारांना, सुभेदारांनी सरदाराला, सरदारांनी सैनिकांना, शेवटी सैनिकांनी शेतकऱ्यांना पैसे द्यायचे . या सर्व प्रक्रियेत पाचशे मोहरा शेतकऱ्यानां मिळाल्याच नाहीत.पण गरीब शेतकऱ्यांनी नाईलाजाने पावत्या लिहून दिल्या.”

“आपल्याला मिळाली त्यापेक्षा अधिक रक्कम शेतकरी कुठून देणार? आपणच ठरवावे की शेतकऱ्यावर जप्ती की ओल्या झालेल्या हातांना शिक्षा द्यावी?” महाराजानी भ्रष्टाचारात सामील झालेल्याना शिक्षा दिली. सर्व दरबार तेनालीरामच्या या उत्तराने अवाक् झाला होता. गावकरी व शेतकऱ्यांनी तेनालीरामचा जयजयकार केला. निरपराध शेतकऱ्यांना न्याय मिळाला होता. तेनालीरामच्या चातुर्यावर कृष्णदेवरायसुध्दा प्रसन्न झाले होते.

©KTBS Not to be republished

## स्वाध्याय

### अ. नवीन शब्दांचे अर्थ

चाणाक्ष हुशार, चतुर
चातुर्य शहाणपणा
तरबेज कुशल
ओसरी सोपा
मोहर एक सोन्याचे नाणे
फर्माविणे हुकूमदेणे
कोषागार खजिना
दरबारी दरबारातील मानकरी
कर राज्य चालविण्यासाठी नागरिकांनी सरकारकडे भरावयाची रक्कम
खजिनदार खजिन्याची जबाबदारी सांभाळणारा अधिकारी
कृतज्ञ उपकाराची जाणीव असणारा

### आ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1. तेनालीराम हा कोण होता?
2. शेती का पिकली नाही?
3. राजाने शेतकऱ्यांना पाचशे मोहरा कशासाठी दिल्या?
4. तेनालीराम वेषांतर करुन कोठे हिंडत होता?
5. न्याय कोणाला मिळाला होता?
6. कृष्णदेवराय कोणावर प्रसन्न झाले?

### इ. दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिही.

1. दुष्काळ पडल्यामुळे काय काय घडले?
2. शेतकऱ्यांना कशाचे खूप समाधान झाले?
3. काही शेतकऱ्यांनी पैसे का परत केले नाहीत?
4. बर्फाचा तुकडा लहान कसा झाला?
5. शेतकऱ्यांनी तेनालीरामचा जयजयकार केव्हा केला?

©KTBS Not to be republished

## ई. समानार्थी शब्द लिही.

1. पाणी ............... 4. आकाश ................
2. खूप ................ 5. माफी ................
3. नदी ................ 6. सद्‌भावना ................

## उ. खालील वाक्ये घडलेल्या घटनेनुसार क्रमवार लिही.

1. निरपराध शेतकऱ्यांना न्याय मिळाला होता.
2. शेतकऱ्यांचे खूप समाधान झाले.
3. राजाने शेतकऱ्यांना बियाणे आणण्यासाठी पाचशे मोहरा दिल्या.
4. राज्यात भीषण दुष्काळ पडला होता.
5. तेनालीरामच्या चातुर्यावर कृष्णदेवराय प्रसन्न झाले.
6. बर्फाचा तुकडा दरबारातील प्रत्येकाने हातात घ्यावा व पुढच्यास द्यावा.

## ऊ. खालील व्यक्तींचा त्यांच्या हुद्द्यानुसार क्रम लाव.

मंत्री, सरदार, शेतकरी, राजा, सेनापती, सुभेदार, सैनिक.

## ए. पुढे दिलेल्या शब्दांचा योग्य क्रम जुळवून अर्थपूर्ण शब्द तयार कर.

1. व रा कृ दे ष्ण य ....................
2. जी न र ख दा ....................
3. गा षा को र ....................
4. बा र र द ....................
5. हा रा म ज ....................
6. ना द् स व भा ....................
7. तु र्य चा ....................

©KTBS Not to be republished

# संधी

संधी हा शब्द 'संध' या शब्दापासून बनला आहे. संध म्हणजे सांधणे, एकरुप होणे. पहिल्या शब्दातील शेवटचा वर्ण व दुसऱ्या शब्दातील पहिला वर्ण हे एकमेकात मिसळतात. त्या दोन वर्णांचा एक वर्ण तयार होतो. वर्णांच्या एकत्र होण्याच्या क्रियेला 'संधी' म्हणतात.

* **संधीचे प्रकार**
1. स्वरसंधी
2. व्यंजनसंधी
3. विसर्गसंधी

* **खालील दिलेले शब्द वाच.**

1. देवालय 2. सुरेंद्र 3. उमेश

4. गणेश 5. सूर्यास्त 6. चंद्रोदय

* **वरील प्रत्येक शब्दात दोन शब्द सामावले आहेत.**

1. देवालय या शब्दात असलेले शब्द देव आणि आलय
2. सुरेंद्र या शब्दात असलेले शब्द सुर आणि इंद्र
3. उमेश या शब्दात असलेले शब्द उमा आणि ईश
4. गणेश या शब्दात असलेले शब्द गण आणि ईश
5. सूर्यास्त या शब्दात असलेले शब्द सूर्य आणि अस्त
6. चंद्रोदय या शब्दात असलेले शब्द चंद्र आणि उदय

* **या आधी दिलेल्या शब्दांची उजळणी कर.**

**उदा.** देवालय, सुरेंद्र, उमेश, गणेश, सूर्यास्त आणि चंद्रोदय

यातील प्रत्येक शब्दात सामावलेले दोन शब्द ही पाहिले. या शब्दातील स्वर ओळखू.

**उदा.** देवालय या शब्दात देव आणि आलय हे दोन शब्द येतात.

©KTBS Not to be republished

'देव' हा शब्द उच्चारताना शेवटच अक्षर 'व' म्हणताना त्यातून येणारा स्वर 'अ' उमेश या शब्दात उमा आणि ईश हे दोन शब्द येतात त्यातून येणारा स्वर 'आ'

* या आधी वाचलेल्या शब्दातील दोन्ही शब्दांचा विचार करु.

**उदा.** देवालय यात आलेले शब्द देव आणि आलय

म्हणून पहिल्या शब्दातील शेवटच्या अक्षराचा स्वर 'अ'

दुसऱ्या शब्दातील पहिल्या अक्षराचा स्वर 'आ'

म्हणून येथे अ + आ असे करावे.

त्याचप्रमाणे उमेश शब्दातील उमा आणि ईश.

पहिल्या शब्दातील शेवटच्या अक्षराचा स्वर 'आ'

दुसऱ्या शब्दातील पहिल्या अक्षराचा स्वर 'ई'

म्हणून येथे आ + ई असे करावे.

देवालय आणि उमेश या शब्दांची फोड पुढे करुन दाखविली आहे. ती पहा.

1. देवालय

= देव + आलय

= व् + अ + आ

= आ हा 'आ' व पुढे काना देऊन ठेवलेला आहे.

= देवालय

2. उमेश

= उमा + ईश

= म् + आ + ई

ए हा 'ए' म वर मात्रा देऊन ठेवला आहे.

= उमेश

© KTBS Not to be republished

*   वरील उदाहरणात दिल्याप्रमाणे, दोन्ही शब्दांतील दोन स्वर एकत्र केले असता तयार होणाऱ्या संधीला स्वरसंधी म्हणतात.

*   पुढील शब्द व त्यांचे स्वर व संधीचे वाचन कर.

| दोन पदे | त्यात येणारे स्वर | स्वरसंधी | जोडशब्द /संधीशब्द |
|---|---|---|---|
| सूर्य +अस्त | अ+अ | आ | सूर्यास्त |
| देव +आलय | अ+आ | आ | देवालय |
| विद्या+अर्थी | आ+अ | आ | विद्यार्थी |
| महिला+आश्रम | आ+आ | आ | महिलाश्रम |
| हरि+ईश | इ+ई | ई | हरीश |
| गिरि+ईश | इ+ई | ई | गिरीश |
| मही+ईश | ई+ई | ई | महीश |
| गुरु+उपदेश | उ+उ | ऊ | गुरुपदेश |

**नियम 1.** वरील उदाहरणावरुन आपण असे म्हणू शकतो की ऱ्हस्व किंवा दीर्घ स्वरापुढे तोच स्वर ऱ्हस्व किंवा दीर्घरुपात आल्यास त्या दोहोंबद्दल त्याच जातीचा एकच दीर्घ स्वर येतो.

©KTBS Not to be republished

## स्वाध्याय

* खाली दिलेल्या शब्दांत कोणकोणते दोन शब्द सामावलेले आहेत, ते ओळखून लिही.

1. गजेंद्र 2. नरेंद्र 3. हिमालय 4. महिलाश्रम
5. महेश 6. गिरीश 7. महेश्वर 8. गुरुपदेश

* खाली दिलेल्या शब्दातील शेवटच्या अक्षराचा स्वर ओळख

1. गज 2. गण 3. सूर्य 4. चंद्र 5. रमा
6. प्रश्न 7. मही 8. गुरु 9. महा 10. एक
11. प्रीती 12. मनु 13. देव 14. गिरी 15. ने

* पुढील तक्ता पूर्ण कर.

| दोन पदे | त्यात येणारे स्वर | स्वरसंधी | जोडशब्द /संधीशब्द |
|---|---|---|---|
| हिम + आलय | | | |
| वृध्द + आश्रम | | | |
| योगी +ईश | | | |
| ऋषी + ईश्वर | | | |
| चंद्र + अस्त | | | |
| गण + ईश | | | |
| कवि + इच्छा | | | |
| मुनी + ईश | | | |
| मंत्र + आलय | | | |
| अनाथ + आश्रम | | | |

©KTBS Not to be republished

## खालील शब्द व त्यांचे स्वर व संधीचे वाचन कर

| दोन पदे | त्यात येणारे स्वर | स्वरसंधी | जोडशब्द /संधीशब्द |
|---|---|---|---|
| ईश्वर + इच्छा | अ +इ | ए | ईश्वरेच्छा |
| रमा + ईश | आ + ई | ए | रमेश |
| सूर्य + उदय | अ +उ | ओ | सूर्योदय |
| महा + उत्सव | आ +उ | ओ | महोत्सव |
| देव + ऋषी | अ + ऋ | अर् | देवर्षी |
| महा + ऋषी | आ + ऋ | अर् | महर्षी |

**नियम 2** अ किंवा आ पुढे इ किंवा ई आल्यास स्वराऐवजी 'ए' येतो. अ किंवा आ पुढे उ किंवा ऊ आल्यास 'ओ' येतो. अ किंवा आ पुढे ऋ आल्यास 'अर्' येतो.

## खालील शब्द व त्यांचे स्वर व संधीचे वाचन कर

| दोन पदे | त्यात येणारे स्वर | स्वरसंधी | जोडशब्द /संधीशब्द |
|---|---|---|---|
| एक + एक | अ + ए | ऐ | एकैक |
| सदा + एव | आ + ए | ऐ | सदैव |
| मत + ऐक्य | अ + ऐ | ऐ | मतैक्य |
| प्रजा + ऐक्य | आ + ऐ | ऐ | प्रजैक्य |
| जल + ओघ | अ + ओ | औ | जलौघ |
| गंगा + ओघ | आ + ओ | औ | गंगौघ |
| महा + औषधी | आ + औ | औ | महौषधी |

© KTBS Not to be republished

## स्वाध्याय

* पुढील तक्ता पूर्ण करा.

| दोन पदे | त्यात येणारे स्वर | स्वरसंधी | जोडशब्द / संधीशब्द |
|---|---|---|---|
| लंका + ईश्वर | | | |
| गण + ईश | | | |
| चंद्र + उदय | | | |
| देव + ऋषी | | | |
| उमा + ईश | | | |
| महा + उत्सव | | | |
| गज + इंद्र | | | |
| सुर + ईश्वर | | | |
| प्रश्न + उत्तर | | | |
| हिम + ईश | | | |

* पुढील तक्ता पूर्ण करा.

| दोन पदे | त्यात येणारे स्वर | स्वरसंधी | जोडशब्द / संधीशब्द |
|---|---|---|---|
| लोक + एक | | | |
| वृक्ष + औदार्य | | | |
| कर्ण + औदार्य | | | |
| कृपा + ओघ | | | |
| विद्या + ऐश्वर्य | | | |
| भव + औषधी | | | |
| शब्द + ऐश्वर्य | | | |

©KTBS Not to be republished

पाठ 8

# ज्योत




आधी होते मी दिवटी
शेतकऱ्यांची आवडती
झाले इवली मग पणती
घराघरातून मिणमिणती ॥1॥




समई केले मला कुणी
देवा पुढती नेवोनी
निघुनी आले बाहेर
सोडित काळासा धूर ॥2॥



काचेचा मग महाल तो
कुणी बांधुनी मज देतो
कंदिल त्याला जन म्हणती
मीच तयातिल परि ज्योती ॥3॥



बत्तीचे ते रुप नवें
पुढे मिळाले मज बरवें
वरात मज वाचून अडे
झगमगाट तो कसा पडे ॥4॥

आतां झाले मी बिजली
घरे मंदिरे लखलखती
देवा ठाऊक काय पुढे
नवा बदल माझ्यात घडे ॥5॥



एकच ठावे काम मला
प्रकाश द्यावा सकलाला
कसलेही मज रुप मिळो
देह जळो अन् जग उजळो ॥6॥

©KTBS Not to be republished

## स्वाध्याय

### अ. नवीन शब्दांचे अर्थ

| | | | |
|---|---|---|---|
| झगमगाट | चकचकीत | दिवटी | लहान मशाल |
| लखलख | तेजस्वी प्रकाश | बिजली | वीज |
| सकल | सर्व | मिणमिणते | मंद प्रकाश देते |
| देह | शरीर | ठावे | माहित |
| जन | लोक | उजळो | प्रकाशमय होवो |
| मज | मला, माझ्यासाठी | इवली | लहान |

### आ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

1. दिवटी कोणाची आवडती होती?
2. समई कोठे लावतात?
3. या कवितेत काचेचा महाल कोणास म्हटले आहे?
4. वरात कोणावाचून अडते?
5. दिव्याची ज्योत कोणता संदेश देते?

### इ. खालील उदाहरणाप्रमाणे कवितेतील पाच लयबध्द शब्द लिही.

**उदा.** पणती मिणमिणती

1. बाहेर
2. म्हणती
3. नवे
4. बिजली
5. मिळो

Not to be republished ©KTBS

## ई. गाळलेल्या जागी कवितेतील योग्य शब्द लिही

1. एकच ......... काम ............

.................. द्यावा सकलाला

..............मज ..........मिळो

देह ......... अन ............. उजळो


## उ. खाली दिलेल्या कवितेच्या ओळी वाचून अनुलेखन कर

चपल तुझे चरण जरा या घरी स्थिरावे
आणि दिव्य किरण तुझे अंतरी शिरावे

आपल्याला दिव्य
किरण कोण देतो?

## ऊ ज्योत या कवितेतील वर्णन केलेल्या प्रकाशदीपांचे वर्णन टप्याटप्प्याने 8 ते 10 ओळीत लिही.


ए. ज्योत सर्वांना प्रकाश देते. हा ज्योतीचा गुण आहे.दुसऱ्याचा गुण घ्यावा, असे याच पुस्तकात कोणत्या कवितेत सांगितले आहे? त्या ओळी पहा व पुन्हा लिही.



©KTBS Not to be republished

## पाठ 9

# श्री बसवेश्वर



विजयापुरा जिल्ह्यात बागेवाडी नावाचे एक गाव आहे. सुमारे आठशे वर्षापूर्वी तेथे मंडिगे मादिराज नावाचे एक गृहस्थ राहात असत. त्यांच्या पत्नीचे नाव मादलंबिका होते. पती पत्नी शिवाची उपासना करीत असत. त्यांच्या पोटी एक मुलगा झाला. त्याचे नाव बसवेश्वर असे ठेवले.

लहानपणीसुध्दा बसवेश्वरांचे आचार विचार इतर सर्वसाधारण मुलाप्रमाणे नव्हते. ते फार बुध्दिमान व विचारी होते. कोणत्याही गोष्टीवर विचार केल्याशिवाय ते आपले मत देत नसत. बसवेश्वर आठ वर्षाचे झाले. कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावर संगमेश्वर हे एक शांत, रम्य व सुंदर मंदिर आहे. या ठिकाणी त्यांनी आपला विद्याभ्यास केला. अध्ययन संपताच त्यावेळेच्या सामाजिक दोषांकडे त्यांचे लक्ष गेले, समाज सुधारणा करुन लोककल्याण साधण्याचा त्यानी निश्चय केला.

त्यावेळी बिदर जिल्ह्यातील कल्याण येथे बिज्जल नावाचा राजा होता. बलदेव हा त्यांचा मुख्यमंत्री होता. बलदेव हा बसवेश्वरांचा मामा होय. बलदेवने आपली एकुलती एक मुलगी गंगाबिंका हिच्याशी बसवेश्वरांचा विवाह करुन दिला. बलदेवने बसवेश्वरांची योग्य अशा सरकारी कामावर नेमणूक केली. बसवेश्वरांचा प्रामाणिकपणा, सरळ व सात्विक स्वभाव, विचाराप्रमाणे आचार, राज्यकारभाराचे सामर्थ्य, लोकांच्या कल्याणाची तळमळ पाहून बिज्जलास आनंद झाला. त्यांची त्यांच्यावर खूप मर्जी बसली.

©KTBS Not to be republished

बलदेवच्या मृत्यूनंतर बिज्जलाने मुख्यमंत्री म्हणून बसवेश्वरांची नेमणूक केली. बसवेश्वर मुख्यमंत्री झाल्यावर कल्याण राज्याचे भाग्य उदयाला आले. आपल्या बुध्दिमत्तेच्या जोरावर त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा भार सहज वाहिला.

बसवेश्वर हे विनयशील. कर्तव्यदक्ष व ईश्वराचे परमभक्त होते. आपल्या धर्माचाही प्रसार ते त्याचवेळी करु लागले. बसवेश्वरांची किर्ती फक्त कर्नाटकातच नव्हे तर सर्व ठिकाणी पसरली. अल्लम प्रभुदेवांच्या आशीर्वादाने त्यांनी 'अनुभव मंटप' नावाचे एक चर्चा मंदिर उभारले. काश्मीर वगैरे लांबलांबच्या ठिकाणाहून लोक चर्चेत भाग घेण्यासाठी येत असत. येथे चर्चेत भाग घेणाऱ्या प्रमुखांना ''शिवशरण'' असे म्हणत असत. अनुभव मंटपात पुरुषांच्या बरोबर स्त्रियाही भाग घेत असत.

बसवेश्वरांनी काही काव्ये रचली आहेत. या काव्यांना 'बसववचन' असे म्हणतात. वचन हे तुकारामांच्या अभंगाप्रमाणेच पण गद्यरुपात काव्य आहे. सर्व लोक समान असून त्यांच्यात उच्चनीच हा भेदभाव नाही असे त्यांनी सांगितले. 'कायकवे कैलास' म्हणजे श्रम हाच स्वर्ग. हीच बसवण्णाची शिकवण. सर्व प्राणीमात्रावर दया करावी. कारण ''दया हेच धर्माचे मूळ'' असे त्यांचे मत आहे. लोकांच्या कल्याणाकरिता, सुखासाठी अहोरात्र झटणे, लोकांची दु:खे दूर करणे, नेहमी सत्य बोलणे, नीतीने वागणे, परस्त्रियांना मातेप्रमाणे मानणे हाच खरा धर्म. देव एकच आहे. त्याला आपण अनेक नावानी संबोधतो. पण आपण त्याला कोणत्याही नावाने हाक मारावी, असे ते म्हणतात.

त्यांनी आपल्या धर्मात येण्यास सर्व लोकांना मोकळीक दिली होती. सर्वांना सारखी वागणूक होती. बसवेश्वर स्त्रियांच्या उध्दारासाठीही झटले. पुरुषांप्रमाणेच स्त्रीयांनाही धर्मग्रंथ वाचण्याचा, देवाची पूजा करण्याचा व मोक्ष मिळविण्याचा हक्क आहे अशी त्यांची शिकवण होती. त्यामुळे त्यांच्या धर्मात पुष्कळ लोक आले. यालाच लिंगायत किंवा वीरशैव धर्म म्हणतात.

अशारितीने मानवाच्या कल्याणासाठी बसवेश्वरांनी अहोरात्र प्रयत्न केले. शेवटी त्यांनी कुडलसंगम येथे समाधी घेतली. लोकांनी त्यांना 'युगप्रवर्तक' म्हणून गौरविले.

©KTBS Not to be republished

## स्वाध्याय

### अ.    नवीन शब्दाचे अर्थ

उपासना    आराधना, पूजा

कर्तव्यदक्ष    नेमून दिलेले कार्य करण्यात तत्पर

अध्ययन    शिकणे

भेदभाव    वेगळेपणाची भावना

सात्विक    प्रामाणिक, सत्वगुणी

अहोरात्र    रात्रंदिवस

### आ.  खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1. बसवेश्वरांचा जन्म कोठे झाला?
2. त्यांच्या आई वडिलांची नावे सांगा?
3. बसवेश्वरांनी कोणता निश्चय केला?
4. बसवेश्वरांचा कोणाशी विवाह झाला?
5. त्यांनी कोणाच्या उध्दारासाठी प्रयत्न केले?

### इ.    खालील प्रश्नांची दोन    तीन वाक्यात उत्तरे लिही.

1. बसवेश्वरांनी आपला विद्याभ्यास कोठे केला?
2. बिज्वल राजाची बसवेश्वरांवर खूप मर्जी होती. कारण?
3. बसवेश्वरांची शिकवण कोणती?
4. बसवेश्वरांच्या मते खरा धर्म कसा असावा?
5. लिंगायत किंवा वीरशैव धर्म म्हणजे काय?

©KTBS Not to be republished

## ई रिकाम्या जागी योग्य शब्द भरुन वाक्ये पूर्ण कर.

1. कृष्णा व मलप्रभा नद्यांच्या संगमावर ......... हे सुंदर मंदिर आहे.
2. बिज्जल राजाच्या दरबारात ............ हा मुख्यमंत्री होता.
3. अल्लम प्रभूदेवांच्या आशीर्वादाने त्यांनी ............ चर्चा मंदिर बांधले.
4. बसवेश्वरांच्या काव्यांना ............ असे म्हणतात.
5. बसवेश्वरांनी ............... येथे समाधी घेतली.

## उ. जोड्या जुळव.

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| 1. मंदिर | 1. बसववचन |
| 2. मुख्यमंत्री | 2. वीरशैव |
| 3. काव्य | 3. संगमेश्वर |
| 4. धर्म | 4. युगप्रवर्तक |
| 5. बसवेश्वर | 5. बलदेव |

## ऊ समानार्थी शब्द लिही

1. उपासना
2. दोष
3. सात्विक
4. कीर्ती
5. अहोरात्र

©KTBS Not to be republished

## ए वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग कर

1. बुध्दिमान असणे :
2. संगम होणे :
3. विद्याभ्यास करणे :
4. उदयास येणे :

## ऐ विरुध्द अर्थाचे शब्द लिही

1. प्रामाणिक
2. सामर्थ्य
3. गद्यरुप
4. नीती
5. उच्च

|| कायकवे कैलास ||

|| श्रम करणे ही खरी पुजा ||



©KTBS Not to be republished

## काळांचा परिचय

घराचा दिवाणखाना. आजोबा पेपर वाचताहेत. रजत एका हातात गोष्टीचे पुस्तक धरुन वाचत आत येतो आणि आजोबांच्या शेजारी बसतो. आजोबा पेपरवरुन त्याच्याकडे पाहतात, सावकाश पेपरची घडी घालून ठेवतात.

आजोबा : हं ऽऽ ! चला पेपर वाचून झाला ऽऽ. चल रजत, तुला बीजगणित समजावून सांगायचं नां?

( रजत खेळण्यात दंग)

आजोबा : रजत ! कुठाय लक्ष? मी म्हटलं, बीजगणिताचं पुस्तक घेऊन येतो आहेस ना? गणितं समजावयाची आहेत नां?

रजत : (पुस्तक बाजूला ठेवत) आजोबा, मी गणितं केलो. सगळा गृहपाठ संपविलो.

आजोबा : (हसत) 'गणित केली' आणि 'गृहपाठ संपविला' असं म्हणायचंय का तुला?

रजत : हो आजोबा. तेच म्हटलं नां.

आजोबा : (हसत) पण तू तसं नाही म्हटलंस नां !

'गणितं करुन झाली' आणि 'गृहपाठ करुन संपला' असं म्हटलं पाहिजे. हो ना?

रजत : (जीभ चावत) हो आजोबा.

आजोबा : रजत, या दोन्ही वाक्यात क्रिया करुन संपल्यामुळे ती भूतकाळातील वाक्ये आहेत, बरं का? घडून गेलेला काळ म्हणजे 'भूतकाळ'. वर्तमानकाळ म्हणजे आजचा काळ आणि भविष्यकाळ म्हणजे उद्याचा काळ, हे लक्षात ठेव बरं !

रजत : आजोबा, काल बाईंनी मला हाक मारली, मी म्हणालो, 'मी यायलोय ' तर बाई म्हणाल्या 'येत आहे' असं म्हण !

©KTBS Not to be republished

आजोबा : अरे, मी यायलोय, करायलोय, केलो, संपविलो असं घरगुती व्यवहारात आपण सहज बोलत असलो तरी ते व्याकरणदृष्टीने चुकीचे म्हणजे अशुध्दच आहे बाळा ! मात्र अशा चुका दुरुस्त करतच आपण आपली भाषा सुधारायची असते. आता हे बघ, 'मी येत आहे' या वाक्यात क्रिया आत्ता घडत असल्यामुळे ते वाक्य वर्तमानकाळातलं आणि मी येईन असं म्हटलं तर ?

रजत : (उडी मारुन) भविष्यकाळातलं, होय ना?

आजोबा : हं ! बरोबर ! प्रत्येक भाषेचे विशिष्ट नियम असतात. नियम बध्द व्याकरण असतं. मातृभाषेवर आपलं प्रेम असेल तर ती शुध्द बोलण्याचा प्रयत्न आपण केलाच पाहिजे. नाही का?

रजत : होय, आजोबा. आणि हो, आजोबा मी काल वर्गात गोष्ट सांगत होतो, तर बाई म्हणाल्या, 'अरे, एकाच गोष्टीत किती काळ वापरतोस? ''

आजोबा : तू वर्गात नेमकी कशी गोष्ट सांगितलीस ते मला माहित नाही. पण मी सुध्दा शिक्षक म्हणून निवृत्त झालोय म्हणून अनुभवाने सांगतो. अगदी नेहमीचीच ससा नी कासवाची गोष्ट घे. 'एक होतं जंगल' अशी सुरुवात करतात. पुढे मग सशाला गाढ झोप लागली अशी गोष्ट सांगता सांगता 'आणि अशा तऱ्हेने कासव शर्यत जिंकते' अशी ती संपवतात. तूही गोष्ट सांगताना असंच काहीसं केल असशील. होय ना?

रजत : (आठवतो, मग हसत) होय आजोबा.

आजोबा : (रजतच्या आईने दिलेला कॉफीचा कप उचलत) घडून गेलेल्या गोष्टींविषयी बोलताना, किंवा लिहिताना वाक्यांची रचना भूतकाळातलीच असली पाहिजे. होय ना? आता सांग 'कासवाने शर्यत जिंकली' या वाक्याचा काळ कोणता बंर?

रजत : भूतकाळ !

©KTBS Not to be republished

आजोबा : 'मी गणित करतो' यावाक्याचा काळ?

रजत : वर्तमानकाळ !

आजोबा : (हसत) आणि 'मी तुला खाऊ देईन' या वाक्याचा काळ?

रजत : (हसत) सोप्पं आहे ! भविष्यकाळ !

आजोबा : शाब्बास ! (असे म्हणून खडी साखरेचा खाऊ देतात).

## स्वाध्याय

### अ. हे नीट वाचून पहा.

भूतकाळ रजतने पुस्तक वाचले.

वर्तमानकाळ रजत पुस्तक वाचतो.

भविष्यकाळ रजत पुस्तक वाचेल.

### आ. खाली कांही वाक्ये दिली आहेत. त्यांचा काळ ओळख.

1. मांजर दूध पिते.
2. राघव शाळेला जाईल.
3. टॉमीने चोराला पकडले
4. कोल्ह्याने कावळ्याचे कौतुक केले.
5. माझी आजी हळुहळु चालते.
6. मी मॅच पाहण्यासाठी दिल्लीला जाईन.

### इ. खालील वाक्यांचा काळ ओळख आणि इतर दोन काळात त्यांचे रुपांतर कर.

1. गाय दूध देते.
2. सुमाने छान गाणे म्हटले.
3. आजी मला बक्षिस देईल.

©KTBS Not to be republished

## पाठ 10

# बोधाचा स्पर्श

अती भूषणे मार्ग तो संकटांचा
अती थाट तो वेष होतो नटाचा
रहावे असे की न कोणी हसावे
प्रमाणामध्ये सर्व काही असावे

अती कोपता कार्य जाते लयाला
अती नम्रता पात्र होते भयाला
अती काम ते कोणतेही नसावे
प्रमाणामध्ये सर्व काही असावे

सदा पद्य घोकोनिया शीण येतो
सदा गद्य वाचोनिया त्रास होतो
कधी ते कधी हेहि वाचीत जावे
प्रमाणामध्ये सर्व काही असावे



अती ज्ञान अभ्यासिल्या क्षीण काया
अती खेळणे हा भिकेचाची पाया
न कष्टविणे त्वां रिकामे बसावे
प्रमाणामध्ये सर्व काही असावे

* कृष्णाजी नारायण आठल्ये

©KTBS Not to be republished

## स्वाध्याय

### अ. नवीन शब्दांचे अर्थ.

अती प्रमाणाबाहेर

आंच प्रामाणिक इच्छा

भूषणे दागिने

घोळणे पाळ करणे

कोपणे संतापणे, चिडणे बोध चांगली शिकवण

गद्य कथा, निबंध, माहिती इत्यादींना गद्य म्हणतात.

पद्य काव्य, कविता, इत्यादींना पद्य म्हणतात.

कल्पवृक्ष मागितले ते सर्व देणारा एक काल्पनिक वृक्ष.

दक्ष राहणे लक्षपूर्वक काम करणे.

### आ. खालील प्रश्नांची नेमकी उत्तरे लिही.

1. अती थाट कोणाचा असतो?
2. आपण कसे रहावे असे कवीना वाटते?
3. अतिशय संतापले तर काय होऊ शकते?
4. क्षीण कशाने येतो?

### इ. तीन चार वाक्यात उत्तरे लिही.

1. कशाने नराचा नारायण होऊ शकतो असे कवीचे मत आहे?
2. कधी गद्य तर कधी पद्य वाचत जावे असे कवीना का वाटते?
3. कोणत्या गोष्टी अति करणे हे वाईट असे कवीना सांगायचे आहे?


©KTBS Not to be republished

## ई. गाळलेल्या जागेत नेमके शब्द भर.

1. आपल्या वागण्यात सर्व काही .................. असावे.
2. स्वत:ला नेहमी .................. गुंतवून घेण्यात शहाणपणा आहे.
3. अती दागिने धारण करणे हे ..................ला आमंत्रण देण्यासारखे आहे.

## उ. जोड्या जुळव.

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| 1. | अभंग | 1. | कबीर |
| 2. | ओवी | 2. | बसवेश्वर |
| 3. | भारुड | 3. | ज्ञानेश्वर |
| 4. | मनाचे श्लोक | 4. | तुकाराम |
| 5. | वचन | 5. | एकनाथ |
| 6. | दोहे | 6. | रामदास |
| | | 7. | मीराबाई |



©KTBS Not to be republished

## सर्वनामाचे प्रकार

### * खालील वाक्ये पाहा.

1. गीता जाधव ही डॉक्टरांची मुलगी होती.
2. तिला एक लहान भाऊ व बहीण होती.
3. आई स्वयंपाक करु लागली.
4. तिच्या मदतीला ताई आली.

पहिल्या वाक्यातील 'गीता' हे विशेषनाम आहे. तर दुसऱ्या वाक्यातीला अधोरेखित शब्द 'तिला' हे सर्वनाम आहे. तिसऱ्या वाक्यातील अधोरेखित शब्द 'आई' हे नाम आहे. तर चौथ्या वाक्यातील अधोरेखित शब्द 'तिच्या' हे सर्वनाम आहे.

नामाबद्दल येणाऱ्या शब्दांना सर्वनाम म्हणतात.

उदा. मी, आम्ही, आपण, तू, तुम्ही, तो, ती, ते, त्या, जो, जी, जे, ज्या, कोण, काय इत्यादी शब्द सर्वनाम आहेत.

## सर्वनामाचे प्रकार

### * खालील दिलेली वाक्ये वाचा.

| | |
|---|---|
| 1. मी गातो. | 4. ती गाते. |
| 2. आम्ही गातो. | 5. तिला गाणे येते. |
| 3. आपण गाता. | 6. तिचे गाणे सुंदर आहे. |

* **अधोरेखित शब्द पाहा :** ज्या व्यक्तीविषयी आपण बोलतो. त्यावेळी नामाच्या ऐवजी ज्या शब्दांचा आपण वापर करतो. त्याला 'पुरुषवाचक सर्वनाम' म्हणतात. येथे 'पुरुष' या शब्दाचा अर्थ व्यक्ती असा घ्यावा. 'व्यक्ती' या शब्दाने स्त्री व पुरुष या दोघांना आपण संबोधू शकतो.

© KTBS Not to be republished

* खाली दिलेली वाक्ये वाचा.

1. हा चेंडू माझा आहे.
2. ते आंब्याचे झाड आहे.
3. हे पेन माझे आहे.
4. तो पाहा पतंग उडतो आहे.

अधोरेखित शब्दांवरुन वस्तू जवळ आहे की दूर आहे. हा बोध होतो. ज्या सर्वनामांचा उपयोग जवळची किंवा दूरची वस्तू दाखविण्यासाठी होतो. त्यांना दर्शक सर्वनाम म्हणतात.

* खालील दिलेली वाक्ये वाचा.

1.अनिल पुस्तक वाचतो.

2. अनिल कोणते पुस्तक वाचतो.

3. अनिल काय वाचतो?

दुसऱ्या व तिसऱ्या वाक्यातील 'काय' व 'कोणते' हे शब्द प्रश्न विचारण्यासाठी उपयोगात आणले आहेत.

अशा प्रकारे ज्या सर्वनामांचा उपयोग प्रश्न विचारण्यासाठी केला जातो. त्याला प्रश्नार्थक सर्वनामे म्हणतात.

काय, कोण, कसे, केंव्हा, कोणी हे शब्द 'प्रश्नार्थक सर्वनाम ' म्हणून आपण उपयोगात आणतो.

## स्वाध्याय

* खालील सर्वनामांचा वाक्यात उपयोग करा, आणि रिकाम्या जागा भरा.

मी, आम्ही, तू, तुम्ही, तो, ते, हे, हा, ही, तिने.

1. आनंद माझ्या वर्गात आहे. ........... एक चांगला मुलगा आहे.

©KTBS Not to be republished

2. ............ लवकर येईन.

3. किती लवकर आलास ............?

4. ............ पुस्तक किती रुपयाला आणलेस?

5. कधी आलात ............?

6. ............ आज नाटक पहायला जाणार आहे.


7. ............ आज हार आणला.

8. ............ फूल कोणी आणलं?

9. ............ वाडा कोणी बांधला?

10. ............ भाजी कशी किलो दिली?

©KTBS Not to be republished



## .इयत्ता 5 वी
## शब्द संग्रह

**अ**

अवस्था

अनीती

अतिथी

अपेक्षा

**आ**

आवाका

आचार

आकाशवाणी

**इ**

इंद्रधनुष्य

इंजेक्शन

**उ**

उपयुक्त

उत्पन्न

उपासमार

**ए**

एक्सरे

एकजूट

**ओ**

ओसरी

**अं**

अंजन

**क**

कदाचित

कडधान्य

कसणे

कल्याण

कर्तव्य

कल्पवृक्ष

कर्ज

काव्य

किरकोळ

किंचित

कोशिंबीर

कोषागार

कृत्य

कॅल्शियम

**ख**

खजिनदार

खिन्न

**ग**

गुरफटणे

**घ**

घामाघूम

**च**

चरण

चमत्कार

चॅनेल

चातुर्य

चाणाक्ष

**ट**

ट्रान्झिस्टर

**ठ**

ठाण

©KTBS Not to be republished

**त**

तक्रार
तरबेज
ताडकन

**द**

दाणादाण
दुष्काळ
दंगेखोर

**न**

नभोवाणी
नम्रता
नकारार्थी
निवेदक
निवांत
नामशेष
निरपराध
निष्काळजी
नेतृत्व
नेमणूक
नेत्रज्योती
नैवेद्य

**प**

पल्लवित
परिधान
पणती
परिश्रम
परमभक्त
परिस्थिती
पावती
पिष्टमय
पिळवटणे
प्रसन्न
प्रसार
प्रपंच
प्रार्थना
प्रामाणिकपणा
प्रक्रिया
प्रक्षेपण
प्रसारित
प्रेरित

**फ**

फर्मावणे
फौज
फ्रिक्वेन्सी

**ब**

बहुधा
बत्ती

**भ**

भक्ष्य
भलेबुरे
भक्कम
भांबावणे
भाग्य
मनोगत
मनोहर
मखमल
मनोमन
मशाल
मान्यवर
मेगाहर्टस
मोती
मॉड्युलेशन

**र**

रक्कम
रक्षणार्थ

**ल**

लोकप्रिय
लहरी

**व**

वरदहस्त
वारंवारता
वाऱ्यासंगे
विशिष्ट

©KTBS Not to be republished

विविधता
विद्वान
विकसित
विद्याभ्यास
विवंचना
विलंब
वेदना
वैभव
व्यक्तिगत

**श**

शास्त्रज्ञ
शंका

**स**

सन्मान
सल्लागार
सद्भावना
सत्त्वशील
सर्वश्रेष्ठ
सरदार
सार्थक
सामाजिक
सुस्पष्ट
सुविधा
सैरावैरा

संकल्प
स्वप्न
स्पष्टीकरण

**ह**

हाताळणे
हिमोग्लोबीन
हिरे
हृदय

**क्ष**

क्षणभर
क्षार

©KTBS Not to be republished

## विषय : मराठी

### * उद्दिष्ठानुसार शेकडेवार गुण विभागणी (दुसरे सत्र)

| क्र.सं. | उद्दिष्ठ | शेकडा प्रमाण | गुण | प्रश्न |
|---|---|---|---|---|
| 1 | ज्ञान | 25% | 10 | 07 |
| 2 | आकलन | 35% | 14 | 12 |
| 3. | अभिव्यक्ती | 30% | 12 | 04 |
| 4. | प्रशंसा | 10% | 04 | 01 |
| | एकूण | 100% | 40 | 24 |

### * प्रश्नांच्या स्वरुपानुसार गुण विभागणी

| क्र.सं. | प्रश्नांचे स्वरुप | शेकडा प्रमाण | गुण | प्रश्न |
|---|---|---|---|---|
| 1. | वस्तूनिष्ठ | 30% | 12 | 12 |
| 2. | लघुत्तरी | 40% | 16 | 09 |
| 3. | दीर्घोत्तरी | 30% | 12 | 03 |
| | एकूण | 100% | 40 | 24 |

### * कठीणतेच्या आधारे गुणांची विभागणी

| क्र.सं. | कठीणता | शेकडा प्रमाण | गुण | प्रश्न |
|---|---|---|---|---|
| 1. | सुलभ | 30% | 12 | 12 |
| 2. | सामान्य | 40% | 16 | 09 |
| 3. | कठीण | 30% | 12 | 03 |
| | एकूण | 100% | 40 | 24 |

Not to be republished ©KTBS

## प्रश्नपत्रिका विश्लेषण (दुसरे सत्र)

| अ.क्र. | पाठ क्र. | उद्दिष्ठ | निर्दिष्ठ | गुण | प्रश्नस्वरुप | कठीणता | वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 1 | आकलन | स्मरण करणे | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 2. | 3 | आकलन | स्मरण करणे | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 3. | 5 | ज्ञान | स्मरण करणे | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 4. | 7 | ज्ञान | ओळखणे | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 5. | 4 | आकलन | ओळखणे | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 6. | 2 | आकलन | ओळखणे | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 7. | 4 | आकलन | विविरण करणे | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 8. | 5 | आकलन | विविरण करण | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 9. | 6 | आकलन | स्मरण करणे | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 10. | 7 | आकलन | स्मरण करणे | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 11. | 8 | ज्ञान | विविरण करणे | 1 | वस्तुनिष्ठ | सुलभ | 2 |
| 12. | 9 | ज्ञान | विविरण करणे | 1 | वस्तुनिष्ठ | सामान्य | 2 |
| 13. | 6 | आकलन | स्मरण करणे | 1 | लघुत्तरी | सामान्य | 4 |
| 14. | 10 | आकलन | स्मरण करणे | 1 | लघुत्तरी | सामान्य | 4 |
| 15. | 1 | ज्ञान | स्मरण करणे | 2 | लघुत्तरी | सामान्य | 3 |
| 16. | 2 | ज्ञान | स्मरण करणे | 2 | लघुत्तरी | सामान्य | 5 |
| 17. | 3 | ज्ञान | स्मरण करणे | 2 | लघुत्तरी | सामान्य | 5 |
| 18. | 4 | अभिव्यक्ती | स्मरण करणे | 2 | लघुत्तरी | सामान्य | 5 |
| 19. | 8 | अभिव्यक्ती | स्मरण करणे | 2 | लघुत्तरी | सामान्य | 5 |
| 20. | 9 | आकलन | स्मरण करणे | 2 | लघुत्तरी | सामान्य | 5 |
| 21. | व्याकरण | आकलन | ओळखणे | 2 | लघुत्तरी | सामान्य | 4 |
| 22. | 10 | अभिव्यक्ती | विविरण करणे | 4 | दीर्घोत्तरी | कठीण | 8 |
| 23. | 7 | अभिव्यक्ती | विविरण करणे | 4 | दीर्घोत्तरी | कठीण | 8 |
| 24. | व्याकरण | प्रशंसा | स्वत:च्या वाक्यात लिहिणे | 4 | दीर्घोत्तरी | कठीण | 10 |
| | | | | 40 | | | 90मि |

©KTBS Not to be republished

**विषय मराठी (प्रथम भाषा)** **इयत्ता 5 वी**

**द्वितीय अर्धवार्षीक सत्र** **प्रश्नपत्रिका आराखडा**

| क्र. स. | पाठ | ज्ञान | | | आकलन | | | अभिव्यक्ती | | | प्रशंसा | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वस्तुनिष्ठ | लघुत्तरी | दीर्घोत्तरी | वस्तुनिष्ठ | लघुत्तरी | दीर्घोत्तरी | वस्तुनिष्ठ | लघुत्तरी | दीर्घोत्तरी | वस्तुनिष्ठ | लघुत्तरी | दीर्घोत्तरी | प्रश्न | गुण |
| 1. | मधूला पडलेले स्वप्न | | | | 1(1) | 1(2) | | | | | | | | 2 | 3 |
| 2. | आता उठवू सारे रान | | 1(2) | | 1(1) | | | | | | | | | 2 | 3 |
| 3. | एफ.एम. रेडिओ | 1(1) | | | | 1(2) | | | | | | | | 2 | 3 |
| 4. | चतुर मैत्रिण | 1(1) | 1(2) | | 1(1) | | | | | | | | | 3 | 4 |
| 5. | देवतुल्य आई बाबा | 1(1) | | | 1(1) | | | | | | | | | 2 | 2 |
| 6. | दिनूचे बील | | | | 1(1) | 1(1) | | | | | | | | 2 | 2 |
| 7. | तेनाली रामचे चातुर्य | 1(1) | | | 1(1) | | | | | 1(4) | | | | 3 | 6 |
| 8. | ज्योत | | | | 1(1) | | | | 1(2) | | | | | 2 | 3 |
| 9. | श्री. बसवेश्वर | | | | 1(1) | | | | 1(2) | | | | | 2 | 3 |
| 10. | बोधाचा स्पर्श | | | | | 1(1) | | | | 1(4) | | | | 2 | 5 |
| | व्याकरण (लेखन) | | 1(2) | | | | | | | | | | 1(4) | 2 | 6 |
| | प्रश्न | 4 | 3 | | 8 | 4 | | | 2 | 2 | | | 1 | 24 | |
| | गुण | 4 | 6 | | 8 | 6 | | | 4 | 8 | | | 4 | | 40 |

©KTBS Not to be republished

## नमुना प्रश्नन पत्रिका

## द्वितीय अर्धवार्षिक सत्र

### विषय मराठी (प्रथम भाषा)

**इतत्ता 5 वी** **गुण 40**

वेळ 90 मिनीटे

---

**सुचना :** प्रश्नपत्रिका वाचून अर्थ समजून घ्या व उत्तरे लिहा.
प्रश्नक्रमांक, लेखन, सुवाच्य व स्पष्ट असावे.

---

**अ. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.** **2 1 = 2**

1. रविवारी सकाळी मधू .......... गेला होता.
2. एफ्.एम्. रेडिओचा शोध .......... यानी लावला.

**आ. वाक्यात उपयोग करा.** **2 1 = 2**

3. देवतुल्य
4. तरबेज

**इ. उलट अर्थी शब्द लिहा.** **2 1 = 2**

5. अशक्त
6. एकता

**ई. अर्थ स्पष्ट करा.** **2 1 = 2**

7. घाम फुटणे
8. वरदहस्त

**उ. पुढील शब्द समुहास एक शब्द द्या.** **2 1 = 2**

9. रोगाचे निदान करुन औषध देणारा.
10. राजा महाराजांच्या सभेचे ठिकाण.

**ऊ. जोड्या जुळवा.** **2 1 = 2**

| | | | |
|---|---|---|---|
| 11. | अ. | समई | वरात |
| | ब. | बत्ती | देव |
| 12. | अ. | मंदिर | वीरशैव |
| | ब. | धर्म | संगमेश्वर |

©KTBS Not to be republished

**ए. उत्तरे लिहा** **2 1 = 2**

13. दिनू वडिलाबरोबर कोठे जात असे?

14. अति थाट कोणाचा असतो?

**ऐ. उत्तरे लिहा** **6 2 = 12**

15. समतोल आहार म्हणजे काय?

16. स्वांतत्र्याचे गान शेतकरी कसे गाणार आहेत?

17. एफ्.एम्. मधून कोणकोणती माहिती मिळते?

18. अतिथी भटजींच्या घरातून न जेवताच का पळाले?

19. ज्योत या कवितेतील प्रकाशाच्या साधनांची नावे लिहा.

20. बसवेश्वरांची शिकवण कोणती?

ओ. **21. विशेषण म्हणजे काय? एक उदाहरण द्या.** **1 2 = 2**

औ. **22. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.** **1 4 = 4**

अति भूषणे ..................

............................

.................. कांही असावे.

अं. **23. खालील वाक्ये घटना क्रमानुसार लिहा.** **1 4 = 4**

निरपराध शेतकऱ्यांना न्याय मिळाला होता.

राज्यात भिषण दुष्काळ पडला होता.

राजाने शेतकऱ्यांना बियाने आणण्यासाठी 500 मोहरा दिल्या.

अः **24. अ) संधी म्हणजे काय?** **1 4 = 4**

आ) संधीचे प्रकार सांगून एक एक उदाहरण लिहा.

©KTBS Not to be republished

©KTBS
Not to be republished

©KTBS
Not to be republished